सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, २२ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १५१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पंतप्रधान मोदी युक्रेन व पोलंडच्या दौऱ्यावर रवाना!



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, बुधवारी पोलंड आणि युक्रेन या दोन देशांच्या दौऱ्यावर रवाना झालेत. रवाना होण्यापूर्वी पंतप्रधानांनी युक्रेनच्या राष्ट्रपतींसोबत संघर्षाच्या शांततापूर्ण निराकरणावर आपली दृष्टी सामायिक करणार असल्याचे सांगितले. एक मित्र आणि भागीदार म्हणून, भारत या प्रदेशात शांतता आणि स्थिरता लवकर परत येण्याची अपेक्षा करतो असे मोदींनी स्पष्ट केले.

परदेश दौऱ्याला सुरुवात करण्यापूर्वी आपल्या वक्तव्यात पंतप्रधान म्हणाले की, हा दौरा दोन्ही देशांमधील व्यापक संपर्कांची नैसर्गिक निरंतरता म्हणून काम करेल आणि येत्या काही वर्षांत मजबूत आणि अधिक दृढ संबंधांचा पाया रचण्यास मदत करेल असा विश्वास आहे. आमच्या राजकीय संबंधांना ७० वर्षे पूर्ण होत असताना पोलंडचा दौरा होत असल्याचे त्यांनी सांगितले. पोलंड हा मध्य युरोपमधील प्रमुख आर्थिक भागीदार आहे. लोकशाही आणि बहुलवादासाठी आमची परस्पर वचनबद्धता आमचे संबंध आणखी मजबूत करते. आमची भागीदारी आणखी पुढे नेण्यासाठी ते त्यांचे मित्र पंतप्रधान डोनाल्ड टस्क आणि अध्यक्ष आंद्रेज डुडा यांना भेटण्यास उत्सुक आहेत. ते पोलंडमधील भारतीय समुदायाच्या सदस्यांनाही भेटतील. पोलंडला भेट दिल्यानंतर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून ते युक्रेनला जाणार आहेत. भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच युक्रेन दौरा आहे. ते द्विपक्षीय सहकार्य बळकट करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी चर्चेची उभारणी करण्याच्या संधीची वाट पाहत आहेत आणि सध्या सुरू असलेल्या युक्रेन संघर्षाच्या शांततापूर्ण निराकरणासाठी भारतीय दृष्टीकोनावरपण पंतप्रधान चर्चा करणार आहेत.

# काटकसरीने घर चालविणाऱ्या महिलांसाठी लाडकी बहीण योजना - एकनाथ शिंदे

रत्नागिरी, २१ ऑगस्ट : 'माझी लाडकी बहीण ही योजना सरकारने अतिशय शुद्ध मनाने राबवली आहे. सर्वसामान्य कुटुंबातल्या महिला काटकसरीने घर चालवतात. त्यांना हातभार लावण्यासाठी ही योजना आणली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत लाडकी बहीण योजनेच्या प्रचार आणि प्रसारासाठी रत्नागिरीतील चंपक मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या महिला मेळाव्यात ते बोलत होते. ते म्हणाले, महिला सक्षम झाल्या, तरच देश सक्षम होईल. त्यांना दिलेले पैसे अर्थव्यवस्थेत येतील आणि त्या माध्यमातून त्यांच्या स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. आता राज्याची आर्थिक ताकद वाढत चालली असून, भविष्यात लाडकी बहीण योजनेची दीड हजारांची रक्कम तीन हजार किंवा त्यापेक्षाही जास्त होऊ शकते. या योजनेसह सरकारच्या महिलांसाठी अनेक योजना आहेत. त्यातून महिलांना लखपती झालेले पाहायचे आहे, अशी इच्छा मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. सगळीकडे नजर पोहोचत नाही तिथपर्यंत महिला दिसत आहेत. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यावर झाला नाही एवढा आनंद या योजनेचे हे चित्र पाहिल्यावर होत आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.या योजनेच्या वर्षभराच्या अंमलबजावणीसाठी ३३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ही योजना कायमस्वरूपी आहे. विरोधकांनी



कितीही अकांडतांडव केले, तरी योजना बंद होणार नाही. आमचे सरकार देणारे आहे, घेणारे नाही. आम्ही जे शब्द देतो, ते पाळतो. जे होणार नाही ते बोलत नाही. जे करू शकणार आहोत, तेच बोलतो, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर टीका केली. एका बाजूला या योजनेवर टीका करून, दुसरीकडे विरोधकांकडून योजनेचे श्रेय घेण्याचे प्रकार होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

बदलापूरमध्ये चिमुरड्या मुलीच्या बाबतीत घडलेली घटना दुर्भाग्यपूर्ण असून, सर्व दोषींना शिक्षा होण्यासाठी सर्व काही करण्याचे आदेश तातडीने देण्यात आले आहेत. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. मुलीबाळींच्या अब्रूशी खेळणाऱ्यांचे हात कलम केले जाण्याचा इतिहास महाराष्ट्राला आहे. त्यामुळे या घटनेतील दोषीलाही फाशीची शिक्षा मिळावी, यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली; मात्र या घटनेवरून विरोधक करत असलेले आंदोलन, तेथे दाखवले जात असलेले माझी लाडकी बहीण योजनेचे बोर्ड हे सगळे विकृत मानसिकतेचे राजकारण आहे. घाणेरडे राजकारण करणाऱ्यांना जनता माफ करणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. विरोधकांनी लोकसभा निवडणुकीवेळी गैरसमज पसरवले; मात्र जनता सुज्ञ असून, कोण सच्चा आणि कोण सावत्र भाऊ आहे, हे बहिणींना माहिती आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.राज्यातील दोन कोटीपेक्षा अधिक महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची भूमिका महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्र्यांनी घेतली. त्यात अनेक योजना असल्या, तरी माझी लाडकी बहीण ही योजना अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचली आणि त्यांना भावली. अशासकीय कर्मचाऱ्यांनाही लाभ देणारी ही एकमेव योजना आहे. अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्यामुळे ती सर्वांपर्यंत पोहोचली. योजनेचा लाभ थेट महिलांनाच मिळावा, म्हणून संयुक्त खाते चालणार नाही, अशी अट ठेवण्यात आली होती. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री या मानलेल्या तीन भावांनी बहिणींना रक्षाबंधनाच्या आदल्या दिवशीपासून ओवाळणी द्यायला सुरुवात केली, असे प्रतिपादन महिला-बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी यावेळी केले.

## शेणखत;चारा उत्पादनाने दुग्ध व्यवसाय फायदेशीर : राज्यपाल हरिभाऊ बागडे
## दुग्धोत्पादनातून येईल मराठवाड्यात समृद्धी-राधाकृष्ण विखे पाटील

छत्रपती संभाजीनगर - दुग्धोत्पादन करतांना मिळणारे शेणखताचा पर्यायी खत म्हणून केलेला वापर आणि स्वतः पशुपालकाने आपल्या जनावरांसाठी केलेले चारा उत्पादन केल्यास दुग्धव्यवसाय हा फायदेशीर व्यवसाय होऊ शकतो,असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी केले.

शासनाने दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी आणि दुधाळ जनावरांसाठीही अनुदान दिले आहे. त्याचा लाभ घेऊन मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी दुग्धव्यवसायाकडे लक्ष दिल्यास मराठवाड्याची प्रगती होऊन समृद्धी येईल, असे प्रतिपादन महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज केले.



चित्ते पिंपळगाव येथे गोसंवर्धन सहकारी दूध संघाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखेपाटील, खासदार संदिपान भुमरे, संचालक राजेंद्र जयस्वाल, रामू काका शेळके, जगन्नाथ काळे यांच्यासह गोसंवर्धन सहकारी दूध संघाचे संचालक मंडळ व सदस्य उपस्थित होते.

श्री.विखे पाटील म्हणाले की, ग्रामीण भागाचा विकास होण्यात सहकार चळवळीचा मोठा हातभार आहे. शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य करण्यासाठी आणि शेतमालाला योग्य भाव देण्यासाठी सहकार चळवळ महत्त्वपूर्ण ठरली आहे. सद्यस्थितीत शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन दुग्ध व्यवसायाकडे वळावे. मराठवाड्यात दूध उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न करावेत. हे करतांना आपल्या दूध विकास संस्था किंवा दूध संघ हे टिकवले पाहिजेत.शासनाने मराठवाड्यातील दूध उत्पादनासाठी तसेच दुधाळ जनावरांच्या वाटपासाठी अनुदानही देऊ केले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील दूध उत्पादन व त्यायोगे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे हा हेतू आहे. दुध हे शुद्ध व निर्भेळ असायला हवे. त्यामुळे दुधात भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. मात्र दूध भेसळ करणाऱ्या विरुद्ध शेतकऱ्यांनी आणि दूध संघाने ही भूमिका घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

राज्यपाल हरीभाऊ बागडे म्हणाले की, सर्व सभासदांनी गोसंवर्धन सहकारी दूध संघाची स्थापना आलेल्या विविध अडचणी आणि दूध उत्पादन, विक्री, वितरण या संदर्भातल्या विविध आठवणींना उजाळा दिला. शेतकऱ्यांना दूध उत्पादनाचा खर्च हा रासायनिक खताला पर्याय म्हणून शेणखत या सेंद्रिय खताचा उपयोग केल्यानंतर त्यांचा उत्पादन खर्च हा निघून फायद्याची शेती व दूध उत्पादन ठरू शकते. शेतकऱ्याने दूध उत्पादन करताना जनावरांसाठी आवश्यक असलेला शेत चारा आपल्याच शेतामध्ये पिकवून त्याचा उपयोग केला तर दुधाचा उत्पादन खर्च हा कमी होऊन जास्तीत जास्त नफा मिळू शकतो असे त्यांनी सांगितले.

खासदार संदिपान भुमरे यांनी गोसंवर्धन दूध उत्पादन शेतकऱ्यांना दूध उत्पादन सहकारी संस्थेने शेतकऱ्यांना आर्थिक विकासाचा मार्ग दिला असल्याचे प्रतिपादन केले. प्रमाणिकपणे प्रयत्न केल्यामुळे गोसंवर्धन दूध संस्था पन्नास वर्षाचा टप्पा गाठू शकले ही एक जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले .संस्थापक हरिभाऊ बागडे यांनी या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर वेळोवेळी भूमिका घेऊन शेतकऱ्यांचे हित करण्याचा प्रयत्न केला असल्याचेही भुमरे यांनी सांगितले. गो संवर्धन दूध उत्पादन संघाचे संचालक मंडळातील सदस्य राजेंद्र जयस्वाल, रामू काका शेळके, जगन्नाथ काळे, यांच्यासह अमोल गावंडे, अंबादास बागडे, भाऊराव गावंडे, मारुती गावडे यांचा सत्कार करण्यात आला. जास्त दूध संकलन करणाऱ्या सुखदेव बागडे, संजय झिंजुर्डे, नारायण कसबे, शंकर शेजुळ, धुरपताबाई लंगडे या शेतकऱ्यांनाही सन्मानित करण्यात आले.

## मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमावर रत्नागिरी राष्ट्रवादी काँग्रेसचा बहिष्कार

रत्नागिरी, २१ ऑगस्ट, : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्यावर रत्नागिरी राष्ट्रवादी तालुका आणि शहर काँग्रेसने बहिष्कार घातला.

रत्नागिरीतील सर्व विकासकामे फक्त शिंदे गट शिवसेनाच करते आहे का, महायुती म्हणून राष्ट्रवादीला नेहमी दुजाभाव का दिला जातो, हा प्रश्न आहे. लोकार्पण सोहळ्यासाठी पालकमंत्री दुजाभाव करत नसतील तर कुणाला महायुतीचे लोक आलेले आवडत नाहीत, हे शिंदे गटाने स्पष्ट करावे अन्यथा रत्नागिरी शहर आणि तालुका राष्ट्रवादी यापुढे सगळ्याच कार्यक्रमांवर बहिष्कार टाकेल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रत्नागिरी तालुकाध्यक्ष ॲड बंटी वणजू यांनी दिला आहे.

रत्नागिरी तालुक्यातील महायुतीच्या विकासकामांमध्ये सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेसला डावलले जात आहे. हे असेच मागील काही महिन्यांपासून चालू आहे. सिंधुरत्न योजनेच्या सदस्यपदी अजित यशवंतराव हेसुद्धा आहेत, पण त्यांनाही डावलल जात आहे.

## भारतात वर्षभरात ७.३ कोटी नव्या इंटरनेट ग्राहकांची भर



नवी दिल्ली : भारतात गेल्या वर्षभरात ७.३ कोटी नव्या इंटरनेट ग्राहकांची भर पडली आहे. देशात मार्च २०२३ मध्ये ८८.१ कोटी इंटरनेट ग्राहक होते. तर मार्च २०२४ मध्ये ही संख्या ९५.४ कोटी झाली. गेल्या एका वर्षात तब्बल ८.३० टक्के इंटरनेट ग्राहक वाढले आहे. भारतीय दूरसंचार नियमक प्राधिकरणाच्या (ट्राय ) वार्षिक अहवालात ही माहिती पुढे आली आहे.

या अहवालात विविध सेवांमधील लक्षणीय वाढीचा कल आणि प्रमुख मापदंड अधोरेखित करण्यात आले आहेत. भारतात दूरध्वनी जोडण्यांचे एकूण प्रमाण मार्च २०२३ च्या अखेरीस ८४.५१ टक्के होते ते मार्च २०२४ अखेरपर्यंत १.३९ टक्क्यांच्या वार्षिक दराने ८५.६९ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे या अहवालात दिसून आले आहे. यासोबतच ब्रॉडबँड सेवांनी त्यांचा चढता कल कायम राखला आहे, ब्रॉडबँड ग्राहकांची संख्या मार्च २०२३ मधील ८४.६ कोटींवरून मार्च २०२४ मध्ये ९२.४ कोटीपर्यंत वाढली असून हा मजबूत वाढीचा दर ९.१५ टक्के आहे. देशातील दूरध्वनी ग्राहकांची संख्या मार्च २०२३ अखेर ११७.२ कोटी होती ती मार्च २०२४ अखेरीस ११९.९ कोटीपर्यंत वाढली, हा वार्षिक वाढीचा दर २.३० टक्के इतका आहे. दरमहा प्रति ग्राहक सरासरी मिनिटे वापर हा २०२२- २३ या वर्षातील ९१९ वरून २०२३- २४ मध्ये ९६३ पर्यंत वाढला आणि हा वाढीचा दर ४.७३ टक्के आहे. यासोबतच समायोजित सकल महसूल देखील २०२२-२३ मधील २,४९,९०८ कोटी रुपयांवरून २०२३- २४ मध्ये २,७०,५०४ कोटी रुपयांपर्यंत वाढला असून हा वाढीचा दर ८.२४ टक्के आहे.

## हवाई दलाच्या विमानातून पडली बॉम्बसदृष्य वस्तू; घटनास्थळी स्फोट होऊन पडला ८ फुटांचा खड्डा

जैसलमेर, २१ ऑगस्ट : राजस्थानच्या जैसलमेरमधील रामदेवरा भागात हवाई दलाच्या लढाऊ विमानातून आज, बुधवारी बॉम्बसदृश वस्तू पडल्याने मोठा स्फोट झाला. पोखरण फील्ड फायरिंग रेंजमध्ये ८ फूट खोल खड्डा तयार झाला आहे. निर्जन भागात ही घटना घडली. यामुळे कोणतीही जीवितहानी झालेली नाही. यासंदर्भात स्थानिक ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार आज, बुधवार दुपारी १२ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. गावातून खूप कमी उंचीवरून एक विमान उडत होते. दरम्यान, गावातील लोकवस्तीपासून एक किलोमीटर अंतरावर मोठा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज ऐकून गावातील लोक घटनास्थळी पोहोचले.घटनेची माहिती मिळताच रामदेवरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतल्याचे पोलिस अधीक्षक गोपाल सिंह भाटी यांनी सांगितले. पोलिसांनी लष्कर, बीएसएफ आणि इतर सुरक्षा एजन्सीच्या अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली आहे. पोकरण येथील आर्मी रेंजपासून १५ किलोमीटर अंतरावर ही घटना घडली. पोकरण फील्ड फायरिंग रेंज जवळच आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## मांगीरबाबा यात्रेस पालकमंत्री अब्दुल सत्तार यांची भेट

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२०, तालुक्यातील मंगरूळ येथे सुरू असलेल्या श्री मांगीरबाबा यात्रा महोत्सवास पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांनी भेट दिली. यावेळी ना. अब्दुल सत्तार यांनी भाविकांशी संवाद साधत श्री मांगीरबाबा यात्रा उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

श्री मांगीरबाबा देवस्थानला तिर्थक्षेत्राचा दर्जा देऊन येथे भाविक भविकाभक्तांच्या सोयीसाठी पायाभूत मूलभूत सुविधांची कामे करण्यासाठी निधी



उपलब्ध करुन देवू अशी ग्वाही ना. अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी दिली.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा गाढे, माजी जि.प. अध्यक्ष श्रीराम महाजन, कृउबा समितीचे माजी सभापती रामदास पालोदकर, संचालक श्रीरंग पा.साळवे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, शंकरराव खांडवे, मारुती पा वराडे, मधुकरराव गवळी यांच्यासह सरपंच निवृत्ती वरपे प्रकाश पवार , शिवाजी बर्डे,, संपत वरपे, श्रावण हासे, राजु वडनरे ,दिनकर ढोरमारे, दादा मोजे, , शिवदास दनके आदिंसह शिवसेना पदाधिकारी,कार्यकर्ते, लाभार्थी, गावकरी उपस्थित होते.

## लोहा शहरात धोकादायक उघड्या डीपी बंदिस्त करा,विज कर्मचाऱ्यांच्या हालगर्जीपणाला लगाम लावावा : नामदेव कटकमवर

लोहा - विद्युत मंडळाच्या हलगर्जीपणाचा फटका अनेकदा जनतेला सहन करावा लागत आहे.पावसाचे चार थेंब पडले की विज गुल होते बिघाड झालेल्या विज जोडीला कर्मचाऱ्यांच्या हालगर्जीपणाचा फटका जनतेला सहन करावा लागत आहे. शहर व परिसरातील बिगाड विज दुरुस्ती खाजगी व्यक्तीवर अवलंबून .अशी परिस्थिती आहे त्यातच शहरातील अनेक विद्युत डीपी उघड्या असून त्या अंत्यत धोकादायक आहेत .त्यामुळे जीविताची हानी होऊ शकते यामुळे शहरातील उघड्या डीपी तात्काळ व्यवस्थित करण्यात याव्यात अशी मागणी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार यांनी निवेदनाद्वारे वरिष्ठांकडे केली आहे.

लोहा वीज वितरण विभागाच्या कारभारा विषयी नागरिकांना नेहमीच फटका सहन करावा लागत आहे . शहरातील वीज पुरवठा



बंद केव्हा होईल चालू केव्हा होईल यांचा नेम नाही.अशी परिस्थितीत गल्लोगल्ली बघायला मिळत आहे.ज्या डीपी (रोहित्र) उघड्यावर आहेत.या पूर्वी डीपी धोका होऊ नये म्हणून बंद बॉक्स मध्ये असत त्याची विज वितरणाच्या कर्मचारी नियुक्त आसत, त्याला कोंडी किल्ली असायची पण अलीकडच्या काळात या विभागावर कोणाचा वचक राहिला नाही .विशेषतः लोहा शहर व तालुक्यात ही अवस्था आहे आणी बिघाड दुरुस्ती एकाच खासगी व्यक्तीवर अवलंबून आहे.

शहरातील श्रीराम नगर वलांडीकर, आंबेडकर नगर, नांदेड ते लातुर स्मशानभुमी समोर व इतर भागात रोहित्र (डीपी) उघडी आहे तेथे वस्ती आहे .हे अत्यंत धोकादायक असूनही संबधित मात्र याकडे दुर्लक्ष करतात ही मोठी शोकांतिका आहे शिवाय वेली, झाडे झुडपानी डीपी वेढलेल्या आहेत

शहरात जेथे जेथे असा उघड्या डीपी (रोहित्र) आहेत त्या सगळ्या बंदिस्त करण्यात .अशी मागणी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवर यांनी केले आहे

## कुजलेल्या आस्थेत मृतदेह आढळला

तभा वृत्तसेवा

पिशोर दि.२१ : कन्नड तालुक्यातील निभोरा शिवारात कुजलेल्या अवस्थेत गळफास घेतलेला मृतदेह आढळला. ही घटना रविवारी (दि.१८)सकाळी अकरा वाजता उघडकीस आली.घटनेची माहिती पिशोर पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शिवाजीराव नागवे यांना गुरे चारण्यासाठी गेलेल्या विजय पुंडलिक पवार यांनी माहिती दिली. सपोनि नागवे, पोलिस उपनिरीक्षक विश्वजित फरताडे, लालचंद नागलोद, साईनाथ घुगे हे घटनास्थळी दाखल झाले. निभोरा शिवारात गौताळा अभयारण्य कंपार्टमेंट ६९ मधील डोगरात वनविभागाच्या हद्दीतील सागाच्या झाडास २५ ते ३५ वर्षीय पुरुषाचा लटकलेल्या मृतदेह आढळला. अंगात काळ्या रंगाचा ती शर्ट डॉलर कंपनीची काळ्या कलरची पॅन्ट व उजव्या हातावर महादेवाचे चित्र काढलेले तसेच खिशात तंबाखूची पुडी आढळून आली.पिशोर पोलिसांनी वनविभागाचे वनरक्षक एच.के.वाघ,वनमजुर शेषराव नामदेव वाघ यांच्या समक्ष पंचनामा केला. प्राथमिक आरोग्य केंद्र करंजखेड येथील डॉ.राजपूत यांनी शवविच्छेदन केले. कुजलेल्या अवस्थेतील मृतदेहची ओळख पटलेली नाही. कुणाच्या ओळखीस असल्यास पिशोर पोलिस ठाणे गाठून अथवा ७९७२७७४७२४,किंवा ७५१७५६६०८२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन सपोनि शिवाजीराव नागवे यांनी केले.



## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-४३१ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २/०७/२०२४

अर्जदार ०:- धनराज महारू राठोड रा. भिलदरी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचात कार्यालय सायगव्हाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या पत्नीचे मृत्युचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या पत्नीचा मृत्यु दिनांक १०/०५/२००१ रोजी भिलदरी ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार वडीलांचा मृत्यु दिनांक दिनांक १०/०५/२००१ रोजी भिलदरी ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या वडीलांचा मृत्यु दिनांक १०/०५/२००१ रोजी भिलदरी ता. कन्नड येथे मृत्यु झाल्याचे मृत्यु प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १०/०५/२००१ रोजी भिलदरी ता. कन्नड येथे मृत्यु झाल्याचे मृत्यु प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४./०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-३६३ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १४/०५/२०२४

अर्जदार :- अनिल कचरू गांगुर्डे रा. नरसिंगपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय चिमनापुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज ॲड डी. के. साळवे यांच्या मार्फम अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक २४/०९/२०१४ रोजी चिमनापुर ता. कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक २४/०९/२०१४ रोजी चिमनापुर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक २४/०९/२०१४ रोजी चिमनापुर ता. कन्नड ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०७/०८/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २४/०९/२०१४ रोजी चिमनापुर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १८./०३/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद /सिआर-४३० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २५/०७/२०२४

अर्जदार ०:- सविता पि. उत्तम चव्हाण (सविता भ्र. ज्ञानेश्वर राठोड) सायगव्हाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय सायगव्हाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड डी. के. साळवे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचे जन्म दिनांक ०१/०१/१९४ रोजी सायगव्हाण ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०१/०१/१९४ रोजी सायगव्हाण ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०१/०१/१९४ रोजी सायगव्हाण ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१/०१/१९९४ रोजी सायगव्हाण ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-२१९ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २४/०१/२०२४

अर्जदार ०:- मुस्ताक नजीर शेख रा. पिशोर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड. डी. के. साळवे यांच्या मार्फत अर्ज सादर करून स्वःतहाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ११/०५/१९९० रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ११/०५/१९९० रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामामाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ११/०५/१९९० रोजी पिशोर ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/१/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ११/०५/१९९० रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २५/०१/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/मिआर-२१८ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २४/०१/२०२४

अर्जदार : शहेनाजीवी युसुफ पठाण रा. पळशी वु. ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पळशी वु. ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड. डी. के. माळवे यांच्या मार्फत अर्ज सादर करून स्वःतहाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०३/०५/१९६७ रोजी पळशी बु. ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ०३/०५/१९६७ रोजी पळशी बु. ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०३/०५/१९६७ रोजी पळशी बु. ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप अमल्यास त्यांनी हे ज़ाहिर प्रगटन प्रसिध्द आल्या पामुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/१/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०३/०५/१९६७ रोजी पळशी बु. येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४४/५७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया महीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-२२० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २४/५९/२०२४

अर्जदार : शाईन अयुबखा पठाण रा. पळशी बु. ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पळशी बु. ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड. डी. के. साळवे यांच्या मार्फत अर्ज सादर करून स्वःतहाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०७/०१/१९९१ रोजी पळशी बु. ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ०७/०१/१९९१ रोजी पळशी बु. ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०७/०१/१९९१ रोजी पळशी बु. ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०७/०१/१९९१ रोजी पळशी बु. येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी/जन्म-मृत्यू नोद/गिआर-३०८ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक ०५/०६/२०२४

अर्जदार : आदिल जाकेर शहा रा. पिंपरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय पिंपरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अँड भगवान ज. चव्हाण यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार याच्या जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/०१/२००६ रोजी पिंपरखेडा ता. कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/०१/२००६ रोजी पिंपरखेडा ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/०१/२००६ रोजी पिंपरखेडा ता. कन्नड ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १०/०७/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १०/०१/२००६ रोजी पिंपरखेडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ५/०६/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**

## जाहिर प्रगटण

प्रकरण :- गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७७ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात येते की, श्री. हंमत संजयकुमार अग्रवाल, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७७, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे पहील्यामजल्या वरील गाळा क्र.२४ ज्याची लांबी : उत्तर-दक्षिण २५ फुट म्हणजेच ७.६२ मीटर व रुंदी पुर्व-पश्चिम १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३००.०० चौरसफुट म्हणजेच २७.८१ चौरसमीटर ज्याची चतुःसिमा पुर्वेस गाळा क्रं २५, पश्चिमेस गाळा क्रं २३, दक्षिणेस : बाजार समितीच्या पाय-या, उत्तरेस बाजार समितीची मोकळी जागा वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्र. २४ हा श्री हेंमत संजयकुमार अग्रवाल रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून राहीलेल्या उर्वरीत (०१/०९/२०३५) पर्यतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. २४/०८/२०१८ अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते श्री. एकनाथ तोताराम नाईकवाडे, रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (०१/०९/२०३५) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत श्री एकनाथ तोताराम नाईकवाडे, रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सचिव | सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २००८/मशाका / जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नींद /सिआर-५७९ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २०/०८/२००८

अर्जदार ०:- विनोद दामोधर शिंदे रा. हम्ता ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय हस्ता ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड व्ही. के मोहिते यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांच्या जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०९/०५/१९६० रोजी हस्ता ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ०९/०५/१९६० रोजी हस्ता ता. कन्नड कामामाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०९/०५/१९६० रोजी हस्ता ता. कन्नड येथे आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप अमल्याम त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०९/०५/१९६० रोजी हस्ता ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २.००८/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया महीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-४४१ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक ९।/०७/२०२४

अर्जदार : सोनाजी लक्ष्मण खरवडे रा. बहिरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय बहिरगांव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड बी. जे. चव्हाण यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांचे मुलीचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचे मुलीचा जन्म दिनांक ०१/०५/२०१८ रोजी बहिरगांव ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दिनांक ०१/०५/२०१८ रोजी बहिरगांव ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दिनांक ०१/०५/२०१८ रोजी बहिरगांव ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १५०१/०५/२०१८ रोजी बहिरगांव ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ३.१./०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे सौ. छाया देविदास पानकडे वय - ४२ वर्ष, धंदा घरकाम रा. गणेशवाडी, पो. कायगाव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांनी दिलेल्या माहिती व अधिकारानुसार श्री. रविंद्र विश्वनाथ बोकन वय ३३ वर्षे, धंदा मजुरी रा. जुने गाव रांजणगाव (शे.पु.) ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मालकी व ताब्यातील मौजे जुने, रांजणगाव शें.पू.. ता. गंगापूर जि. औरंगाबाद हद्दीतील मालमत्ता क्र. २६३ ज्याचे क्षेत्रफळ ३७५ चौ. फु. प्लॉट ज्याचा मिळकत क्रमांक २६३ आहे.

सदरची गिळकत माझे पक्षकार यांनी तोंडी कराराद्वारे खरेदी करण्याचा करारनामा केला आहे. त्याची चर्तुसीमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस : रस्ता | पश्चिमेस : गणेश काळवणे यांची मिळकत

दक्षिणेस : लिहून घेणार यांची सहान जागा, | उत्तरेस : सुधाकर ओंकार बोकन

या संदर्भात कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क, उजर, कर्ज, आदेश, चोळीबांगडी, सरकारी, निमसरकारी, वित्तीय संस्था या बँकेचे कर्जबोजा गहाण, तारण, दान, बक्षीस, हक्कसंबंध, डिक्री, इ. असल्यास सदर जाहीर प्रगटन छापून आल्याच्या दिवसांपासून ७ दिवसांच्या आत लेखी आक्षेप मूळ कागदपत्रे व पुराव्यासह माझ्या पत्त्यावर अथवा प्रत्यक्ष भेटून सादर करावा. मुदतीत आक्षेप न आल्यास सदर मिळकत निर्विवाद समजून माझे पक्षकार पुढील व्यवहार करतील याची नोंद घ्यावी.

मार्फत

ॲड. नामदेव वि. सावंत (सावते)

मीनाताई ठाकरे मार्केट, महाराणा प्रताप चौक, बजाजनगर, एमआयडीसी वाळूज, औरंगाबाद मो. नं. ९४२०४०१६३३

**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**

## जाहिर प्रगटण

प्रकरण :- गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७७ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात

येते की, श्री सुमीत जिनेंद्र महाजन, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली चे हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७७, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे पहील्यामजल्या वरील गाळा क्रं.२९ ज्याची लांबी : पुर्व-पश्चिम २५ फुट म्हणजेच ७.६२ मीटर व रुंदी: उत्तर-दक्षिण १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३००.०० चौरसफुट म्हणजेच २७.८१ चौरसमीटर ज्याची चतुःसिमा पुर्वेस : बाजार समितीची जागा, पश्चिमेस बाजार समितीची जागा, दक्षिणेस : गाळा क्रं ३०, उत्तरेस : गाळा क्रं २८ सदरील गाळा क्र. २९ हा श्री. सुमीत जिनेंद्र महाजन रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून राहीलेल्या उर्वरीत (०१/०९/२०३५) पर्यंतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. १६/०५/२०१९ अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते श्री. निखिल राजेन्द्रप्रसाद अग्रवाल, रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (०१/०९/२०३५) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत श्री. श्री. निखिल राजेन्द्रप्रसाद अग्रवाल, रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद

करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सचिव | सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नांद/सिआर-५० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १६/०८/२००८

अर्जदार :- रावसाहेव अण्णा सपकाळ रा. टाकळी अंतुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय टाकळी अंतुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड डी. एम. हरणे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांच्या मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०३/०८/२००७ रोजी टाकळी अंतुर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०३/०८/२००७ रोजी टाकळी अंतुर ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०३/०८/२००७ रोजी टाकळी अंतुर ता. कन्नड येथे आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाम काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्याम अर्जदारास दिनांक ०३/०८/२००७ रोजी टाकळी अंतुर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिना दिनांक १६./०८/२००४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ३३०/२०२४

अर्जदार : १) जनाबाई भ्र. रामनाथ जाधव, वय ६३ वर्षे धंदा घरकाम रा. वसुसायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) बाबासाहेब रामनाथ जाधव, वय ४८ वर्षे धंदा मजुरी रा. वसुसायगाव ता. गंगापुर ह.मु. रांजणगाव शे.पु ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) ताराबाई भ्र. दत्तु बनगे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम रा. टाकळी ता. जि. छत्रपती संभाजीनगर ४) उज्वला भ्र. रामेश्वर कापसे वय ३७ वर्षे, धंदा घरकाम रा. पोटुळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.पी. लबडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.३ व ४ ह्या आपसात नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र.२ हा त्यांचा भाऊ आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे रामनाथ देवराव जाधव हे मौजे वसुसायगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०६/११/२००३ रोजी मयत झालेले आहे. मयत रामनाथ देवराव जाधव यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयत रामनाथ देवराव जाधव यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे आधिक्क्यानी आज दिनांक १३/०२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 325/2024

अर्जदार : १. परिगाबाई भ्र.आबासाहेब सोनवणे, रा. पाडळसा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद २. वैशाली भ्र.अर्जुन अकोलकर, रा.उपला, कालीमठ, औरंगाबाद ३. कविता भ्र.विलास पवार, रा. चापानेर, ता.कन्नड, जि. औरंगाबाद ह.मु.पडेगाव, औरंगाबाद ४. लक्ष्मण पिता आबाराव सोनवणे, रा. पाडळसा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

प्रतिपक्षी : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी आबासाहेब शेकनाथ सोनवणे यांचा दि.०४/१०/२०२१ रोजी मौजे पाडळसा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.एस. पी.लबडे, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे सायटेशन नोटीस माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे. दि. १६/०८/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 331/2024

अर्जदार : १. सुमनबाई भ्र.भिकन शेलार, २. बाबासाहेब पिता भिकन शेलार, ३. सकुबाई उर्फ जिजाबाई भ्र.विष्णु रोरे, रा.तळेगाव, ता.भोकरदन, जि. जालना ४. गजानन पिता भिकन शेलार, वरील १, २, ४ रा. वसुसायगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

प्रतिपक्षी : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी भिकन किसन शेलार यांचा दि.०४/११/२०२३ रोजी मौजे वसुसायगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि. १६/०८/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.२९६७/कावि-३१०४ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१९.०८.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- गीता राजु साळवे

वय-१३ वर्ष व्यवसाय- शिक्षण, अ.पा.क.वडील नामे - राजु नारायण साळवे, वय -५१ वर्ष, व्यवसाय - शेती रा. वडोदचाथा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय वडोदचाथा. ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी राजु नारायण साळवे रा. वडोदचाथा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांची मुलगी नामे गीता राजु साळवे हिचा दिनांक १३.०८.२०१२ रोजी मौजे वडोदचाथा येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, गीता राजु साळवे यांचा दिनांक १३.०८.२०१२ रोजी मौजे वडोदचाथा येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राह्य धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.२५५४/कावि-२४८५ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१२.०८.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- रंगनाथ किसन गिरणारे, वय-६० वर्ष व्यवसाय- शेती, रा. जळकी बाजार ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु.जळगांव ता.जि. जळगांव विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय जळकी बाजार ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी रंगनाथ किसन गिरणारे, रा. जळकी बाजार ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक ०१.०६.१९६४ रोजी मौजे जळकी बाजार येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, रंगणाथ किसन गिरणारे, यांचा दिनांक ०१.०६.१९६४ रोजी मौजे जळकी बाजार येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राह्य धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र.१४१/२०२४

अर्जदार - १) मंगेश आबासाहेब तायडे, वय २३ वर्ष, बंदा-शेती, रा. नागापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद २) लक्ष्मीनारायण आबासाहेब तायडे, वय ४३ वर्षे, धंदा-शेती, रा. नागापूर ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) रजनी नारायण डोंगरे, वय- ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. साई वृंदावन कॉलनी औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ४) सुरेखा आबासाहेब तायडे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे - जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज :- वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

मा. महोदय, ज्याअर्थी अर्जदार यांचे विधीज्ञ ॲड. डी.डी. जोशी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ-बहीनी असुन अर्जदार क्र. ४ ही अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई आहे, अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचे पती नामे आबासाहेब यादवराव तायडे हे होते ते दिनांक २२/०३/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे नागापुर येथे वृध्दापकाळान मयत झालेले असून त्यांच्या अंत्यविधी मौजे नागापुर येथेच झालेला आहे. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी. तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी तसेच तहसिल कार्यालय नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी सांगीतल्यावरुन सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन अर्ज दाखल करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयताचे एकमेव वारस असुन अर्जदार क्र. १ ते ४ शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. एकमेव अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर मयतास वारस आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, अक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात स्वतः अगर आपले विधीज्ञा मार्फत हजर राहून उजर, अक्षेप सादर करावा मुदतीत उजर, अक्षेप न आल्यास अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १७/०८/२०२४

आदेशावरुन

सहा. अधिक्षक दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पदर कर्तृत्वाचा!

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# हाथी मेरे साथी... पार्वती बरुआ



**१२ ऑगस्ट हा जागतिक हत्ती दिन! हत्तींचे संरक्षण, संवर्धन व्हावे यादृष्टीने हा दिवस जगभरात पाळला जातो. या दिनाच्या निमित्ताने पार्वतीताईंच्या कार्याची महती जाणून आपणही हत्तींच्या रक्षणासाठी वचनबद्ध होऊ या !**

आशियातील प्रथम महिला माहूत होण्याचा मान आसामच्या पार्वती बरुआ यांनी मिळविला आहे. हत्तीसारख्या विशाल प्राण्याला पकडणे, पाळणे, प्रशिक्षित, नियंत्रित करणे कठीणच! पण, हे त्या लीलया करतात. सत्तर वर्षांच्या पार्वतीताईंनी आजवर सहाशेपेक्षा जास्त जंगली हत्तींना प्रशिक्षित केलं आहे. इतकेच नव्हे तर माहुतांनाही त्या प्रशिक्षण देतात. अनियंत्रित झालेल्या, उधळलेल्या हत्तींनाही नियंत्रित करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. पुरुषांची मक्तेदारी असलेल्या क्षेत्रात प्रवाहाविरुद्ध वडिलांच्या मार्गदर्शनात वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी धाडसाने पाऊल ठेवले. ते आजतागायत हत्तींशी स्नेह, मैत्रभाव जपत त्यांचे कार्य अखंड सुरू आहे. त्यांनी जणू हत्तींना आपले जीवन समर्पित केले आणि अखेरच्या श्वासापर्यंत आपलं हे कार्य सुरू रहावं, अशी त्यांची इच्छा आहे.

अनन्यसाधारण कर्तृत्वाच्या धनी असलेल्या पार्वतींनी वडिलांकडून मिळालेलं परंपरागत ज्ञान हत्तींच्या प्रशिक्षण आणि आरोग्यविषयक समस्यांचं निवारण करण्यासाठी उपयोगात आणले. त्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन नवीन माहुतांना त्या समजावून सांगतात. माहुतास शास्त्रशुद्ध ज्ञान असावे, यावर त्यांचा विशेष भर असतो.

आसाममधील गौरीपूर येथील राजघराण्याशी संबधित जमीनदारकन्या पार्वती यांनी वडिलांच्या पावलांवर पाऊल ठेवून वडीलांसारखीच हत्ती विशेषज्ञ म्हणून ख्याती प्राप्त केली आहे. त्या सांगतात,'माझं वय एक महिना सतरा दिवसांचं असताना वडील मला घेवून पहिल्यांदा हत्तीवर बसले तेव्हा मी हसले होते, ही कथा आईच्या तोंडून ऐकत मी मोठी झालेय.' लहानपणीच त्या हत्तींच्या संपर्कात आल्या अन् हत्तींशी कायमस्वरूपी ऋणानुबंध जुळले. आठ भावंडांमध्ये वडिलांप्रमाणे निपुण होऊन त्यांचे कार्य मात्र यांनी एकटीनेच पुढे नेले, हे विशेष! त्यांचे वडील प्राकृतेश चंद्र बरुआ खूप श्रीमंत होते. त्यांच्याकडे चाळीस हत्ती होते, त्यांचं करायला नोकरचाकर, मोठ्ठा वाडा, लक्ष्मी अगदी प्रसन्न होती. पार्वती यांना वाटले असते तर त्या ऐषोआरामात जीवन जगू शकल्या असत्या. पण, त्यांना जंगली हत्तींनी जणू साद घातली. मग, कडाक्याची थंडी, रणरणतं ऊन असो की मुसळधार पाऊस हत्तीवर बसून जंगल पालथे घालण्यात त्यांना वेगळाच आनंद मिळू लागला. वडील अनेकदा कुटुंबीयांसमवेत जंगलात राहून हत्ती व इतर माहुतांना प्रशिक्षण द्यायचे. तेव्हा त्यांचा भलामोठा ताफा असायचा. त्यात मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून शिक्षकसुद्धा असायचे. वडिलांची लाडकी लेक असल्याने त्यांचे बहुतांश बालपण वडिलांसोबत जंगलात हत्तींच्या सान्निध्यात गेले. त्या चौदा वर्षांच्या असताना त्यांनी आपल्या पित्याजवळ स्वतः हत्ती पकडण्याची इच्छा व्यक्त केली. पुरुषप्रधान संस्कृती त्यात जोखीम, साहस, आव्हानांनी भरलेलं पुरुषी क्षेत्र पण, वडिलांनी त्यांना नकार दिला नाही. उलट अत्यानंदाने त्यांचे गुरू होऊन प्रत्येक बारकाव्यासह हत्तींना पकडण्याचे तंत्र त्यांनी आपल्या लेकीला शिकविले.



कोकराझार जिल्ह्यातील जंगलात त्यांनी पहिला हत्ती पकडला. तो क्षण त्यांच्यासाठी अविस्मरणीय आहे. नाजूक चणीच्या पार्वती म्हणतात, हत्ती पकडणे हे काही खूप ताकदीचं काम नव्हे तर ते एक तंत्र आहे ज्यासाठी संयम, धैर्य, शांत डोकं व बुद्धीचातुर्य हवं असते, तशी थोडी नशीबाची साथही.' त्या पहिल्या प्रयोगानंतर त्यांची माहूत होण्याची ओढ वाढली. वर्ष १९७२ पासून त्या रीतसर माहूत म्हणून काम करू लागल्या. तेव्हापासूनच त्या हत्तीच्या संरक्षण प्रकल्पासाठीही धडाडीने कार्य करीत आहेत. तरीही जगाला त्यांची खूप माहिती नव्हती. पद्मश्री पुरस्काराने जनसामान्यांना माझी व माझ्या कार्याची माहिती झाल्याने मला या पुरस्काराने खूप आनंद झाला, असं त्या म्हणतात. 'क्वीन ऑफ द एलिफंटस्' हा त्यांच्यावरील माहितीपट खूप गाजला. त्यांच्या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली. त्यांना अनेक सन्मान मिळाले.

'हत्ती तसा शांत, स्नेहील आणि अनुशासित वृत्तीचा प्राणी असतो, त्याला प्रेमाची भाषा कळते' असे त्या सांगतात. मी त्यांच्या भावना समजू शकते, मी बोलावल्यावर ते लगेच माझ्याकडे येतात.' त्यांचे पाळीव हत्ती त्यांचे ऐकतात. साधारणतः पहाटे चार वाजता त्यांचा दिवस सुरू होतो. आपल्या प्रिय हत्तींना स्नान घालणे, इतर हत्तींना प्रशिक्षित करणे, खाऊपिऊ घालणे, जंगल सफारी करणे यात त्या व्यस्त असतात. हत्तींना सजवण्याची त्यांना मनापासून आवड आहे.

पार्वती यांनी पुलिन दास यांचेशी विवाह केला होता. पण, यांचे हत्तीप्रेम पतीस न रुचल्याने शेवटी पार्वती यांनी सत्तरच्या दशकात हत्तींसाठी पतीला सोडण्याची हिंमत दाखवली. अधिक जोमाने हत्ती मानव संघर्ष रोखण्यासाठी त्या सहाय्यक म्हणून कार्य करू लागल्या. जंगलं कमी झाल्याने दोघांनाही एकमेकांपासून धोका असतो. तो संभवू नये आणि सर्वांचं रक्षण व्हावं अशी त्यांची भूमिका असते. त्या मानव हत्ती संघर्ष कमी करण्यासाठी अनेक राज्यांना मदत करत असतात. त्यांचे जीवन म्हणजे रोमांच, थरार आणि विस्मयकारी अनुभवांचा खजिना आहे. अशा अनेक थरारक प्रसंगांपैकी त्यांनी हाताळलेला पश्चिम बंगालच्या मिदनापूर जिल्ह्यातील एक प्रसंग त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करतो. पन्नासपेक्षा अधिक हत्ती असलेल्या जंगली हत्तींचा कळप चुकून वस्तीलगतच्या रस्त्यावर येऊन धुमाकूळ घालू लागला. राज्यातील वन अधिकारी परिस्थिती नियंत्रणात आणण्यात यशस्वी होऊ न शकल्याने त्यांनी पार्वती बरुआ यांना पाचारण केलं. आपले चार हत्ती, इतर माहूत आणि त्यांच्या दलातील सहाय्यकांसह त्यांनी हत्तींना दिशा देत, त्यांच्या अधिवासात परत नेण्याचे काम शिताफीने केले. एकूण दोन आठवडे त्या परिस्थितीशी झुंजत होत्या पण माघार घेणे त्यांच्या स्वभावात नाही. वर्ष २००३ मध्येही छत्तीसगडमध्येही बिथरलेल्या हत्तीला नियंत्रित करून मोठा धोका त्यांनी टाळला होता. त्या म्हणतात,'माझे काम हत्तींना मानवापासून सुरक्षित ठेवणे आणि मानवाला हत्तींपासून वाचवणे असे दुहेरी आहे.' जंगली हत्तींना पकडणं, नियंत्रित करणं हे जोखमीचे काम होय. त्याला नेमका किती वेळ लागेल? हे सांगता येऊ शकत नाही. कोणत्याही प्राण्यांशी आपुलकीचे संबंध निर्माण होण्यास सहवास आणि त्यांचे जीवन सुरळीत राहण्यासाठी अधिवास या दोन महत्त्वपूर्ण बाबी आहेत, असं त्यांचं ठाम मत आहे. भावी पिढीला त्या सांगू इच्छितात की, कोणताही प्राणी असो तुम्ही त्याला प्रेम द्या, तो नक्कीच तुमचं ऐकेल. जंगल वाचविण्याचा प्रयत्न एकजुटीने करा, असं आवाहन त्या करतात. आपण निसर्गात खूप हस्तक्षेप, अत्याचार करतोय त्यावर प्रतिबंध घालून निसर्ग संवर्धन केल्यास सर्व प्राणिमात्र इथे गुण्यागोविंदाने राहू शकतील. अन्यथा संघर्ष अटळ आहे. केवळ सरकारवर जबाबदारी टाकून होणार नाही तर प्रत्येक नागरिकाने जंगल, वन, प्राणी संरक्षणासाठी वचनबद्ध असायला हवं.

त्या आपल्या कामगिरीवर असताना सोयीसाठी पुरुषी पोशाख परिधान करतात. जीन्स, टी शर्ट, जॅकेट, गॉगल, सोलर कॅप अशा सुयोग्य वेशात त्या सराईतपणे वावरतात. मात्र, इतर वेळी त्यांना आसामी साडी नेसायला मनापासून आवडतं. वेळ मिळाला की, त्या आपलं साडीप्रेमही जोपासतात. त्यांना चित्रपट बघायला आवडतं. वडील आणि निसर्गाला त्या गुरू मानतात. निसर्गशाळेत खूप शिकायला मिळतं, असं त्यांना वाटतं. सुखसोयींपासून दूर जंगलात अभावात राहणं त्यांनी स्वीकारल्याने त्यांना त्याचा कधी त्रास झाला नाही. प्रसंगी तंबूत साध्याशा गादीवर उशीविना, आजूबाजूला दोरखंड, साखळ्या, पहार अशा वस्तूंमध्ये त्या आरामात झोपू शकतात.

हत्ती प्रेम हं त्यांच्या जीवनाचे ध्येय बनले आणि त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य प्राण्यांच्या सेवेसाठी वाहून घेण्याचं ठरवलं. आसाममध्ये त्यांना हत्ती कन्या, हत्ती परी म्हणून संबोधलं जातं. त्या एशियन एलिफंट स्पेशालिस्ट ग्रुप, आययुसीएनच्या सदस्य आहेत. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी हत्ती संरक्षणविषयक अभ्यासपूर्ण भाषणेही दिली आहेत. हत्तींना वाचवण्यात आपले कसब पणाला लावून त्या सक्रिय असतात.

## गजाननवाणी

### नर्मदेने लावले, आपल्या करास त्या छिद्रा

भक्तसंतांजवळ लडिवाळ हट्ट धरतात. लाडक्या भक्तांचे हट्ट संतही पूर्ण करतात. असाच हट्ट बंकटलालने पिंपळगाववरून येताना महाराजांना केला होता, शेगावला राहण्याविषयी! महाराज शेगावला स्थिर झाले. मात्र, कधीकधी भक्त आग्रह नव्हे तर दुराग्रह करून एखादी गोष्ट करायला संतांना बाध्य करतात. त्यांच्या मनाविरुद्ध केल्यामुळे संकटाला निमंत्रण मिळतं. परंतु, संतांच्या जवळ शुभच असतं म्हणून, त्या संकटातही संत अद्भुत चमत्कार करतात आणि भक्तांना अचंबित करतात. त्यांना धन्य करतात. असाच प्रसंग नर्मदा नदीच्या बाबतीत घडला. सोमवारी येणाऱ्या अमावस्येला सोमवती अमावस्या म्हणतात. या दिवशी नर्मदेचे स्नान अवश्य करावे, अशी आख्यायिका आहे. म्हणून, शेगावचे बंकटलाल आणि इतर भक्तगण नर्मदेला जाण्यासाठी सज्ज झाले. त्यांनी महाराजांना चलण्यास आग्रह केला. महाराजांना मुळीच जायचे नव्हते. ते भक्तांना म्हणाले, माझी नर्मदा इथेच आहे. मी इथेच स्नान करीन. महाराजांचा शिष्यगण जबरदस्ती करू लागला नव्हे, दुराग्रह करू लागला. त्यावर,



वर्षा देशपांडे/ ८४२११ ७८००१

**समर्थ म्हणाले मी तेथ, आल्या होईल विपरीत,**
**मग तुम्ही दोष मात्र, देऊ नये आम्हाला**

पण, आपला हट्ट सोडायला भक्त तयार नव्हते. मग काय, या पूर्ण प्रवासात महाराज अगदी अलिप्त होते. नर्मदेहून वापस येताना रस्त्यावर गर्दी आहे म्हणून, बंकट आणि इतर शिष्यांनी नावेतून येण्याचे ठरवले. तसे त्यांनी महाराजांना सांगितले, त्यावर

***तुम्हास वाटेल, तेच करा आम्हा न काही विचारा***

असे ते शिष्यांना म्हणाले आणि त्यांच्यासोबत नावेत बसले पण घडले काय? नावेला छिद्र पडले. पाणी नावेत येऊ लागले. नावाड्यांनी नदीत उड्या टाकल्या. मात्र, महाराज निर्धास्त होते. 'गण गण गणात बोते' हे भजन मुखाने चालले होते. शिष्य परिवार फारच घाबरला आणि महाराजांना संकटातून वाचवा, म्हणून विनवणी करू लागला. इकडे

***तो निम्म्यावरी पाण्यात, नाव बुडाली लोटत लोटत,***
***एक फर्लांग गेली हो, काही लोक बोलती ऐसे,***
***मेली ही पाच माणसे, आता यांचा भरोसा नसे,***
***अथांग पाणी नर्मदेला***

आपल्या शिष्यांची स्थिती पाहून महाराज म्हणाले, तुम्ही घाबरू नका. तुमच्या जीवाला नर्मदा देवी धक्का लावणार नाही. त्यांनी नर्मदेचे स्तवन केले आणि चमत्कार घडला.

तो आतील पाणी निघून गेले. 'नर्मदेने लाविले, आपल्या करास त्या छिद्रा' आणि नाव पाण्यावर आली. नावेच्या सोबत एका बाईला शिष्यगणांनी बघितलं. एका बाईने ही नौका काठाला लावली. भक्तांना आश्चर्य वाटलं, त्यांनी महाराजांना विचारलं, ही बाई कोण?

***'तई महाराज वदले, अरे ती प्रत्यक्ष नर्मदा,***
***संशय तेथे न घ्यावा कदा, संकटामाजी देते सदा,***
***हात ती आपुल्या भक्ताते, म्हणून तिचा जयजयकार,***
***करा मोठ्याने एकवार, जय जय नर्मदे निरंतर,***
***ऐसेच रक्षण अंबे करी'***

संतांचा महिमा अगाध आहे. ते सोबत असले तर काळाची भिती नाही. ही गोष्ट खरी आहे. गावात आल्यानंतर शिष्य मंडळी कौतुकाने ही गोष्ट सगळ्यांना सांगू लागले.

## ब्रॅण्ड स्टोरी

निकिता गावंडे /९९७०६६३८१३

# कहाणी बिस्किटांची

'चला मागच्या वेळी प्रॉमिस केल्याप्रमाणे आज आपण बिस्किटांच्या भारतीय ब्रँड विषयी बोलू या,' बाबा चहाच्या कपात अख्खे मारी बिस्कीट बुडविण्याचा निष्फळ प्रयत्न करत बोलले. 'भारतात बिस्किटे अर्थातच इंग्रजांनी आणलीत. दिवाणखान्यात चहाबिस्किटांचा आस्वाद घेणारे इंग्रज आणि त्यांच्याकडे कुतूहलाने बघणारे भारतीय असं त्या काळात सामान्य दृश्य होते. ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी बिपिनचंद्र पाल यांच्या आत्मचरित्रात एका घटनेचा उल्लेख आहे. ब्रिटिशांच्या राजवटीत बिस्किटांची सर्वप्रथम ओळख झाली ती बंगाल प्रांताला! आणि, ही बिस्किटे निवडक मुस्लिम समुदायात झपाट्याने लोकप्रियदेखील झालीत. पण, हिंदू मात्र या नवीन खाद्यपदार्थाविषयी मनात संशय बाळगून होते. संशय असा होता की, ही बिस्किटे गैरमार्गाने तयार केली आहेत. एकदा काचार येथे एक इंग्रजाळलेले हिंदू कुटुंब चहासोबत बिस्किटं खात असताना काही हिंदूंनी पाहिलं आणि त्यामुळे एकच गोंधळ उडाला. ही माहिती इतर समाजापर्यंत पोहचली. बिस्किटाच्या रूपात चहाच्या कपात धर्म बुडाला की काय? अशा आवेशात ते पेटून उठले आणि सरते शेवटी ती बिस्किटं बनवणाऱ्या कंपनीला आमची ही बिस्किटे कुणाचाही स्पर्श न होता मशीनने तयार केली आहेत, अशी जाहिरात करावी लागली. 'बापरे, त्या काळातले सोवळे अगदीच कडक होते बरं! तुला गंमत सांगते नयना!तुझी आजीही अगदी तशीच कडक सोवळ्याची,' आजी आपल्या सासूबाईंची आठवण करत म्हणाली.



**मजूर वर्ग आणि सामान्य भारतीय समाज या बिस्किटांपासून फार दूर होता. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला तर हिंदू लोक या बिस्किटांना 'म्लेंच्छांचे खाद्य' म्हणून हिणवत असत. आणि, साहिल तुला ऐकताना गंमत वाटेल पण, काही लोक तर बिस्किटात अंडी टाकलेली असावीत म्हणून, बेकरीत काम करण्यासही नकार देत. मग, बिस्किट खायचा तर प्रश्नच उरत नाही. इंटरनेटवरील एका वेबसाईटवर, मला अशी माहिती मिळाली की, मूळशंकर वेणीराम व्यास नावाच्या एका सवर्ण व्यक्तीने एकदा युरोपियन आचार्यांकडून बिस्किटे बनवण्याची कला शिकून रामजी पोळ नावाच्या एका नातेवाईकाकडे बेकरी सुरू केली.**



बाबांनी पुढे सांगायला सुरुवात केली. त्या काळात 'हंटले अॅण्ड पामर्स'चे बिस्किट म्हणजे केवळ इंग्रजांची मक्तेदारी! मजूर वर्ग आणि सामान्य भारतीय समाज या बिस्किटांपासून फार दूर होता. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला तर हिंदू लोक या बिस्किटांना 'म्लेंच्छांचे खाद्य' म्हणून हिणवत असत. आणि, साहिल तुला ऐकताना गंमत वाटेल पण, काही लोक तर बिस्किटात अंडी टाकलेली असावीत म्हणून, बेकरीत काम करण्यासही नकार देत. मग, बिस्किट खायचा तर प्रश्नच उरत नाही. इंटरनेटवरील एका वेबसाईटवर, मला अशी माहिती मिळाली की, मूळशंकर वेणीराम व्यास नावाच्या एका सवर्ण व्यक्तीने एकदा युरोपियन आचार्यांकडून बिस्किटे बनवण्याची कला शिकून रामजी पोळ नावाच्या एका नातेवाईकाकडे बेकरी सुरू केली. तेव्हा या घोर अपराधाबद्दल काही परंपरा वाद्यांनी त्यांना जाती बाहेर काढले. 'अरे बापरे! बिस्किटे बनविण्याची इतकी कठोर शिक्षा जहापनाह!' साहिल नाटकी आवेश आणत म्हणाला. 'अरे साहिल, त्या काळात बिस्किटे खाणे म्हणजे तत्कालीन रुढीपरंपरांच्या विरुद्ध केलेला एल्गारच होता आणि कितीतरी दशकांच्या अथक परिश्रमानंतर लाला राधा मोहन यांनी दिल्ली येथे १८९८ साली हिंदू बिस्किट कंपनीची सुरुवात केली. या कंपनीची विशेषता म्हणजे यात काम करणारे सर्व वर्कर हे हिंदू होते. कंपनीने आपली जाहिरात करताना असंही म्हटलं की, ही बिस्किटे फक्त दूध वापरून बनविलेली आहेत. यात पाण्याचा अंशही नाही. 'अगंबाई!' आजी कपाळावर हात मारत म्हणाली. 'धन्य धन्य हो आमचे पूर्वज!' बरोबर आहे आई तुमचे,' वहिनी दुजोरा देत म्हणाली. 'बरं मग या हिंदू बिस्किटांचे पुढे काय झालं?' 'काय होणार!' बाबा पुढची माहिती सांगत म्हणाले,'आजकाल असतं ना तुमचं काय ते ब्रँडची फर्स्ट कॉपी वगैरे... तसंच या हिंदू बिस्किटांची नक्कल करून अनेक बिस्किटे बाजारात आली. त्यांचा इतका अतिरेक झाला की, शेवटी या कंपनीला आपले नाव बदलून दिल्ली बिस्किट कंपनी असं ठेवावं लागलं. कालांतराने ही कंपनी ब्रिटानियामध्ये विलिन झाली. 'खरंच, खूपच मजेदार इतिहास आहे हा! जितकं ऐकावं तितकी उत्सुकता वाढत जाते.' साहिल बोलला. 'चांगलंच आहे की! ज्ञानाची भूक ही वाढायलाच हवी. या पुढेही माहिती देईनच. पण आता नको,' शेवटी बाबांनी चहाचा कप वाकडा करून संपूर्ण मारी बिस्किट त्यात बुडवले आणि त्याचा आस्वाद घेत म्हणाले. 'पुढची माहिती पुन्हा कधीतरी...'

## गझल आरस्पानी

गझलनंदा / ८४२२०८९६६६

# श्रावणधारा झरली...



श्रावण...प्रत्येक कवीचा आवडता विषय! अगदी बालकवींच्या 'श्रावणमास' या कवितेपासून तर आजच्या अगदी नवोदित कवीपर्यंत प्रत्येक पिढी अनेक कवितांमधून श्रावण रसिकांच्या भेटीला येतोच आहे. मग, गझलकार तरी याला अपवाद कसा असणार? कारण, आधी गझलकार हासुद्धा कवीच आहे. फक्त त्याने गझलेच्या तंत्राकडे म्हणजेच शरीरशास्त्राकडे अतिशय गंभीरपणे बघायला हवे. केवळ मंत्राच्या मागे लागून जर गझलेच्या आकृतीबंधाकडे दुर्लक्ष झाले तर ती कविताही राहत नाही आणि गझलही होत नाही, हे विधान मी अत्यंत जबाबदारीने करीत आहे. गझलेतील लय, यती आणि एकूणच आकृतीबंध सांभाळून वाचकाला आवडणारी रचना/गझल देणे हे साधे सोपे नसते. यासाठी प्रचंड मोठा शब्दसाठा, किमान व्याकरणाची माहिती, शुद्धलेखन याची गरज असतेच. पण, त्याचबरोबर भौगोलिक/प्रादेशिक जाणीवा असणे हेसुद्धा गरजेचं असतं. अन्यथा आषाढात रिमझिम पाऊस आणि श्रावणात कोसळधारा कवितेतून बरसतात. काही गझलांमध्ये उन्हाळ्यात प्राजक्त फुलतो तर पावसात पानझड होते. हे हास्यास्पद प्रकार होऊ नयेत, याचीही काळजी गझलकाराने घ्यायला हवी.

सध्या आणखी एक प्रकार बघायला मिळतो की, हवी तेवढी सूट घेऊन नवोदित गझलकार गझल लिहितात. अगदी एक शेर झाला की, त्यात भरीचे ४ शेर घालून गझल पूर्ण करून समाज माध्यमावर पोस्ट करतात. बरं, त्यावर कुणी प्रश्न विचारलाच तर 'अमुक तमुक प्रस्थापित गझलकाराने ही सूट घेतली होती म्हणून मीही घेतली!' हे सांगतात. यावर काय बोलणार? आम्हीच आमची जबाबदारी ढिसाळपणे वापरत असू तर नवीन लोकांना का दोष द्यायचा?

गझल तंत्राधिष्ठीत पण, काव्यात्म लेखन प्रकार आहे. गझल असते किंवा नसतेच. त्यात 'गझलेसारखे' किंवा 'गझलकवजा' म्हणण्याचा प्रघात आताशा रूढ होत आहे. याच्याशी अनेक कारणं निगडीत आहेत. त्यातील, 'गझलगुरू' हाही प्रकार महत्त्वाचा आहे. ते गझलतंत्र तर सोडाच पण, चक्क गझल शिकवतात(?) त्यामुळे, आज गझलेची संख्यात्मक वाढ होत असली तरी गुणात्मकतेची काळजी वाटते. अष्टाक्षरी, ओवी, अभंग, गवळण, भावगीत, भक्तीगीत, भारूड, पोवाडा, पाळणे, आरत्या, श्लोक, आर्या, दिंडी असे अनेक प्रकार मान्य करणाऱ्यांना गझलेचे तंत्रच तेवढे का खटकते/का खुपते? हा अभ्यासाचा विषय आहे. त्यावर, कृत्रिमतेचाही आरोप होतो.

हीच बाब विषयांशीही निगडीत आहे. आज जुने-नवे जेवढे हात गझल लिहू लागले आहेत, त्या गझलेतला श्रावण शोधावाच लागतो. समाज, सुधारणा, भूक, दारिद्र्य यांच्याच परीघात रमलेली गझल प्रेम, माया आणि निसर्गापासून दूर जाते आहे की काय ही भिती वाटते. पण, तेव्हाच काही दादलेवा शेर वाचले की कळतं,'पेला अर्धा भरला आहे'.

**मिठीत होती अधीरता अन् दिठीत होता साजण**
**सायंकाळी रंग लेवुनी, ढगात आला श्रावण**

हा श्रावणाचा माझाच एक शेर आहे. अस्ताचलास जाणारा सूर्य, त्याची ढगावर पडलेली किरणं आणि उमटलेलं इंद्रधनुष्य, ही श्रावणाची ओळख चटकन पटते ती सायंकाळी!

**तुझ्या फुलांचा सडा पहाया रोज अंगणी**
**श्रावण येतो मज भेटाया रोज अंगणी**

कोल्हापूर येथील नरहर कुलकर्णी यांचा हा राजस शेर मनाला भावतो. हसरा, नाचरा श्रावण कुसुमाग्रज दाखवतात तर, ऋतू हिरवा ऋतू बरवा या ओळीने श्रावण आणखी वेगळाच भासतो. समीक्षक प्रकाश क्षीरसागर त्यांच्या एका शेरात म्हणतात,

**गझलेस भावलेला श्रावण किती निराळा**
**सृष्टीस भाळलेला श्रावण किती निराळा**

श्रावण सुरूझाला की, कवीच्या प्रतिभेला धुमारे फुटू लागतात, असं म्हटल्यास वावगे ठरणार नाही. नयनरम्य श्रावण, रंगगंधाने आपल्याला मोहून टाकतो. अशाच अर्थाचा प्रसाद कुलकर्णी यांचा एक शेर बघा.

**तनही बरवा मनही बरवा, श्रावण हिरवा**
**धुंद करी ही बेधुंद हवा, श्रावण हिरवा**

श्रावणावर अनेक कविता आहेत पण, गझल मात्र मोजक्याच आहेत. त्यातही तुरळक शेर सापडतात. नवोदित आणि ज्येष्ठ गझलकारांना असे सुचवावेसे वाटते की, सृष्टीतला कण न् कण आपल्या काव्याचा विषय होऊ शकतो. फक्त, ती दृष्टी हवी. त्यामुळे त्याच त्या विषयांच्या रिंगणात फिरण्यापेक्षा नवनवे विषय घेऊन आपली गझल पूर्ण करावी. आज नवोदित गझलकारांमध्ये काही आश्वासक हात नक्कीच आहेत. त्यामुळे, तंत्र सांभाळून गझलेचा मंत्र सांभाळला जात आहेच. एवढेच नाही तर नाण्याला जशा दोन बाजू असतात आणि दोन्ही खणखणीत असाव्या लागतात, तीच गोष्ट गझलेची आहे. तंत्र-मंत्र योग्यच असायला हवं.

एवढंच नाही तर नाण्याची तिसरी बाजू म्हणजे कडा असते. अत्यंत गरजेची ! तशीच मराठी गझलेची कडा म्हणजे मराठी व्याकरण आणि शुद्धलेखन सांभाळून, निर्दोष तंत्रात आलेली गझलेतली गझलियत! या तिन्ही बाजूंचा सारासार विचार करून गझलेकडे वळणारे बघितले की,'विजा घेऊन येणाऱ्या पिढ्यांशी बोलतो आम्ही' ही भट साहेबांची ओळ सार्थ झाली असे वाटेल. विस्तारभयास्तव इथेच थांबते माझ्या एका गझलेसह!

### श्रावणधारा...

निळ्या सावळ्या मेघामधुनी, श्रावणधारा झरली
आसुसलेली वसुंधराही, कूस बदलुनी वळली

गर्भ रेशमी हिरवळ शोभे, तृणांकुरांची नक्षी
नाजुक इवल्या पानांमधुनी, ईश्वर किमया कळली

ऊन सावली लपंडाव हा, सूर्य उगाचच करतो
तरुशिखरांवर सुवर्ण शिंपण, दहादिशांनी भरली

नटला श्रावण हिरवाईने, इंद्रधनूच्या खाली
नभांगणाचा संगीतोत्सव केका धुनही उठली

नाजुक पैंजण हिरवे औक्षण, उंबरठ्यावर झाले
खूण प्रितीची शतजन्माची, डोळ्यांनाही कळली

## अग्रलेख...

# ...येथे(ही) पाहिजे जातीचे!

मराठा आरक्षणावरून महाराष्ट्रात सुरू असलेले रणकंदन थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. आता या आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच मराठ्यांचे आरक्षण रोखल्याचा आरोप केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मराठा समाजाला आरक्षण द्यायचे असले, तरी फडणवीस त्यात अडथळा आणत असल्याचे जरांगे यांचे म्हणणे आहे. त्यावर फडणवीसांनी दिलेले उत्तर लक्षात घेतले तर मुद्यावरचा त्यांचा प्रामाणिकपणा लक्षात येतो. फडणवीस म्हणाले की, आतापर्यंत मराठा समाजासाठी जे काही निर्णय झाले, ते एक तर मी घेतले किंवा माझ्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतले. मराठ्यांच्या आरक्षणात मी अडथळे आणत आहे, हे म्हणणे आपल्याला मान्य आहे, असे शिंदे यांनी मान्य केल्यास मी एका क्षणात राजीनामा देईन आणि राजकारणातून संन्यास घेईन. ज्याचा हेतू शुद्ध असतो, तीच व्यक्ती असे बोलू शकते. राजकारणात कुणीही साधू बनण्यासाठी येत नाही आणि पद कुणीही सहजासहजी सोडत नाही. आज फडणवीस हे महाराष्ट्रातील भाजपाचे प्रमुख नेते आहेत. शिवाय, ते उपमुख्यमंत्री आहेत. त्यांना मुख्यमंत्रिपदाचा अनुभवही आहे. देवेंद्र फडणवीसांचे वैशिष्ट्य असे की, मराठ्यांसह अन्य मागास समाजांना आरक्षणाचे लाभ मिळाले पाहिजेत, यासाठी ते सामान्य आमदार असल्यापासून झटत आहेत. मात्र, महाराष्ट्राचे दुर्दैव असे की, माणसांचे कर्तृत्व त्यांच्या जातीवरून मोजले जाऊ लागले आहे. फडणवीस ब्राह्मण समाजात जन्माला आले, यात त्यांचा दोष नाही. आपण एखाद्या जातीत-धर्मात जन्माला येतो त्याचे कारण जीवशास्त्रीय घटितात लपलेले असते. पण, गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकारणाला जातीय विद्वेषाने पछाडले आहे. त्यामुळेच त्यांच्यावर असे आरोप केले जातात. मनोज जरांगे हे त्या मालिकेतलेच एक नाव. जरांगे यांच्या आंदोलनाच्या मागे कोणत्या शक्ती आहेत, हे आता कुणालाही सांगण्याची गरज नाही. आणि फडणवीस यांची कर्तबगारी त्यांच्या विरोधकांना खुपते याचे प्रमुख कारण दुसरे-तिसरे काहीही नसून त्यांची जात आहे, हेही सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्राच्या सत्ताकारणाला विशिष्ट वर्गाच्या वर्चस्वाने मध्यंतरीच्या काळात ग्रासले होते. एकाच आडनावाचे किंवा समाजाचे साठ-सत्तर आमदार असणे ही त्या काळी सामान्य बाब समजली जायची. भाजपातील प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी, भाऊसाहेब फुंडकर, एकनाथ खडसे, ना. स. फरांदे इत्यादी दिग्गज नेत्यांनी बहुजन समाजाच्या कल्याणासाठी त्या-त्या समुदायांत पर्यायी नेतृत्व उभे केले. जातीच्या भरवशावर सतत सत्ताकारणात रमलेल्या शरद पवारांसारख्या अनेकांच्या खेळींना शह बसला. एकीकडे महाराष्ट्र शाहू-फुले-आंबेडकरांचा आहे, असे म्हणायचे. माणसाचे कर्तृत्व आणि स्थान जातीवरून नव्हे तर त्याच्या गुणांवरून ठरते, अशी मल्लिनाथीही करायची. पण, प्रसंग आला की, अमका त्या जातीचा आणि ढमका आपल्या जातीचा, असेच राजकारण करायचे, हा प्रकार अजून संपलेला नाही. जरांगे यांनी केलेला आरोप अशा प्रकारच्या पारंपरिक आकसातून आलेला आहे, यात शंका नाही.

वास्तवात देवेंद्र फडणवीस हा असा एक माणूस आहे, ज्याने गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून मागास समुदायांना न्याय मिळवून देण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. महाराष्ट्रातील मराठा समुदायासाठी आरक्षणाचा कायदा झाला ते साल होते २०१८. त्यावेळी मुख्यमंत्री होते फडणवीस. कोर्टकचेरी झाली तेव्हा देवेंद्र फडणवीसांनी पुढाकार घेऊन कोर्टातल्या लढाईला दिशा दिली. हायकोर्टात ते आरक्षण टिकलेही. पण, नंतरच्या काळात अडीच वर्षे महाविकास आघाडीचे दळभद्री सरकार आले आणि त्याच्या नाकर्तेपणामुळे आरक्षणासंबंधी फडणवीस यांनी घेतलेली मेहनत वाया गेली. युती सरकारच्या काळात मराठा समाजासाठी कल्याणकारी योजना सुरू करण्यासाठी पुढाकार देवेंद्र फडणवीसांचा. महायुती सरकारच्याच काळात मराठा समाजासाठी त्यांनी योजना आणल्या. सारथी योजनेच्या अंतर्गत मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतले गेले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत महायुती सरकारतर्फे कोट्यवधी रुपयांची मदत देण्यात आली. हे सारे केले किंवा करून घेतले ते फडणवीसांनी आणि तरीही तेच दोषी! ...कारण- त्यांची जात! अतिशय हिणकस प्रकारचे राजकारण महाराष्ट्रात सुरू आहे आणि त्यामुळे सामाजिक सौहार्दाला तडा जात आहे. पूर्वी इतर राज्यांमध्ये जातीय संघर्ष व्हायचे तेव्हा महाराष्ट्राचे उदाहरण दिले जायचे. इथल्या सुधारणावादी परंपरा, जातीय-धार्मिक सलोख्याची उदाहरणे देशाच्या अन्य राज्यांत दिली जायची. आता विरोधकांच्या कपटीपणामुळे महाराष्ट्रही जातीय राजकारणासाठी बदनाम झाला आहे. २०१४ सालापर्यंत या राज्याचे राजकारण, अर्थकारण आणि सत्ता मोजक्या लोकांच्या हातात होती. २०१४ मध्ये विजय मिळवून मुख्यमंत्रिपदी विराजमान झालेल्या देवेंद्र फडणवीसांनी त्या मोजक्या लोकांच्या राजकारणाचे पितळ उघडे पाडले तेव्हापासून त्यांचा जळफळाट सुरू झाला, तो आताही सुरू आहे. २०१४ ते २०१९ या काळात फडणवीस मुख्यमंत्री होते. समृद्धी महामार्गासारखे अनेक महाकाय प्रकल्प मार्गी लावतानाच फडणवीसांनी महाराष्ट्राच्या राजकारणातील काही समूहांचा पारंपरिक वरचश्मा निकालात काढला. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. ती पाच वर्षेही तशी शांततेत गेली नाहीत. त्या काळी देखील मराठ्यांची आंदोलने झाली. त्यातून निर्माण झालेली सगळी आव्हाने फडणवीस यांनी अंगावर घेतली आणि मार्गक्रमण केले. २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत महाराष्ट्रातील लोकांनी भाजपा म्हणजे देवेंद्र फडणवीसांच्या मुख्यमंत्रिपदाच्या बाजूनेच कौल दिला होता. उद्धव ठाकरे, शरद पवार इत्यादी लोक अचानक एकत्र आले आणि युती सरकारऐवजी महाविकास आघाडीचे सरकार महाराष्ट्रात आले. त्या सरकारची दोन-अडीच वर्षे किती वाईट होती, याबद्दल फारसे बोलण्याचे कारण नाही. दरबारी राजकारणाचे शहेनशहा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. शरद पवारांनी, काँग्रेसने त्यांना पाठिंबा दिला. या तिघाडी सरकारच्या काळात महाराष्ट्राची पीछेहाट झाली. काळाने कूस पालटली आणि उद्धव ठाकरेंचे मुख्यमंत्रिपद गेले. त्यांचा पक्ष फुटला. शरद पवारांचा पक्षही फुटला. दोन्ही पक्षांना स्वतःचे चिन्ह गमवावे लागले. महायुतीचे सरकार आले. जळफळाटाचा भाग दोन सुरू झाला तो इथून. आम्ही राज्यकर्ती जमात आहोत. त्यामुळे दुसऱ्या जातीचे लोक आम्हाला नेते किंवा मुख्यमंत्री म्हणून चालत नाहीत, असे कुणी जाहीरपणे म्हणाले नाही. पण, त्यांच्या कृतीतून तेच दिसत राहिले. तसे ते आजही दिसते.

सत्तेचे दिवस सरत असल्याचे लक्षात येताच पवारादी लोकांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा वापरण्याचा प्रयत्न केला खरा, पण कोर्टात ते आरक्षण टिकले नाही. त्यानंतर फडणवीस मुख्यमंत्री झाले. ते साल होते २०१४. त्यांनी मराठा आरक्षणाच्या विषयाचा गंभीरपणे अभ्यास केला. ते स्वतः वकिली शिकलेले आहेत. उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे इतर अनेक सराईत आणि अल्पशिक्षित राजकीय पुढाऱ्यांच्या तुलनेत अशा विषयांतील त्यांची समज मोठी आहे. त्यांनीच २०१८ मध्ये मराठा आरक्षणासाठी पुन्हा पुढाकार घेतला. त्यांनी दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात टिकले. सगळा घोळ झाला तो २०१९ नंतर म्हणजे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर. मराठा आरक्षणासाठी अत्यंत वाईट काळ होता तो ठाकरेंच्या मुख्यमंत्रिपदाचा. सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाच्या विषयावर सुनावणी सुरू असताना त्या आरक्षणाच्या बचावासाठी तत्कालीन राज्य सरकारकडून जसे प्रयत्न व्हायला हवे होते, तसे ते झाले नाहीत. तत्कालीन राज्यकर्त्यांना त्यात स्वारस्यच नव्हते. एकुणात मराठा आरक्षणाच्या मागे-पुढे पाहिले तर कुठेही फडणवीस दोषी आढळणार नाहीत. पण, त्यांना दोषी ठरवायचे, हे ठरलेले आहे. कल्याणकारी काम करूनही अपश्रेय देण्यासाठी विशिष्ट जातीचेच पाहिजेत, असे स्वयंघोषित पुरोगाम्यांनी ठरविलेच असेल तर या राज्यातल्या सौहार्दाला नख लागल्यावाचून राहणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

## प्रासंगिक

# व्यूहरचना; नव्हे अगतिकता!

राहुल गोखले

जम्मू-काश्मीर आणि हरयाणा या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रक केंद्रीय निवडणूक आयोगाने नुकतेच जाहीर केले. मात्र, महाराष्ट्रात निवडणुका जाहीर न झाल्याने विरोधकांनी भाजपाला लक्ष्य केले आहे. 'एक देश एक निवडणूक' याचा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत असताना येत्या १ ऑक्टोबर रोजी निवडणुका होणाऱ्या दोन राज्यांबरोबरच झारखंड आणि महाराष्ट्रात निवडणुका का जाहीर झाल्या नाहीत, असा विरोधकांचा आक्षेप. अर्थात या आक्षेपात सुप्त सुस्कारच जास्त आहे, हे उघड आहे. निवडणुका आताच जाहीर झाल्या असत्या, तर महाविकास आघाडीला (मविआ) धक्का बसला असता. याचे कारण मविआमध्ये सुरू असलेली धुसफूस. त्यावर तोडगा काढण्यास किंवा परस्परांवर कुरघोड्या करण्यास आणखी वेळ मिळाला म्हणून खरे तर मविआमध्ये संतोषाचे वातावरण असणार. भाजपावर शरसंधान साधण्याचा एकमेव इरादा म्हणजे आपण निवडणुकांना तयार आहोत, असा आविर्भाव निर्माण करणे हा. जर निवडणुका खरोखरच जाहीर झाल्या असत्या तर त्या इतक्या अचानक का जाहीर झाल्या म्हणून विरोधकांनी आक्षेप घेतला असता. मावळत्या विधानसभेची मुदत संपण्यापूर्वी नव्या निवडणुका आटोपल्या पाहिजेत या अटीचे उल्लंघन होत नाही तोवर या आक्षेपांना फारसा अर्थ नाही. तथापि, या निमित्ताने मविआमध्ये जी रस्सीखेच सुरू आहे तिची दखल घेणे गरजेचे.

अशी ही रस्सीखेच होण्याची कारणे सामान्यतः दोनच असतातः एक, जागावाटपात शक्य तितक्या जास्त जागा पदरात पाडून घेण्यासाठीचे दबावतंत्र आणि दुसरे म्हणजे सत्तेत आलोच तर नेतृत्वावर दावा सांगण्याचे. या पलीकडे या कुरघोड्यांमागे किंवा रस्सीखेच होण्यामागे अन्य कोणतेही कारण असत नाही. मात्र, या दोन्ही मुद्यांवर मविआमध्ये मतैक्य नसताना महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक का जाहीर झाली नाही म्हणून गळे काढणे हास्यास्पद! लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीच्या तुलनेत मविआला लक्षणीय यश मिळाले, हे नाकारता येणार नाही. कारण आकडेवारीच पुरेशी बोलकी आहे. आता विधानसभेतदेखील बाजी मारणे ही केवळ औपचारिकता आहे, असे मविआने गृहीतच धरले आहे. त्यामुळे आतापासूनच उर्वरित दोन पक्षांना दुर्बल करण्याची व्यूहरचना मविआमधील प्रत्येक पक्ष करीत आहे. मविआसमोरील आताचा वादाचा प्रमुख मुद्दा हा अर्थातच नेतृत्वाचा आहे. शिवसेना ठाकरे गटाची मागणी मविआने मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा अशी आहे; तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट या मागणीस धूप घालण्यास तयार नाहीत.



अखंड शिवसेनेला भाजपापासून तोडून काँग्रेस आणि अखंड राष्ट्रवादी काँग्रेसने २०१९ साली सरकार स्थापन केले होते; त्यावेळी खरे तर खुद्द राष्ट्रवादीत आणि काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी अनुभवी नेते होते. शिवाय काँग्रेस (४४ आमदार); राष्ट्रवादी (५४ आमदार) आणि शिवसेना (५६ आमदार) यांच्या संख्याबळातदेखील मोठे अंतर नव्हते. तिन्ही पक्ष तुल्यबळच होते. तरीही शरद पवार यांनी आपल्या पक्षाला मुख्यमंत्रिपद मिळावे यासाठी आग्रह धरला नाही आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे ती धुरा सोपविली, हे कोणालाही खटकणारे होते. उद्धव ठाकरे यांना शिवसेनेचे प्रमुख म्हणून अनेक वर्षांचा अनुभव असला, तरी शासन-प्रशासनाचा अनुभव नव्हता. विशेषतः आघाडी सरकार चालविताना तर या कौशल्याचा कस लागत असतो. तेव्हा संधी असूनही शरद पवार यांनी अजित पवारांना मुख्यमंत्री करणे का टाळले, हे अनाकलनीय. अर्थात त्यांच्या त्या निर्णयाचा फटका नंतर पक्षफुटीच्या रूपाने त्यांना बसला, हा भाग वेगळा. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोणत्या आधारावर घोषित करायचा हा एक प्रश्न आणि तसा केलाच तर उर्वरित दोन पक्षांच्या जमिनीवरील कार्यकर्त्यांच्या मनोधैर्यावर त्याचा काय परिणाम होईल, ही धास्ती हा दुसरा मुद्दा. मविआ सरकारचे नेतृत्व ठाकरे यांनी केले होते म्हणून आता त्यांचाच चेहरा समोर ठेवावा, अशी ठाकरे गटाची कितीही इच्छा असली, तरी लोकसभा निवडणुकीत मविआमध्ये काँग्रेसने सर्वाधिक जागा मिळविल्या होत्या. साहजिकच मुख्यमंत्रिपदावर दावा सांगण्याची ताकद काँग्रेसकडे जास्त. पण काँग्रेसमधील गटबाजी पाहता अशा कोणत्याही एका चेहऱ्यावर एकमत होणे संभव नाही. तसे केले तर गटबाजी उफाळून येण्याचा संभव अधिक. विधान परिषद निवडणुकीत काही काँग्रेस आमदारांनी पक्षादेशापेक्षा निराळे मत नोंदवून या गटबाजीची चुणूक दाखवलीच; पण अशांवर कारवाईचे राणाभीमदेवी थाटात संकेत दिल्यानंतरही तशी कारवाई प्रत्यक्षात करणे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी टाळले आहे. तेव्हा अगोदर आपल्या पक्षात मुख्यमंत्रिपदाचा सहमतीचा चेहरा कोण, हा पेच त्या पक्षाला सोडवावा लागेल. त्यानंतर तो चेहरा मविआमधील घटक पक्षांना मान्य होईल का हा. शरद पवार गटातदेखील निराळी स्थिती नाही. सुप्रिया सुळे या खासदार आहेत आणि आपल्याला दिल्लीतच रस आहे, असे कितीही सांगितले तरी राजकारणात असली विधाने सकृतदर्शनी कधीच घ्यायची नसतात. मात्र, सुळे यांचे नाव जाहीर केले तर शरद पवार यांचा कल आपल्या कन्येकडेच कसा होता आणि आहे, या अजित पवारांच्या दाव्यांना पुष्टी मिळते. निवडणुकीपूर्वी असे कोलीत अजित पवारांच्या हातात देणे शरद पवार गटाला परवडणारे नाही. तेव्हा तिन्ही पक्षांची नजर नेतृत्वपदावर असली, तरी डाव आणि पेच यात हा निर्णय अडकणे अपेक्षितच.

विधानसभा निवडणुकीत कमी मतांच्या फरकाने निकाल बदलतात. आघाडीत जागावाटप हा मतभेदांचा पहिला मुद्दा असतो. असंतोष, बंडखोरी यांचा उगम त्यात असतो. जागावाटपावर तोडगा काढणे, ही प्राथमिकता असताना मुख्यमंत्रिपदाचा सामायिक चेहरा हा आणखी पेच निर्माण करणारा मुद्दा तूर्तास बासनात बांधून ठेवणे योग्य, अशी शरद पवार गट आणि काँग्रेसची धारणा असल्यास नवल नाही. ठाकरे गटाला मात्र नेतृत्वाचा चेहरा जाहीर करण्याची इच्छा आहे. ती फलद्रुप होण्याची शक्यता कमी. मविआमध्ये एकोपा आहे, असे चित्र निर्माण करण्यासाठी मूठ झाकलीच ठेवणे मविआची निकड आहे. ती उघडून हात दाखवून अवलक्षण करून घेण्याचा उतावीळपणा मविआ तूर्तास करणार नाही. यातून व्यूहरचनेपेक्षा अगतिकता जास्त डोकावते, हे मात्र नाकारता येणार नाही.

९८२२८२८८१९

## वेध

विजय निचकवडे

# हेच का? 'माझ्या देशावर माझे प्रेम!'

विदेशी गोष्टींच्या प्रभावाची बुरशी आमच्या मनावर इतकी घट्ट बसते की, ती काही केल्या निघत नाही. स्वदेशीसाठी कधीकाळी आमच्याच लोकांनी आंदोलन उभारले होते, पण तो कदाचित इतिहास होता म्हणून आम्ही सोयीस्कर विसरलो. आता आम्हीच भारतीय विदेशी वस्तूंच्या खरेदीत अन्य देशांना मागे टाकण्याचा इतिहास रचण्याच्या कामाला लागलोय्. खरं तर आमच्याकडे सर्वच होतं, पण 'पिकते तिथे विकत नाही ना' म्हणूनच तर विदेशी वस्तू खरेदीचा मोह आम्हाला आवरता येत नाही. आज आपण विदेशी वस्तू खरेदीमध्ये अमेरिका आणि इंग्लंडलाही भारताने मागे टाकले आहे. मग हेच का? माझ्या देशावर माझे प्रेम आहे?

आम्हाला आमच्या देशाचा प्रचंड आदर आहे. म्हणून तर राष्ट्रगीत गाताना आमचा ऊर भरून येतो आणि आम्ही सांगतो, 'माझ्या देशावर माझे प्रेम आहे.' नक्कीच आहे. पण ते प्रेम सांगण्यापुरतेच का? असे म्हणावेसे वाटते. कारण आज आम्ही कुठेच कमी नाही. मेक इन इंडिया आणि मेड इन इंडिया हे आमच्या अंगवळणी पडल्याचे आम्ही या ना त्या निमित्ताने सांगण्याचा प्रयत्न करतो. ग्रामीण भागातही या 'मेक इन इंडिया'चे लोन नक्कीच पसरले आहे. छोट्यांपासून मोठमोठाली उत्पादने आम्ही करीत आहोत. याच देशाने कोरोनासारख्या संकटाच्या काळात जगातील अन्य देशांसाठी लस आणि अन्य साहित्य जे भारतीयांना संकटसमयी धीर न सोडता तयार केले, ते पाठवून विदेशी लोकांचेही जीव वाचविले. कृषी क्षेत्रापासून ते माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सर्वच बाबतीत आम्ही आज एक पाऊल पुढे असल्याच्या स्थितीत आहोत. असे असताना या सर्व गोष्टींचा अभिमान बाळगणारे आम्ही भारतीय विदेशी वस्तूंच्या प्रेमात का पडलो? याचा विचार करायलाच हवा?

आज अमेरिका, इंग्लंडसारखे देश विदेशी वस्तूंचा वापर आणि खरेदीच्या बाबतीत त्यांच्या देशाशी प्रामाणिक आहेत. नक्कीच आवश्यक त्या गोष्टी नाईलाजाने घ्याव्याही लागत असतील, परंतु जे आमच्याकडे तयार होतं, तेही विदेशी बनावटीचे वापरणार असू तर 'देखल्या देवा दंडवत' या म्हणीप्रमाणे देशावर प्रेम दाखविण्यात अर्थ काय? आज इंग्लंडसारख्या सधन देशात केवळ २७ टक्केआणि अमेरिकेत ३६ टक्के नागरिक विदेशी वस्तूंची खरेदी करतात आणि आमच्या देशात तब्बल ६७ टक्के विदेशी वस्तू खरेदी करून भारतीय असल्याचा अभिमान बाळगतो. 'अवलाय' या रिसर्च कंपनीने केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब स्पष्ट झाली आहे. यांच्या मते विदेशी बनावटीच्या वस्तूंचा दर्जा भारतीय वस्तूंच्या तुलनेत अधिक चांगला असतो. असा विचार करणाऱ्यांची संख्या तब्बल ७८ टक्के आहे. फॅशन प्रॉडक्ट आणि इलेक्ट्रिक उपकरणांच्या खरेदीचे प्रमाण यात अधिक आहे. हा अहवाल आम्ही सांगत असलेलं देशप्रेम हे बेगडी आहे, असे सांगणारा आहे.

देशात १९०५ साली स्वदेशी आंदोलनाची आग पेटली होती. अरविंद घोष, रवींद्रनाथ ठाकूर, लोकमान्य टिळक, लाला लजपत रॉय यांना स्वदेशी आंदोलनाचे उद्घोषक संबोधले जाते. महात्मा गांधींच्या स्वतंत्रता आंदोलनाचा केंद्रबिंदू म्हणूनही स्वदेशीच्या आंदोलनाकडे पाहिले जायचे. आपल्या देशातील वस्तू स्वीकारून दुसऱ्या देशातील वस्तूंचा बहिष्कार या तत्त्वावर हे आंदोलन रेटले गेले. पण या गोष्टी आज इतिहासजमा झाल्या आहेत. स्वदेशी वस्तूंच्या प्रेमात पडण्याऐवजी विदेशी वस्तूंचा पगडा आमच्या मनावर अधिक पडला, हे स्पष्ट झाले आहे. आम्ही सर्वच गोष्टींचे उत्पादन करतो. अगदी हवाई विमानेही आम्ही बनविण्याच्या स्थितीत आलो आहोत. मात्र, आमची मानसिकता अजूनही विदेशीधार्जिणीच आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

आज भारतीय उत्पादनांचा डंका विदेशात वाजत आहे. मात्र, विदेशी आकर्षणाचे भूत आमच्या मानगुटीवर बसले असल्याने आज अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांनाही पिछाडून टाकले आहे. आम्हाला नक्कीच गर्व असायला हवा, पण तो भारतीय असल्याचा आणि स्वदेशी वस्तूच्या वापराचा. पण आज विदेशी प्रेम पाहता हा अधिकार आम्हाला कदाचित गमाविण्याची वेळ आल्यास नवल वाटू नये. एकीकडे आमच्या देशाचं नेतृत्व भारतीय असल्याच्या अस्मितेने देशाला सर्वस्व समर्पित करून निःस्वार्थ भावाने काम करीत आहे आणि आम्ही विदेशी बुरशी मनावर घेऊन देशप्रेमाचा आव आणत आहोत. जे आम्ही विदेशातून मागवितो, ते आमच्याकडेही होतं. पण विदेशी बुरशीने ते दिसत नाही एवढंच. शेवटी काय तर पिकतं तिथे विकत नाही, हेच खरं!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# रुद्र अष्टाध्यायी : शिवाची अद्भुत साधना!

प्रा. दिलीप जोशी

सनातन संस्कृतीत विविध प्रकारांच्या अर्चना सांगितल्या आहेत. त्यात श्रुती, स्मृती, पुराणोक्त, शास्त्रोक्त, व्यासोक्त आणि वेदोक्त पुण्यफळ अर्चना पद्धतींचा समावेश आहे. वैदिक सूक्तांचा उपयोग करून षोढशोपचार पूजनाची पद्धत संपूर्ण भारत वर्षात प्रचलित आहे. वेद भारतवर्षाला एकत्रित ठेवणारे आणि आसेतुहिमाचल असणारे वाङ्मय आहे. 'पृथिव्यै समुद्रपर्यंताया एक राळिती' असा वैदिक उल्लेख आहेच. खरं तर वेदांच्या राशी हा उल्लेख वेदांचे अमर्याद रूप प्रकट करतात. ज्ञानेश्वर माउलींनी स्पष्ट शब्दात उल्लेख केला की,

*हा वेदार्थ सागरू, जया निद्रिताचा घोरू ।*
*तो स्वये सर्वेश्वरू, प्रत्यक्ष अनुवादीला ।*

हे वेद शिवस्वरूप आहेत. 'वेदः शिवः शिवो वेदः' म्हणजे वेद हेच शिव आणि शिव हेच वेद. या वेद राशींचे चार भाग म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद भगवान वेदव्यासांनी पाडले. यातील विशेषतः यजुर्वेदातील आठ सूक्तांचा अर्क म्हणजे रुद्रसूक्त आहे. भगवान महादेवांना रुद्राभिषेक करताना वैदिक पद्धतीत रुद्र अष्टाध्यायीचा वापर करतात.

यजुर्वेदातील आठ वैदिक सूक्तांचा एकत्रित असा सूक्तसमूह म्हणजे रुद्र अष्टाध्यायी. श्रावण महिन्यात शिवमहादेवांना रुद्राभिषेक करतात तो याच रुद्राध्यायीने. दधी मंथुन नवनीत तयार व्हावे तशी रुद्र अष्टाध्यायी निर्माण झाली आहे. रुद्राध्यायी प्रामुख्याने यजुर्वेदातील असली, तरी त्यातील काही सूक्ते ऋग्वेद, साम आणि अथर्ववेदातही आहेत. म्हणूनच हा 'वेदाचा काढा' म्हणायला हरकत नाही. रुद्र अष्टाध्यायीवरूनच लक्षात येते की, रुद्राचे आठ अध्याय म्हणजे आठ सूक्तांचा हा सूक्तसमूह आहे. त्यालाच जोडून शांत्यध्याय आणि स्वस्ती प्रार्थना मंत्राध्याय असल्यामुळे ते १० अध्याय होतात. सोबतच आठ अध्यायानंतर महागौरीसाठी श्रीसूक्त पठन केले जातेच. पण प्रमुख आठ अध्याय आहेत. रुद्राध्यायीत साधारणतः २१३ वैदिक ऋचा म्हणजे मंत्र आहेत. थोडक्यात यजुर्वेदातील एकूण ४० अध्याय सात कांड आणि ३ हजार ९८८ मंत्रांपैकी आठ सूक्त ज्यांचे एकूण २१३ मंत्र आहेत. ते निवडून प्रभावी रुद्राध्यायी तयार झाली.

प्रथम अध्याय १० ऋचांचा किंवा मंत्रांचा असून याला 'शिव संकल्प सूक्त' म्हणतात. दुसऱ्यात २२ ऋचा आहेत. याला सुप्रसिद्ध असे 'पुरुषसूक्त' म्हणतात. तिसरा अध्याय १७ ऋचांचा असून याला आदित्य किंवा सूर्यसूक्त म्हणून संबोधिले जाते. चौथा अध्याय वज्रसूक्त. १७ ऋचा असलेल्या या अध्यायाला इंद्रसूक्त, अप्रतिरथ सूक्त आणि उत्तर प्रतिरथ सूक्त म्हणूनही ओळखतात. हे सूक्त इंद्रदेव आणि देवगुरू बृहस्पती यांना समर्पित आहे. अध्याय पाचवा हा प्रमुख अध्याय असून रुद्राभिषेकात हल्ली याच अध्यायाची आवर्तने केली जातात. एकूण ६६ ऋचा असलेले हे रुद्रसूक्त आहे. याला 'नमक अध्याय'देखील म्हणतात. यातील प्रत्येक मंत्र हा 'नमःकार' आहे.

'नमस्ते रुद्र मन्यव उतोत ईशवे नमः ।' ही अध्यायाची सुरुवात आहे. नमःकारामुळे हा नमक अध्याय गणला जातो. सहाव्या अध्यायात प्रचंड ऊर्जा असलेला महामृत्युंजय मंत्र आहे. रुद्रपरिवाराचा समावेश मंत्र या अध्यायात आहे. एकूण आठ ऋचा असलेल्या अध्यायाला महिश्वसा किंवा महिच्छार अध्याय म्हणतात. सातवा अध्याय केवळ सात ऋचांचा आहे. या अध्यायाला 'अरण्यक श्रुती' म्हणतात. काही ठिकाणी या अध्यायातील केवळ तीन ऋचा रुद्राभिषेक प्रसंगी उपयोगात आणतात. उर्वरित चार ऋचा चितार्म्नी प्रसंगी वापरतात म्हणून त्या वर्ज्य गणल्या जातात. आठवा अध्याय पण महत्त्वपूर्ण असा 'चमकाध्याय' आहे. प्रत्येक ठिकाणी 'च मे' लावले जाते. वाजश्चमे, प्रसवश्चमे अशी चमके लावली जातात. हा अध्याय वैदिक गणितीय गणनदेखील आहे. एका चमे, तिस्र चमे, पंच चमे, सप्त चमे, नव चमे असे गणन यात आहे. नववा आणि दहावा अध्याय प्रघाताप्रमाणे शांतिमंत्र आणि स्वस्ती प्रार्थनाध्याय आहे.

आठ अध्यायाचे हे रुद्रसूक्त आहे. यातील मुख्य प्रार्थना 'तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु' हीच आहे. म्हणजे माझे मन शिवसंकल्पी म्हणजे कल्याणकारी संकल्पाचे होवो. रुद्राचा अर्थही तसाच आहे.

*रुतम (दुःखम) द्रावयती, नाशयती इति रुद्रः*

दुःखाचा नाश करतो तो रुद्र. रुद्राभिषेक करताना आपण नेहमी शब्द ऐकतो लघुरुद्र, महारुद्र वगैरे. काय आहे हे? भगवान महादेवाच्या पिंडीवर केवळ एकाच व्यक्तीने ११ वेळा रुद्राध्याय म्हटला तर त्याला एकादशनी म्हणतात. हाच रुद्राध्याय ११ जणांनी ११ वेळा म्हणजे एकूण १२१ वेळा म्हटला तर याला 'लघुरुद्र' म्हणतात. असे लघुरुद्र ११ वेळा झाले म्हणजे १३३१ वेळा झाले तर त्याला 'महारुद्र' म्हणतात. असे महारुद्र ११ वेळा झाले म्हणजे रुद्राध्याय १४,६४१ वेळा म्हटला गेला म्हणजे त्याला 'अतिरुद्र' म्हणतात. काही वेळा अति अति रुद्राभिषेकही केला जातो. प्रत्येक रुद्र प्रकाराला ११ पटीने वाढविल्यास पुढील वरिष्ठ रुद्रपाठ होईल.

रुद्र अष्टाध्यायी वैदिक ऋचांची असल्यामुळे ती अपौरुषेय आहे. तरीदेखील रुद्राचे कर्ते ऋषि स्वयं भगवान ब्रह्मदेव आहेत. काही ठिकाणी केवळ नमक चमक म्हणजे पाचवा नमकाध्याय आणि आठवा चमकाध्याय उपयोगात आणून रुद्रपूजन केले जाते.

*चमकं नमकं चैव, पौरुषसूक्तं तथैवच ।*
*नित्यं त्रयं प्रयुंजानो, ब्रह्मलोके महियते ।*

रुद्राध्यायीत जीवसृष्टीचा विचार म्हणजे वृक्ष, पशुपक्षी, अर्भकापासून कुंभारादी व्यावसायिक, सभा, सभापती, गण, गणपती अशा सर्वांच्या प्रति कृतज्ञभाव नमन केले आहे. थोडक्यात, रुद्राध्याय म्हणजे समाजजीवनाचा समन्वय आहे. व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्ठी यांची सांगड म्हणजे रुद्राध्यायी आहे. अजून एक गंमत सांगू; स्वातंत्र्यवीर सावरकरांनी वकील शब्दासाठी अधिवक्ता किंवा विधिज्ञ हे शब्द दिले. त्यातील 'अधिवक्ता' हा शब्द रुद्राध्यायीत आहे. 'अध्यवोचदधिवक्ता' ही ऋचाच आहे. असो.

रुद्राध्यायी प्रवृत्ती मार्गात तृप्तता प्रदान करून निवृत्ती मार्गाकडे नेते. रुद्राध्यायी अत्यंत ऊर्जादायी, समशीतोष्ण आणि प्रसंगी विद्युल्लतेसम सूक्त समूह आहे.

आपण सामूहिक रुद्रपाठ जेथे स्वराघातासह चालू असेल किंवा युट्यूबवर शांतचित्ताने ऐका फक्त. आपल्या शरीरातील स्पंदने आणि तरंग लहरी हेलावल्याचा अनुभव येईल. शरीरातील सर्व चक्रावर आघात होऊन कुंडलिनी जगदंबा लहरी कंपायमान होण्याची सुक्ष्म अनुभूती येईल. रुद्राध्यायी संथा घेतल्याशिवाय म्हणता येणार नाही, पण ती आपण युट्यूबवर ऐकू शकतो. केवळ ऐकली तरी चित्ताची विरागता, ऐश्वर्याचा विवेक आणि परमेष्ठीशी अनुसंधान अनुभूती नक्की येईल. श्रावणात प्रयोग तर करून पाहा.

शिवो भुत्वा, शिवम् यजेत्!

९८२२२६२७३५

### पावसाचा कहर अन् निवडणुकांची लहर

सर्व देशभर पावसाने थैमान घालून नद्या, नाले, सरोवरं, शहरी रस्ते नदीसदृश करून शहरी लोकांना नामोहरण केले. कित्येक इमारती, घरे पाण्यामुळे नेस्तनाबूत झालीत. घराघरांत पाणी शिरून वस्तूंची नासाडी झाली. लोक बेघर झाले. पिके नष्ट झाली. कित्येक लोक पाण्यात वाहून गेले. वाहने होडीप्रमाणे पाण्यावर वाहत होती. शेतकरी पावसाची वाट पाहात होता, पण आता त्याच्या डोळ्यात पाणी मावेनासे झाले. दरड कोसळली त्यामुळे रस्ते बंद. वाहतूक खोळंबली. नैसर्गिक आपत्तीमुळे देश हादरून गेला आहे. त्यातच बंगलादेशात सर्व हिंदूंवर अत्याचार, घरे जाळणे, मंदिर तोडणे असे प्रकार, आतंकवादीचा उपद्रव चालूच आहे. कित्येक जवानांना आपला जीव गमवावा लागला आहे. सर्व परिस्थिती विदारक असताना आमचे राजकारणी निवडणुकीसाठी उतावळे झालेले दिसून येत आहेत. निवडणुकींच्या प्रसार-प्रचाराच्या रणधुमाळीत मग्न आहे. लोकांच्या हितासाठी विधायक होऊन निवडून येतात. जनतेची किती काळजी आहे, हे दाखवतात; पण निवडून आल्यावर जनतेला विसरून आपले घर करोडो रुपयांनी भरत असतात. तेव्हा त्यांना जनता गरीब, बेरोजगारी आठवत नाही. आपला फायदा कसा होईल याकडे लक्ष देऊन असतात. एकमेकांवर मात्र शब्दच्छल करून 'तुम्ही कसे' हे गरीब जनतेला दाखवीत असतात. कोणी चांगली देशहिताची कामे करून देशाची प्रगती करण्याचा इमानदारीने प्रयत्न करीत असतात; ते त्यांना पाहावत नाही म्हणून त्यांची आगपाखड चालू असते. देशाची काय अवस्था होत आहे याकडे कानाडोळा करून आपणच कसे जनतेचे हितैशी आहोत, याचा प्रचार करीत असतात. बलात्कार-गुंडगिरीबद्दल राजकारणी लोकांना काहीच वाटत नाही. ही जनताच कंटाळून राजकारणी लोकांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही.

**मधुसूदन भावे**/९४०४०८९९१७

●● ●●

### दोष फक्त मुलींचाच कसा?

सद्यस्थितीवर इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, फेसबुक अशा समाजमाध्यमावर व्हिडीओ, फोटो, पोस्ट बघण्यात येत आहेत.

## वाचक पत्रे

कोलकाता येथे घडलेल्या घटनेबद्दल देशभरात चर्चा सुरू आहे. प्रत्येक वेळेला मुलींच्या राहणीमानावर टीकाटिप्पणी करून तिला दोष देण्यात येत असतो. या प्रसंगात डॉक्टर मुलगी कुठे चुकली होती किंवा कोणत्या तोकड्या कपड्यात होती अशातल्या कोणताच भाग नव्हता. तरीसुद्धा तिच्या सोबत जे घडले किंवा इतर मुलींसोबत जे दुष्कृत्य वाईट घडल्याचे प्रसंग पाहण्यात येत आहे, ते अत्यंत पीडादायक आहे. त्यामुळे आज आपल्या माता-भगिनींना घराबाहेर पडणे मुश्कील होत आहे. मुलींच्या जातीत जन्मास येणे हा काय अपराध आहे? मुळात पुरुषांची वासनांध वृत्ती हीच त्याला कारणीभूत आहे. माणूस म्हणून कसं जगायचं, यांचे नैतिक शिक्षण कालबाह्य झाल्यासारखे झाले आहे. घडलेल्या प्रसंगाबद्दल संपूर्ण देशभरात कॅण्डल मोर्चे काढले जात आहेत, ते केवळ एक सोपस्कार असल्यासारखेच असणार! न्याय मिळविण्यासाठी असले मोर्चे काढून प्रकाश पडला असता तर आज अशा अप्रिय घटना परत घडल्या नसत्या. समाजात वावरताना मुलींना अनेक निर्बंध लादले जातात. तसे मुलांनाही योग्य शिकवण दिली तर अशा अपप्रवृत्ती टळू शकतात. अशा नराधमांनी निष्पाप जीवांनाही सोडले नाही. पुरुष जातीला स्त्री जातीचा आदर करणे शिकवायला हवे. प्रत्येक पुरुषाला आपली आई-बहीण प्रिय असते. तोच विचार दुसऱ्या मुलींसाठी ठेवण्याची सद्‌बुद्धी मनात ठेवली तर अशा प्रसंगांची पुनरावृत्ती टळेल. शासनाने अपराध्यांना कोणाचाही मुलाहिजा न बाळगता त्वरित कारवाई करून कठोरात कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

●● ●●

### बंगालमध्ये राष्ट्रपती शासन लावा

कोलकात्यातील एका शासकीय रुग्णालयात रात्रपाळीत काम करीत असताना एका डॉक्टर तरुणीवर ज्याप्रकारे बलात्कार झाला व अतिशय वेदनादायक खून करण्यात आला, ही बाब शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. या घटनेत आपल्या देशातील विरोधी पक्ष केवळ राजकारण करीत आहेत, यापेक्षा मोठे दुर्दैव नाही. ममता बॅनर्जी या तिथल्या मुख्यमंत्री असताना त्या स्वतः मोर्चामध्ये सहभागी होतात; सारेच कसे नवल आहे. पोलिस यंत्रणा तुमच्या हातात आहे. अन्याय झालेल्या माणसाने दाद कोणाकडे



मागायची. कारण तेथील पोलिस यंत्रणा ही गुन्हेगारांचे संरक्षण करीत आहे. घटना झाल्यावर जवळपास सात-आठ हजार लोक दवाखान्यात दाखल होतात. सारी नासधूस करतात. कारण काय तर कोणत्याही प्रकारचा पुरावा मिळू नये. जर अशाप्रकारे कोणत्याही प्रकारचे सरकार वागत असेल तर कठीण वाटते. महिलांवरील बलात्कार प्रकरणी फाशीची शिक्षा झालीच पाहिजे. एका विशेष न्यायालयाने ही प्रकरणे चालवली पाहिजे. संदेशखालीसारखेच हे प्रकरणे होते आहे. त्यामुळे बंगालमध्ये राष्ट्रपती शासन लागू करावे, असे वाटते.

**विष्णू सोळंके**/७०२०३००८२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शिवस्वराज्य यात्रेस जिंतूरात हजारोंचा जनसमूदाय

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर : १७ ऑगस्ट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष मा.आ.श्री.जयंतजी पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली ''शिवस्वराज्य यात्रा'' आज जिंतूर मध्ये मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.शिवस्वराज्य यात्रा; हजारोंच्या संख्येने जमलेल्या जिंतूर-सेलूकरांनी प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील साहेबांचे प्रचंड स्वागत केले.

सन्मा. संसदरत खा. अमोल कोल्हे साहेब, आ.राजेशभैय्या टोपे साहेब, खा. फौजिया खान मॅडम, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, जिल्हाध्यक्ष विजयराव गव्हाणे साहेब, सौ.प्रेक्षाताई भांबळे यांचासह पदाधिकारी, प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत शिवस्वराज्य यात्रेची भव्य सभा पार पडली. ''शेतकऱ्यांचे चाललेले हाल, सत्ताधाऱ्यांच्या फुसक्या योजना, वाढती बेरोजगारी, जनतेची चाललेली ससेहोलपट या सर्वांना आवाज देण्यासाठी शिवस्वराज्य यात्रा उभी टाकली आहे. राज्यातील गावागावात, शहरा शहरात जाऊन जनतेच्या प्रश्नांना आम्ही वाचा फोडतोय. महाराष्ट्राचा स्वाभिमान पुन्हा परत करण्यासाठी, गद्दारी गाडण्यासाठी, महाराष्ट्र धर्म जपण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आरंभलेली ही न्याय यात्रा होती. यावेळी प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील साहेबांनी संबोधित करतांना म्हंटले कि, लोकसभा निवडणुकीत जनतेने त्यांना जागा दाखवल्यानंतर ते विविध योजनेचा पाऊस नागरिकांवर पाडून मते मिळवण्याचा प्रयत करणार आहेत. परंतु, शासनाने लादलेले विविध टॅक्स शेतमालाचा भाव आणि मिळणाऱ्या योजनेतील लाभ पाहता शासन आजही तोंडाला पान पुसत आहे. या योजना नागरिक स्वीकारतील का नाही यावर विश्वास नसल्याने सर्व सरकारी कर्मचारी कामाला लाऊन योजनेची जाहिरात बाजी करत आहेत. परंतु, जिंतूर-सेलूकरांची उपस्थिती पाहता मा.आ.विजयराव भांबळे यांचा विजय निश्चित असल्याचे मला दिसत आहे असे स्पष्ट उद्गार काढले. बेलगाम, हुकूमशाही सरकारला आणि त्यांच्या प्रतिनिधींना, शेतकरी कष्टकऱ्यांच्या या शत्रूंना सत्तेतून खाली खेचा,'' असा चौफेर हल्ला प्रांताध्यक्ष जयंत पाटील साहेबांनी सरकारवर चढवत सत्ताधाऱ्यांवर टिका केली. यानंतर मनोगत व्यक्त करताना मा.खां.अमोल कोल्हे साहेब यांनी महाराष्ट्र आजचा बाजार खपऊन घेणार नाही. तर त्यांना



आपण येत्या निवडणुकीत जागा दाखऊ असा निर्धार केला. लोकसभा निवडणुकीनंतर घसरता पाय पाहता मतांची झाली कडकी म्हणून बहिण झाली लाडकी अशी कानपिचकी देत सत्ताधाऱ्यांवर सडकून टिका केली. तर मा.आ.विजयराव भांबळे साहेबयांनी मत व्यक्त करतांना म्हंटले कि, तेव्हाही सांगितलं होत आजही सांगतो... आम्ही गद्दारी केली नव्हती आणि करणारही नाही, शेवटच्या श्वासापर्यंत पवार साहेबांशी एकनिष्ठ राहणार. ज्यांनी पक्षाशी, जनतेशी आणी आपल्या मातीशी गद्दारी केली अशा लोकांनी त्यांची जागा दाखवायचं काम आपण सर्वांनी मिळून करायचं. निवडणुकीत पैशाचा महापूर येणार आहे. तुम्हाला पैसा पाहिजे कि जनतेसाठीच काम यातील एकाची निवड करा आणि मगच आपल अमूल्य मत द्या. तसेच चालू असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना यावर म्हंटले कि, मागच्या दोन वर्षापासून ह्याचं सरकार होत मग तेव्हा ''लाडकी बहिण'' का नाही आठवली, जर योजना काढायचीच तर सुरक्षित माझी बहिण योजना काढा असे म्हंटले.

तसेच सौ.प्रेक्षाताई भांबळे-बोराडे यांनी म्हंटले कि, बेरोजगारी, महिलांवरील अत्याचार आपण किती दिवस सहन करणार? महाराष्ट्राच्या जपण्याची वेळ आता आली आहे. जिंतूर शहरातील लोक लोडशेडिंगमुळे त्रस्त आहेत, पण इथल्या सत्ताधारी आमदाराला तो प्रश्नही सोडवता आला नाही. अशी टिका स्थानिक आमदारावर केली. उपस्थित जनतेने यावेळी राजेशभैय्या टोपे साहेब, मेहबूब शेख यांचे मार्गदर्शन ऐकले. यावेळी सय्यद खैसर व सय्यद गफ्फार भाई चारठाणकर यांच्यासह शंभर कार्यकर्त्यांचा, बोरकिनी येथील सुरेश मुसळे, प्रसाद मुसळे, नवनाथ मुसळे व विष्णू मुसळे यांच्यासह एक्क्यानव कार्यकर्त्यांचा, नरसापूर येथील संदीप ढाले , अक्षय वाकळे, कोंडीराम वाकळे यांच्यासह एक्तीस कार्यकर्त्यांनी, मलेटाकळी नेताजी काशिनाथ ताठे व इतर दहा जन, खरदडी येथील माणिकराव थिटे , उद्धवराव थिटे यांच्यासह पंचेवीस सहकारी, हकीमलाला यांच्या माध्यमातून एकशे वीस कार्यकर्त्यांचा, सेलू शहर मधील शेख मुख्तार उर्फ राजू, मोहम्मद शेख बेलदार यांच्यासह आठ जणांनी, तसेच ढेंगळी पिंपळगाव येथील चेअरमन नारायणराव सोळंके, केशव चोरमाले यांच्यासह दहा कार्यकर्त्यांनी प्रांताध्यक्ष जयंतजी पाटील साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. यावेळी मंचावर उज्वलाताई राठोड, विश्वनाथ राठोड, अजयभैया चौधरी, रामराव उबाळे, राजेंद्र लाहाने, अशोक नाना काकडे, मुरलीधर मते, विठ्ठल घोगरे, अभिनय राउत, बालासाहेब रोडगे, विनायक पावडे, मनीषाताई केंद्रे, सुधाकर रोकडे, शरद अंभूरे, आशाताई खिल्लारे, निर्मलाताई लिपने, गणेशराव उबाळे, साबिया बेगम फारुकी, बाळासाहेब भांबळे, पृथ्वीबाबा भांबळे, दलमीर पठाण, बंटी निकाळजे, मनोहर डोईफोडे, इस्माईल पहेलवान, शाहेद बेग मिर्झा, शोएब जानिमिया, अहेमद बागबान, लखुजी जाधव, दत्तराव काळे, शौकत लाला, अभिलाष राउत, अविनाश काळे, शाहेद सिद्धिकी इत्यादींसह पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### सकल हिंदू समाजाच्यावतीने पूर्णा बंदला व्यापाऱ्यांचा संमिश्र प्रतिसाद



**पूर्णा,/प्रतिनिधी:**बांगलादेश येथे अल्पसंख्यांक हिंदू समाज बांधवांवर होत असलेल्या क्रूर अन्याय अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने १७ ऑगस्ट शनिवारी पुर्णा बंदचे आवाहन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहून बांगलादेश येथील घडलेल्या घटनेचा तीव्र निषेध केला यावेळी तहसीलदार माधवराव बोथीकर यांना निवेदन देण्यात आले या बंदमध्ये सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता व सर्व व्यापारी बांधवांनी स्वयंपूर्तीने दुकाने बंद ठेवून बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.समाधान पाटील यांच्या मार्गर्शनाखाली पोलिस निरीक्षक विलास गोबाडे यांनी शहरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### संभाजी ब्रिगेडचे मुंबई येथे आज अधिवेशन

**सेलू,/प्रतिनिधी:** मराठा सेवा संघ-संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय अधिवेशन २२ ऑगस्ट रोजी नवी मुंबई येथे विष्णुदास भावे नाट्यरंग मंदिरामध्ये आयोजित करण्यात आले आहे, या अधिवेशनास तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेडचे राज्य उपाध्यक्ष छगन शेरे यांनी केले आहे संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनाचे उद्घाटन खा.अमोल कोल्हे,आ. रोहित पवार,अभिनेते सयाजी शिंदे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.संभाजी ब्रिगेडने गेल्या दहा वर्षांमध्ये अर्थकारण चळवळीला प्राधान्य दिले आहे.आर्थिक साक्षरता घडवणे,तरुणांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे हा यामागचा हेतू आहे.या निमित्ताने विविध कार्यक्रम होत असून प्रसिद्ध लेखक प्रफुल वानखेडे यांची मुलाखत प्रसिद्ध पत्रकार अभिजीत करंडे हे घेणार आहेत. ज्येष्ठ व्याख्याते निरंजन टकले हे गांधींच्या स्वप्नातील भारत या विषयावर व्याख्यान देणार आहेत. ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार हे महाराष्ट्र धर्म या विषयावर बोलणार आहेत.तसेच ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश महाराव हे मार्गदर्शन करणार आहेत. समारोपाच्या सत्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती यांचा विशेष शाही सन्मान करण्यात येणार आहे उद्योग व्यवसाय मार्गदर्शनासह विविध मान्यवरांचे सत्कार सोहळे पार पडणार आहे म्हणून तरुणांनी अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेडचे राज्य उपाध्यक्ष छगन शेरे,बजरंग आरकुले,निलेश शिंदे,ऋषी चट्टे,शशांक टाके,उत्तम डोंबे,अतुल डख,सचिन रोडगे यांनी केले आहे

### वराड यांन केला स्वखर्चातून रस्ता



**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुक्यातील सायखेडा येथील सरपंच गजानन वराड व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक यांनी असोला पाटील ते सायखेडा पर्यंत हा रस्ता तीन किलोमीटरचा असून या रस्त्यामुळे गावात जाणाऱ्या नागरिकांना चिखलातून जावं लागत होते परंतु सायखेडा गावातील नागरिकांनी गजानन वराड यांच्याकडे मागणी केली असता गजानन वराड यांनी शासनाकडे कुठल्याही निधीची मागणी न करता गावकऱ्यांच्या मागण्या मान्य करूनकुठल्याही गोष्टीचा विचार न करता आपल्या स्वखर्चातून चिखलमय रस्ता दुरुस्त करून त्या रस्त्यावर संपूर्णपणे मुरूम टाकण्यात आला आहे यामुळे मुरूम टाकल्यामुळे गावातील नागरी मोठ्या संख्येने गजानन वराड पाटील यांचे कौतुक करीत आहेत असाच उपक्रम इतर गावांनी घ्यावा असेही आवाहन केले.

### प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खा.अमोल कोल्हे यांचे जंगी स्वागत

**जिंतूर,/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काढण्यात आलेल्या शिवस्वराज्य यात्रेचे सेलूत तालूका राष्ट्रवादी च्या जंगी स्वागत करण्यात आले तर माजी जि. प. सभापती अशोकराव काकडे यांच्या वतीने त्यांच्या निवासस्थानीही स्वागत करण्यात आले .यावेळी येणाऱ्या सर्व मान्यवरांची भोजनाची देखील व्यवस्था करण्यात आली होती . राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने लढा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा '' शिव स्वराज्य '' यात्रेचे नियोजन राज्यभर करण्यात आले आहे .




सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३


## सोनपेठ तालुक्यात चक्क बोगस पिक विम्याचा भरणा

**सोनपेठ/ प्रतिनिधी-** तालुक्यातील ज्या गावांमध्ये महसुली रेकॉर्डला कुठल्याही प्रकारची सात बारा वर नोंद नसलेल्या बोगस शेतकऱ्यांनी पिक विमा लाटण्याच्या उद्देशाने चक्क खोट्या कागदपत्रांच्या आधारे १३,१७० हेक्टर वर पिक विम्याचा भरणा केला असल्याची माहिती समोर आली असून सदरील बोगस पिक विम्याचे प्रस्ताव तात्काळ रद्द करण्याची मागणी शेतकरी संघटनेच्या वतीने तहसीलदार सोनपेठ यांच्याकडे करण्यात आली आहे.

मागील काही वर्षापासून सोनपेठ तालुक्यातील कुठल्याच महसुली गावामध्ये शेतजमिनी नसणारे बोगस शेतकरी, खोट्या कागदपत्रांच्या आधारे तालुक्यातील काही गावांमध्ये शेती असल्याचे दाखवून पिक विमा भरत आहेत. त्यामुळे शासनाचा पीक विमा परतावा खऱ्या शेतकऱ्यांना अपेक्षित प्रमाणात मिळत नसल्याने तालुक्यातील खऱ्या शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. यावर्षी सन २०२४ च्या खरीप हंगामातील विविध पिकांचा अशाच प्रकारे बोगस पिक विमा भरण्यात आला असल्याची माहिती शेतकरी संघटनेच्यावतीने देण्यात आली आहे. त्यामध्ये सखाराम तांडा ९१२ हेक्टर, भाऊ तांडा २९१२ हेक्टर, मुंशीराम तांडा १०९० हेक्टर, कोठाळा तांडा ३९९ हेक्टर, तुकाई तांडा ५४६ हेक्टर, सोनपेठ ग्रामीण १३७७ हेक्टर, रेवा तांडा ३६२५ हेक्टर, सोनपेठ शहर २३०६ हेक्टर व प्रत्येक गावातील बोगस पीक विमा भरलेल्या क्षेत्राच्या पुढे पुन्हा गुंठ्यामध्ये असलेले क्षेत्र धरुन एकूण १३ हजार १७० हेक्टर वर बोगस पिक विमा भरणा केला आहे. तालुक्यातील या आठ गावांमध्ये बोगस पीक विमा भरणाऱ्या लाभार्थ्यांची कुठल्याही प्रकारची शेतजमीन नसल्याचे सांगितले जाते.त्यांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे पिक विमा भरणा केल्यामुळे, भविष्यात तालुक्यात पिक विमा लागू झाल्यास तालुक्यातील खऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होऊन त्यांना बाधित क्षेत्राचा अपेक्षित पिक विम्याचा परतावा मिळत नसल्याचे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणाचा लवकरच भांडाफोड होणार असून अशा बोगस पिक विमा लाटणाऱ्या लाभार्थ्यांनी भरणा केलेल्या पिक विम्याचे प्रस्ताव तात्काळ रद्द करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी ही शेतकरी संघटनेच्या वतीने केली जात आहे. या निवेदनावर शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष विश्वंभर गोरवे, गणेश पाटील यांच्या स्वाक्षरी आहेत.

## अमृत कल्याणकारी योजनेचा लाभ घेवून उत्कर्ष साधा- धर्माधिकारी

**पूर्णा,/प्रतिनिधी-** खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी अमृत स्वायत्त संस्थेच्या विविध कल्याणकारी योजना आहेत त्याचा लाभ घ्या असे आवाहन भुषण धर्माधिकारी (मुंबई) यांनी केले.

येथील महावीर नगर मधील शनि मंदिर सभागृहात १७ ऑगस्ट शनिवारी खुल्या गटातील आर्थिक दुर्बल घटकांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ( अमृत ) या स्वायत्त संस्थेच्या वतीने मार्गदर्शन शिबीर व बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी संस्थेचे वक्ते भूषण धर्माधिकारी हे मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी दीपक जोशी (छत्रपती संभाजी नगर) अनंत जोगदंड (परभणी )अभिजित चक्के, भास्कर भाले, सुभाषचंद्र ओझा, लक्ष्मीकांत कदम, प्रभाकर कोत्तावार, प्रविण कोत्तावार, वसंत पांपटवार, रमण ओझा, सतीश टाकळकर, नरेश पुणपाळे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना भूषण धर्माधिकारी म्हणाले, खुल्या गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल ( ) जे तरुण व तरुणी आहेत यांना स्वयंरोजगार, कृषी उद्योग प्रशिक्षण, ड्रोण प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा, अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम, संगणक, टंकलेखन, लघुलेखन, किशोरी विकास प्रकल्प, वैयक्तिक कर्ज, परशुराम गट, व्याज परतावा योजना साठी अमृत संस्था मदतीसाठी तयार आहे. महाराष्ट्रातील अमृत संस्थेचे अनेक लाभार्थी मोठ्या स्वाभिमानाने व्यवसाय करीत आहे. ज्यांना परशुराम गटामध्ये बचत गटामार्फत व्यवसाय करावयाचा असेल यांनाही अमृत संस्था मदत करण्यास तयार आहे.उद्योग व्यवसाय करताना आपल्याला बँकेमार्फत कर्ज घ्यावे लागणार असून त्याच्या परतफेडसाठी जे व्याज होईल.त्या व्याजाची रक्कम (१२% ) पर्यंत अमृत संस्था देणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून लक्षित समाजाने जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले. याप्रसंगी अमृत लक्षित गटातील गणमान्य व्यक्ती व लाभार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक दीपक जोशी यांनी केले सुत्रसंचालन व आभार अनंत जोगदंड यांनी केले

## गणेश काजळे यांनी घेतली मनोज जरांगे यांची भेट

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण मागणीवर ठाम असलेले मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारने सगेसोयरे अध्यादेश काढला नाही तर उमेदवार उभे करण्याची भूमिका घेतली आहे म्हणून काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गणेश काजळे यांनी मनोज जरांगे पाटील यांची दिनांक १८ ऑगष्ट रोजी अंतरवाली सराटी येथे भेट घेऊन उमेदवारीची मागणीसाठी आपला अहवाल दिला आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊन सगेसोयरे अद्यादेश काढण्याच्या मागणीसाठी आपल्या भूमिकेवर ठाम असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २९ ऑगष्ट पर्यंत अध्यादेश काढला नाही तर आगामी काळात विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा केली होती यासाठी महाराष्ट्रातही इच्छुक उमेदवारांचे अहवाल मागवण्यात येत आहेत त्या अनुषंगाने गणेश काजळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह मनोज जरांगे पाटील यांची अंतरवाली



सराटी येथे भेट घेऊन सेलू जिंतूर विधानसभेच्या उमेदवारीसाठी आपला अहवाल दिला आहे म्हणून आगामी काळात मनोज जरांगे पाटील उमेदवार देणार की दुसरा काही निर्णय घेतात याकडे तालुक्यातील मराठा समाजाचे लक्ष लागले आहे भेटीच्या वेळी प्रदीप काजळे,बालाजी शिंदे,राम पाटील,गुलाबराव ठोंबरे, राजेभाऊ शिंदे,अक्षय काकडे, छत्रपती शिंदे,कल्याणराव हिंजे दामोदर घुगे, प्रकाश थिटे, सुभाष काजळे, अनिल गाडेकर,अँड माधव दाभाडे,शिवाजी लिपणे भागवत कापुरे, नितीन ढवळे, राजू जोरगेवार,केशव देशमुख, कृष्णा राऊत, मारोती मगर,बळीराम गटकळ पाटील, रामभाऊ तारडे, सचिन घोगरे, गणेश वाघ,शिवाजी लिपने, रामप्रसाद बोराडे,महेश कोंडके गणेश परखंड,माणिक ढवळे,विजू पोळ,किसन आवरगंड,कैलास मस्के यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते आपणही समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून नेहमी मराठा समाजाला मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत केलेले आहेत.

### नव मतदारांनी नाव नोंदणी करावी- शेळके

**परभणी,/प्रतिनिधी-** महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांनी व भविष्यातील नवं मतदारांनीही मतदार यादीत नाव नोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य पी.बी. शेळके यांनी केले.

परभणी तालुक्यातील पोखर्णी येथील नृसिंह उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित नवं मतदार विशेष नोंदणी कार्यक्रमात ते बोलत होते.

## इंडिया पोहचला चंद्रावर पण, सहज पोहोचता येत नाही आरोग्य केंद्रावर

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील कै. अण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्थेच्या वतीने पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या स्मृतिप्रीत्यार्थ कै. रा.ब. गिल्डा सभागृहात रविवार ( दि. १८ ) रोजी आयोजित काव्य मैफिलीत शहरातील कवी-कवयित्रींनी आपल्या कविता सादरीकरणातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. माधव गव्हाणे यांनी इंडिया सहज जाऊन पोहोचला मंगळा सहित चंद्रावर, आम्हाला ईतक्या सहज पोहचता येत नाही आरोग्य केंद्रावर या आपल्या कवितेतून वास्तव जाणिव करुन दिली.

गौतम सूर्यवंशी यांनी धर्म,पंथ ,अन भेद नको , समानता ही हवी एकसंघ या



भारताची ,ओळख देऊ नवी, भेद सारे विसरूनी ,आता समरस होऊ चला आपल्या या रचनेतून समताभाव जागविला. अश्विनी - संजय विटेकर या गझलकार दाम्पत्याच्या जुगलबंदीने रसिक श्रोत्यांच्या चेहऱ्यावर हास्यफुलले. अश्विनी विटेकर यांनी, तुझ्या आठवांचा पहारा वगैरे, किती गोड हा कोंडमारा वगैरे. तर संजय विटेकर यांनी , घेवून टाक आता वापस मिठी तुझी तू , ठेवून मी कुणाचे उपकार घेत नाही. ही गझल सादर केली. डॉ. शरद ठाकर यांनी तुझ्या रुपाने पडल माझ्या नशिबी चांदण. , डॉ.

### बहारदार काव्य मैफिलीने जिंकली रसिकांची मने

जयश्री सोन्नेकर यांनी पंथ माझा जातही माहीत नाही, फक्त मी माणूस, याचे भान आहे. संध्या फुलपगार यांनी मी कशाला बरे कुणाची चाकरी करावी म्हणते, अर्धीच पण हक्काची भाकरी करावी म्हणते. प्रभू शिंदे यांनी, काल आपल्या गावातलं पोरगं

मोबाईल खेळत होतं , भलं मोठं आजगर, त्याच्या मांडीवर बसलं होतं. सुमिता सबनिस यांनी, पोरावानी जपतोया ,जसं पोटचाच पोर, बाप मव्हा रातदिस ,कापसाच्या मागम्होर. ही कविता सादर केली. तर हरिष कवडे यांनी, मंत्र्याचा लाल दिवा, गाव सार पेटवून गेला, बाप - लेक, चुलते - पुतने, अशी रक्ताची नाती गोठवुन गेला. या कवितेतून राजकीय वास्तव मांडले. कवी डॉ. अशोक पाठक, दिलीप डासाळकर, मुख्याध्यापक सर्जेराव लहाने, शैलजा वसेकर, करूणा बागले, डॉ. राजाराम झोडगे, संभाजी रोडगे, शुक्राचार्य शिंदे, दिलीप दौड, डॉ. निर्मला पद्मावत, राम गायकवाड यांनी आपल्या कविता सादरीकरणातून रसिकांच्या काळजाचा ठाव घेतला. सेलूकर रसिकांनी काव्य मैफिलीस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.के. डी. वाघमारे हे होते. काव्य मैफिलीचे उद्घाटन प्रेक्षाताई भांबळे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक काव्य मैफिलीचे आयोजक कै. अण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अशोक काकडे यांनी केले. काव्य मैफिलीचे बहारदार सुत्रसंचालन कवी सुरेश हिवाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन कॉ. अशोक उफाडे यांनी केले. काव्य मैफिल यशस्वीतेसाठी संतोष कुलकर्णी, मोहन बोराडे,किशोर कटारे, संदीप काष्टे, अरविंद लहाने, शिवाजी गजमल यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

## बी अलर्ट

# अशाही मैत्रिणी...

प्रा. विजया मारोतकर/ ८३२९५८७६००



'सकाळी कॉलेजच्या नावाने घराबाहेर पडायचं, अभ्यास वगैरे नावालाच! भटक भवानी नुसती भटकत असते. उद्यापासून अजिबात कॉलेजला जायचं नाही,'बाबांचा रुद्रावतार झाला होता. ते अश्विनीला रागवत होते. आईलाही सांगून गेले. 'या पोट्टीवर लक्ष ठेव. हिला बिलकुल घराबाहेर जाऊ द्यायचं नाही. मागील काही दिवसांपासून मला माझा तो रमेश वानखडे मित्र सांगतो आहे. परंतु, मी लक्ष दिलं नाही. जेव्हा त्याने विथ पूफ मला सगळं दाखवलं. हिचा व्हिडिओही दाखवला. तेव्हा खरं मानावंच लागलं. त्यामध्ये दिसते आहे ही! चक्क एका लॉजमधून त्या बावळटासोबत बाहेर पडताना! माझा मित्र म्हणाला, मला ही पंधरा दिवसांपूर्वीसुद्धा दिसली. पण, मला वाटलं की, माझाच गैरसमज झाला असेल. तोंडाला दुपट्टा बांधला असल्यामुळे माझ्या विशेष लक्षात आले नाही. परंतु त्या दिवशी तिने बांधले नसल्यामुळे मी स्पष्ट ओळखले. तसाच लांबून व्हिडिओ बनवला आणि तुला पाठवत आहे. तो व्हिडिओ त्याने मला दाखवला. तेव्हा माझी ही खात्री पटली. आपण यांच्यासाठी मरमर करून, कष्ट करायचे. यांनी छान शिकून मोठ्या पदावर गेलं पाहिजे, अशी आशा करायची आणि यांनी अशी थेरं करायची. दहावीला बऱ्यापैकी मार्क्स मिळाले म्हणून बारावीला सायन्स दिलं पण, तेव्हा ही वेगळ्याच मार्गाला लागली होती. तिथून कसंबसं बाहेर काढून, सायन्स जमत नाही म्हणून आता कॉमर्स दिलं. तर कॉमर्सला सोपे समजून दिवसभर भटकत राहते. परीक्षेच्या दोन दिवस आधी थातूरमातूर अभ्यास करायचा आणि कसंतरी पास व्हायचं, काय अर्थ आहे अशा शिक्षणाला आणि त्या डिग्रीला...' संतापलेले बाबा ऑफिसला निघून गेले.

अश्विनी आईजवळ रडत सांगायला लागली,'आई, माझी या मुलासोबत अजिबात ओळख नव्हती. माझी मैत्रीण रागिणीनेच मला या तिच्या बॉयफ्रेंडचा मित्र असलेल्या या मुलासोबत ओळख करून दिली. मागे कॉलेजच्या पिकनिकला जातो म्हणून सांगून, आम्ही कॉलेजच्या पिकनिकला न जाता स्वतंत्ररीत्या गाडी करून जबलपूर-भेडाघाटला गेलो होतो. हॉटेल मध्ये राहिलो आणि आई, तिथे नको ते घडलं. आता मी वेगळ्याच प्रॉब्लेममध्ये अडकले आहे.' असं म्हणून ती रडू लागली. आईने पुन्हा दोन झापडा तिच्या श्रीमुखात दिल्या. 'काय गोंधळ करून बसलीस? वर तोंड करून सांगायला काही लाज वाटत नाही का?' अश्विनी नुसती रडत होती. 'आई, आता अशी स्थिती झाली आहे की, त्याला भेटल्याशिवाय उपाय नाही. त्याला मी म्हटलं की, आता हे कोण निस्तरणार? तर मला म्हणतो की, आपण डॉक्टरकडे जाऊ या! आई, मला डॉक्टरकडे जाणे खूप आवश्यक आहे.'

'अश्विनी, तू हे काय बोलते? माझ्या अंगावर काटा आलाय. आम्हाला विष खायला भाग पाडणार आहे का तू? आई, मी काय करू? मला कळतच नाही. हे सारं कसं काय घडत गेलं? अश्विनीच्या बाबतीत हा सारा प्रकार घडला होता. कोंडीत सापडल्यामुळे त्याला पुन्हा भेटणे आवश्यक होते. त्यामुळे तो बोलवेल तिथे ती जात होती. चुकीच्या मैत्रिणीमुळे तिने आपले आयुष्य असे पणाला लावले होते. आज हॉस्टेलवर राहणाऱ्या मुलींचे भविष्य धोक्यात आले आहे. मुलीच मुलींना वेगळ्या मार्गाने घेऊन जातात. एका खोलीमध्ये तीन मुली राहत असतील त्यापैकी दोन मुलींना बॉयफ्रेंड असतील तर त्या तिसरीला पण बॉयफ्रेंड मिळवून देतात. तो या दोन मुलींच्या बॉयफ्रेंडचाच मित्र असतो. ही मुले बाहेरची, रस्त्यावर फिरणारी, पानठेल्यावर रेंगाळणारी, बहुतेक बेरोजगार...अशी असतात. ती ना यांच्या अभ्यासक्रमात सोबत असतात ना नोकरीमध्ये ! तर ही इकडतिकडचीच अशी रस्त्यावर फिरणारी टवाळखोर मुलं, नाव-गाव-पत्ता सारं खोटं सांगून मुलींना अक्षरशः फसवतात. मैत्रीण सांगते आहे म्हणून मुली फसतात. आज मुलींनाच मुलींपासून धोका निर्माण झालेला आहे. हे सत्य आहे त्यामुळे अशा प्रकारांमध्ये घडणाऱ्या मैत्रिणींपासून सावध रहाणे फार गरजेचे आहे.

> रात्री उशिरापर्यंत मित्रमैत्रिणींसोबत पार्ट्या, तोकडे कपडे घालून, सिगारेट फुंकणाऱ्या मद्यधुंद मुली! त्यांच्या व्यसनाधीन अवस्थेचा गैरफायदा घेणारे 'बॉयफ्रेंड'! या सगळ्यांचा परिणाम होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडलं आहे. आता याच सर्व वर्तुळात आपल्याला जगायचंय. तेव्हा आपला मार्ग आपल्यालाच शोधावा लागेल. आजूबाजूला काटे आहेत मग, आपण चालायचंच नाही का? नक्कीच चालायचं. नव्हे तर या वाटेवर कसं चालावं? असा विचार करावा लागेल.

आज अशा प्रकारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आईवडिलांनी काबाडकष्ट करून आपल्याला शिकवायला पाठवलं आहे. आपण त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून केवळ अभ्यासाकडेच लक्ष दिलं पाहिजे. हे सारं समजत असूनही उमजत नाही. असं अश्विनीसारख्या मुलींच्या बाबतीत घडत आहे. कितीही ठरवलं तरी या वातावरणाने निर्माण केलेल्या जाळ्यांमध्ये कुठेतरी अडकून जातात आणि नको ते घडतं जातं. ते घडलेलं इतकं भयंकर असतं की, ते जीवावरच उठतं म्हणून मुलींनी स्वतःच्या मनावर ताबा ठेवणं नितांत गरजेचे आहे. आपण सावध व्हायला पाहिजे. ती तिच्या बॉयफ्रेंडचा मित्र असलेल्या मुलासोबत मैत्री करायला सांगते म्हणजे ती योग्य मार्गाने चालायला सांगत नाही, एवढं साधंसं आपल्याला का कळू नये?

जसे तिच्या मैत्रिणीने अश्विनीला सांगितलं,'अश्विनी, तू नाही का त्या राकेशला खूप आवडते. तो म्हणतो की, माझी एकदा फक्त एकदा तिच्यासोबत भेट घालून दे. बाकीचं मी बघेन. अगं, तुझ्या बारीकसारीक गोष्टी त्याला माहिती आहेत. तू खूप छान गाते, छान बोलते याचं त्याला भारी कौतुक आहे.' अशा प्रकारे राकेशबद्दल बरंच काही सांगून मैत्रिणीने राकेशसोबत ओळख करून दिली आणि मग काय राकेशने ठरवल्यानुसार आपोआपच अश्विनी त्याच्यामध्ये गुंतत गेली. अवतीभवती नियमित घडणाऱ्या किती घटनांबाबत मुलींना सांगावं, कळत नाही. कालपरवाची उरणमध्ये घडलेली घटना किती भयावह आणि दुर्दैवी आहे. त्या मुलीच्या बॉयफ्रेंडने तिच्या शरीराचे तुकडे केले. मुलींना कळत नाही आणि त्या मुलांमध्ये गुंतत जातात. काही दिवसांतच त्यांच्या लक्षात येतं की, हा बॉयफ्रेंड चुकीचा आहे, आपल्या योग्यतेचा नाही. मग ती त्याला भेटायचं टाळते. त्यावेळेला तो तिचे जुने फोटो, माहिती, चॅट, व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देतो. या धमकीमुळे मुली पुन्हा त्या चिखलात फसत जातात. आपली ही चूक झाली. त्यामुळे आपण आता त्याचं ऐकायलाचं हवं. काय करावे? तिला सुचत नाही.

तारुण्यात अनेकदा चुकीची वळण येतात. त्या वळणांवर थांबून योग्य निर्णय घेता आलाच पाहिजे. एक वळण चुकलं की, पुढचा रस्ता गुंतागुंतीचा होतो. जो मुलीचे, तिच्या आईवडिलांचे आयुष्य उध्वस्त करतो. समाज त्या घराकडे वेगळ्या नजरेने बघतो. पुढचे जीवन जगणे कठीण होते. काहीही चूक नसताना हा समाज दंड भोगावा लागतो. तेव्हा कुठे पोरीला वाटते की, काही चूक नसताना माझ्या आईबाबांना सारं सहन करावं लागलं. कशाला जन्माला आली ही कुलटा म्हणून मला दोष देत होते. त्यांच्यावर अशी वेळ आणली कोणी? तर मी!

रात्री उशिरापर्यंत मित्रमैत्रिणींसोबत पार्ट्या, तोकडे कपडे घालून, सिगारेट फुंकणाऱ्या मद्यधुंद मुली! त्यांच्या व्यसनाधीन अवस्थेचा गैरफायदा घेणारे 'बॉयफ्रेंड'! या सगळ्यांचा परिणाम होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडलं आहे. आता याच सर्व वर्तुळात आपल्याला जगायचंय. तेव्हा आपला मार्ग आपल्यालाच शोधावा लागेल. आजूबाजूला काटे आहेत मग, आपण चालायचंच नाही का? नक्कीच चालायचं. नव्हे तर या वाटेवर कसं चालावं? असा विचार करावा लागेल. संस्कारांची,स्वनियंत्रणाची आपल्याकडे असलेली कवचं पायामध्ये घालून आपण आपल्या वाटेवरून बिनधास्त ध्येयापर्यंत चालत जायचं. परंतु, आपण पादत्राणं काढून ठेवली तर हे काटे पायाला रक्तबंबाळ करणारच. हे इतकं सरळ सोपं आहे. म्हणून गं लेकींनो पावलोपावली बी अलर्ट...!

## ती

# बॅंडिट क्वीन फुलनदेवी!

जयश्री दाणी/ ८२७५४८८११४

ऑगस्ट महिन्यात पाऊस असला तरी विविधरंगी फुलं सृष्टीविभ्रमात भर घालतात. म्हणूनच एका गरीब नावाड्याच्या घरी १० ऑगस्ट रोजी जन्मलेल्या मुलीचे नाव फुलन ठेवण्यात येते. फुलांसारखं कोमल मन असणारी ही मुलगी पुढे, कुख्यात डाकू फुलनदेवी होईल, असं त्यावेळी कुणालाही खरं वाटलं नसतं. फुलनचं आयुष्य केवळ दरोडे-खून यावरच भाष्य करत नसून, समाजातील भेदभाव, यौनशोषण, अशिक्षितपणा, हुंडा, जातीव्यवस्थेतील विद्रुपतेवर परखड बोट उचलते.



साध्या स्वभावाचे वडील आणि कडक स्वभावाची आई असणाऱ्या या अश्राप मुलीला अचानक हातात बंदूक का घ्यावी लागली? या प्रश्नाचे उत्तर काळीज चिरणारे आहे. तीन बहिणी आणि एक भाऊ असणाऱ्या फुलनच्या वडिलांची सारी शेती चुलत्याने कपटाने हडपली. तो त्यांना नेहमी मारझोड करीत धमकावत असे. दुसऱ्यांच्या शेतात राबणं, गवंडी कामाला जाणं अशी काम फुलन आणि तिची भावंडं करीत. बरेचदा अर्धपोटी, उपाशी रहात. अकराव्या वर्षी फुलनचं लग्न तिच्या वडीलांच्या वयाएवढ्या दुष्ट इसमाशी झालं. फुलन वयात येण्याआधीच त्याने तिचे यौनशोषण केले. त्या नराधमाला कंटाळून फुलन वारंवार माहेरी पळून यायची पण, तिथे तिच्या पदरी पडायच्या त्या अवहेलनाच! एके दिवशी तिचा नवराच पळून गेला, त्याने दुसरे लग्न केले. तर, नवरा नसणारी बाई म्हणून गावातील टारगट लोकांसोबतच सरपंच, पाटील तिच्याकडे वाकड्या नजरेने बघू लागले.

क्षुल्लकशा चुकीसाठी सरपंचाच्या मुलाने पंधरा वर्षाच्या फुलनवर तिच्या आईवडीलांदेखत बलात्कार केला. फुलनने पोलिसांकडे दाद मागितली. पण, उलट तिच्यावरच आरोप करीत तिला आणि तिच्या वडीलांना तुरुंगात टाकण्यात आलं. जेलमधून सुटून गावी आल्यावर, सरपंचाने बाबू गुज्जर या डाकूला तिची सुपारी दिली. बाबू गुज्जरने तिच्यावर बलात्कार केला. पण, ते बघून त्याच्याच गॅंगमधला डाकू विक्रम मल्लाह याने बाबू गुज्जरला ठार करून फुलनला वाचवलं. तो फुलनच्याच जातीचा असल्यामुळे त्याने हा गुन्हा केला.

आता फुलन डाकूंच्या टोळीमध्ये सहभागी झाली. गावोगावी दरोडे टाकायचे, श्रीमंतांना लुटून गरीबांना मदत करायची. डाकू फुलनने तिच्यावर अत्याचार करणाऱ्या सरपंच पाटलाला बडवलं. फुलनचा बदला घेण्यासाठी तिची निर्वस्त्र धिंड काढली गेली आणि तिच्यावर अनेकजणांनी अमानुष बळजबरी केली. यातून फुलन कशीबशी सुटका करून पळाली व या क्रूर कृतीचा जबरदस्त वचपा काढण्याचं ठरवलं. फुलनने तिच्यावर अत्याचार करणाऱ्या श्रीरामला लपविण्यासाठी मदत करणाऱ्या ठाकूरांना एका रांगेत उभे करून गोळ्या घातल्या. वाऱ्याच्या वेगाने देशभर पसरलेल्या या बातमीने एक सामान्य मुलगी फुलन भारतातील मोस्ट वॉन्टेंड डाकू बनली.

१९७६ ते ८३ असा काळ चंबळच्या दऱ्याखोऱ्यांत डाकू म्हणून गाजवल्यावर फुलनने १२ फेब्रुवारी १९८२ रोजी मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांसमोर आत्मसमर्पण केलं. बारा वर्षे तुरुंगात घालवल्यानंतर १९९४ मध्ये तिच्यावरील सर्व आरोप माफ होऊन ती जेलमुक्त झाली. वर्ष १९९६ मध्ये ती समाजवादी पक्षाकडून मिर्झापूरची खासदार होऊन संसदेवर गेली.

२५ जुलै २००१ रोजी दिल्लीतील शासकीय निवासस्थानाबाहेर तिची गोळ्या मारून हत्या करण्यात आली. एक अल्लड, निरागस बालिका ते प्रलयंकारी डाकू असा हा फुलनचा प्रवास थरकाप उडविणारा आहे.

## साप्ताहिकी

अपर्णा विचोरे-आठल्ये/ ९८२२७०१०६२

# मनमोहिनी 'मृगनयनी'

**संगीताचा आस्वाद घेतानासुद्धा पडदापद्धती सुटत नव्हती. अशा परिवारात मुक्त निन्नी बैजूकडून संगीताचे धडे घेते, हे तर कल्पनेपलीकडचे होते.**

**काल** यु ट्युबवर ग्वाल्हेरच्या आसपासची पर्यटन स्थळे शोधत असताना राजा मानसिंग तोमरचा महाल बघायला मिळाला. राणीवशातील स्त्रियांसाठी खूप बारकाईने विचार करून महाल घडवलेला जाणवलं. राण्यांची सुरक्षितता, सोय आणि मनोरंजनाचा विचार करून बांधलेल्या, आजही मजबूत असलेल्या वास्तूला बघताना आपले स्थापत्यशास्त्र तेव्हाही किती प्रगत होते ते कळतं.



राणीवशाची माहिती देताना गाईडच्या तोंडून राजाच्या नऊ राण्यांचा उल्लेख झाला पण, राणीवसा मात्र आठ राण्यांचे अस्तित्व दर्शवत होता. नववी राणी तिथे रहात नव्हती आणि मला जाणवलं ही तर आपल्या 'मृगनयनी'ची कथा! तोमरवंशीय शूर राजा मानसिंग हा तेव्हाच्या रिवाजानुसार पाठराख्यांची संख्या वाढवण्यासाठी आठवेळा विवाहबद्ध झाला होता पण, तो राजकारणाचा भाग होता. त्याच्या मनात प्रणय भावना फुलवली ती वनकन्या निन्नीने! निन्नीच्या सर्व अटी मान्य करून तिला सोबत घेऊन मानसिंग राजवाड्यात परतला आणि खळबळ माजली. राजाचं नववं लग्न ही काही अनपेक्षित बाब नव्हती. समाज आणि कुटुंब (पक्षी: राणीवसा) मानसिकदृष्ट्या त्यासाठी अनुकूलच होता. पण, अनागर संस्कृतीतील, राजघराण्यातील नसलेली मुलगी सवत म्हणून किंवा राणी म्हणून स्वीकारणं अवघडच होतं. त्यातून, निन्नी स्वतःच्या अटींवर राजधानीत आली होती, हे तर प्रस्थापितांकडून सर्वस्वी अस्विकृत होतं. मग, घडलेला इतिहास कादंबरी रुपात आजच्या समाजापुढे सादर केला. प्रसिद्ध हिंदी साहित्यिक वृंदावनलाल शर्मा यांनी 'मृगनयनी' या कादंबरीद्वारे आणि दूरदर्शनच्या प्रेक्षकांपर्यंत ती पोहचली अमोल पालेकर निर्मित 'मृगनयनी' या मालिकेद्वारे!

'मृगनयनी' त्या कालखंडातील लक्षवेधी मालिका ठरली. मुख्य भूमिकेत होते राजबिंडे मोहन भंडारी आणि आपल्या अभिनयाने अल्पावधीतच लोकप्रिय झालेली अभिनेत्री पल्लवी जोशी! याशिवाय रेखा सहाय, स्मिता जयकर यांनी मालिकेतील भूमिकांना योग्य न्याय दिला.

खरंतर, निन्नी गुज्जरी, जिचं पुढे 'मृगनयनी' असं नामकरण झालं. ही तत्कालीन समाजावर प्रभाव टाकणारी वीरमाता होती. त्याचबरोबर, ती आपल्या सांस्कृतिक मुळांना जपणारी होती म्हणूनच, मानसिंग तिच्याकडे आकर्षित झाला. कादंबरीतील हे पैलू मालिकेत दाखवले गेलेच नाहीत. निन्नीचं राजासोबतच साहचर्य प्रेमिकेचं होतं, एकमेकांसाठीची आंतरिक ओढ हा त्याचा पाया होता. पती-पत्नी संबंधातही राजकारण, आपापल्या कुळमर्यादा, दर्जा यांचं अस्तित्व जोपासणाऱ्या राणीवशात पतीच्या आयुष्यात राजकारणातला मोहरा हेच स्थान असलेल्या राण्यांच्या मनात निन्नीबद्दल पराकोटीचा सवती मत्सर आणि स्वतःबद्दल न्यूनगंड उपजला नसता तरच नवल होतं. याचं चित्रण मात्र दिग्दर्शकाने छानच केलं. संगीताचा आस्वाद घेतानासुद्धा पडदापद्धती सुटत नव्हती. अशा परिवारात मुक्त निन्नी बैजूकडून संगीताचे धडे घेते, हे तर कल्पनेपलिकडचे होते. निन्नीचे नागर सामाजिक संकेत धुडकावणे, त्यातून उद्भवणारा पारिवारिक आणि सामाजिक रोष, निन्नीच्या तथाकथित गैरवर्तणुकीला राजाने प्रेमापोटी पाठीशी घालणं, बैजू-निन्नी- मानसिंग यांच्या काल्पनिक प्रेम त्रिकोणाला दिलेले अवास्तव महत्त्व असे अनेक दोष असले तरी अभिनय, कथावस्तू या मुद्द्यांमुळे 'मृगनयनी' प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहिली.

## रानभाज्यांच्या जगात

# आरोग्यवर्धक, गुणकारी अरतफरी

संगीता ठलाल / ७८२१८१६४८५

रानात मिळणारी फळं, भाज्या, कंदमुळं या सर्वच गुणकारी असतात. सोबतच, ते आरोग्यासाठी लाभदायक असतात. आजकालची खाद्यपद्धती काळानुसार बदलत चालली आहे. विविध आजारांना तोंड देत, आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी रानातील भाज्यांचा आहारात समावेश असणं आवश्यक आहे. अशीच एक गुणकारी भाजी म्हणजे 'अरतफरी'! ही जास्त करून रानात सापडते किंवा रस्त्याच्या कडेला दिसते. तिचे झुडूप असते सोबतच, मोहाच्या वृक्षाखाली ती उगवलेली दिसते. कुंदाच्या मोठ्या वेलीसदृश झाडासारखी ती वाढते. अरतफरीची भाजी पचन आणि वातविकारांवर विशेष गुणकारी आहे. एवढेच नाही तर ती खूप गरम असते. ही भाजी जास्त किंवा वारंवार खाल्ल्यास पोटदुखी होण्याची शक्यता असते. म्हणून या भाजीला प्रमाणातच खायला हवे. अरतफरी भाजीची पानं थोडीफार कुंदाच्या पानांसारखी दिसतात. तिच्या बारीक आणि उंच गेलेल्या फांद्यांच्या टोकांवर कोवळी पाने येतात. त्यांना झाडीबोलीत कोवळे डीरे म्हणतात आणि तेच खाल्लेही जातात. या भाजीला लहान पिवळसर रंगाची फळंसुद्धा लागतात पण, ही फळं खाल्ली जात नाहीत. भाजीला एक वेगळा गंध असून, गरमागरम भाजी खूपच चविष्ट लागते. विदर्भातील अनेक रानात या भाजीचे झुडूप बघायला मिळते. ही भाजी बनविण्याची पद्धत फार सोपी आहे. आधी त्या कोवळ्या डिऱ्यांना बारीक चिरून घ्या. नंतर, त्यांना धुवून एखाद्या चाळणीत पंधरा मिनिटे ठेवावं जेणेकरून सर्व पाणी सुकून जाईल. नंतर कढईत तेल तापवून घ्यावे. या भाजीला भरपूर कांदे लागतात त्यामुळे बारीक चिरलेले कांदे घालून कडक फोडणी द्यावी. त्यात सुकलेल्या लाल मिरच्या, मीठ आणि हळद घालून छान एकजीव करून घ्यायचं. कढईवर झाकण ठेवून कमी आचेवर शिजवलं की, पाच मिनिटांनी धुतलेली भाजी त्यात घालून चांगली परतून घ्यावी. पाण्याचा एक थेंबही न टाकता भाजी शिजते. या खमंग भाजीचा सुगंध हातांतून तासभर तरी जात नाही. गरम भाकऱ्या किंवा चपातीसोबत ही भाजी खाल्ली जाते. बाजारात सहज मिळणारी ही अरतफरीची भाजी निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेली आणि आरोग्याला लाभदायक असते. वर्षभरात जेव्हा संधी मिळेल तेव्हा ही भाजी आवर्जून खाल्लीच पाहिजे.



**ऑगस्ट महिना भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील क्रांती पर्व मानला जातो. जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत काँग्रेसच्या सभेत भारत छोडो, चले जाव हा ठराव पास करून घेतला. नंतर, गोवालिया टॅंक येथील सभेत तत्कालीन ब्रिटिश सरकारला 'भारत छोडो, चले जाव' असा खणखणीत इशारा दिला. ९ ऑगस्टपासून महात्मा गांधींच्या आव्हानाचे उग्र पडसाद पूर्ण भारतभर उमटले. जशा सागराच्या एका पाठोपाठ एक लाटा उसळतात तशा ब्रिटिश शासनावर जनलाटा आदळू लागल्या. महात्मा गांधींच्या अहिंसक मार्गाने ब्रिटिश सरकारच्या विरोधात 'करो या मरो' चा लढा लोक जिद्दीने ऑगस्ट क्रांती लढा म्हणून लढवू लागले.**



# याद करो कुर्बानी!

पंकज पाटील/९८५०४३०५७९



यालढ्याचे रणशिंग वाजल्यावर सबंध देशभर एक अभूतपूर्व जागृती झाली. आंदोलन मोठ्या प्रमाणावर भडकण्याचा रंग दिसत होता. ब्रिटीश सरकारने महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल अशा दिग्गजांना ताब्यात घेत अटकसत्रच राबविलं. इंग्रज सरकारच्या या कारवाईचे तीव्र पडसाद देशभरात गावोगावी दिसू लागले. नेत्यांची दुसरी फळी पुढे सरसावली आणि त्यांनी 'करेंगे या मरेंगे' अशी घोषणा देऊन चळवळीचा आगडोंब उसळू दिला. सामान्य जनतेने केलेल्या सत्याग्रह, नि:शस्त्र प्रतिकार त्यांच्याबरोबर सशस्त्र आंदोलनालाही उधाण आलं. सर्वत्र हरताळ, बहिष्कार, मोर्चे यांची धुमश्चक्री उडाली. अनेक समाजवादी नेत्यांनीसुद्धा सरकारला दे माय धरणी ठाय करून टाकले.

भारतभर तारायंत्रे तोडणे, रेल्वे स्टेशन व पोस्ट ऑफिस लुटणे, सरकारी कार्यालय जाळणे, युरोपियन व्यक्तींवर हल्ले चढवणे इत्यादी कृत्यांना ऊत आला. ही क्रांती दडपण्यासाठी ब्रिटिशांनी जनतेविरुध्द दमन व अटक सत्र सुरू केले. भारतभर चलेजाव चळवळ दिवसेंदिवस उग्र रूप धारण करू लागली. भारतातील प्रमुख तुरुंग क्रांतिकारकांच्या कारावासाने तुडुंब भरले. सरकारने दडपशाहीचा कहर करूनही चळवळ रोखली जाईना. तिकडे युरोपातील युद्धात इंग्रज सरकारला हिटलरी सैन्यापुढे जबरदस्त मार खावा लागला. सुभाषबाबू तर जपानी सैन्याच्या सहकार्याने भारताच्या पूर्व द्वारापर्यंत येऊन ठेपले होते. त्यांनी आपल्या सेनेला दिल्लीवर हल्ला चढवण्याचा आदेशही दिला. आझाद सैनिकांची भारताच्या दिशेने आगेकूच सुरू झाली. दुर्दैवानं यावेळी युरोपातील युद्धात दोस्त राष्ट्रांना म्हणजे अमेरिका, इंग्लंड व फ्रान्सचा विजय झाला. त्यामुळे इंग्रजांना दम घेण्यास वेळ मिळाला. तथापि, त्यांची मुजोरी ओसरली. वाट्टेल त्या स्थितीत भारताला स्वातंत्र्य दिलंच पाहिजे, अशी वेळ आली.

स्वातंत्र्य संग्रामात राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, रंगो बापूजी, अझीमुल्ला, मंगल पांडे, वासुदेव फडके, दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, दामोदरपंत व बाळकृष्ण चाफेकर, अरविंद व बारींद्र घोष, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपीनचंद्र पाल, खुदिराम बोस, सेनापती बापट, सत्येंद्र बसू, कन्हैयालाल, विनायकराव व गणेशपंत सावरकर, लाला हरदयाळ, रासबिहारी बोस, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्यासह अनेक अज्ञात राष्ट्रभक्तांनी आपापल्या परीने योगदान दिलं. फाशी, जन्मठेप, तुरुंगवास आणि तुरुंगातील अनन्वित छळ अशा शिक्षा त्यांनी भोगल्या.

क्रांतीदिन ९ ऑगस्ट हा देशासाठी प्राणपणाने लढलेल्या सर्व महान सुपुत्रांचा स्मरण दिवस मानला जातो. भारत छोडो आंदोलनाच्या माध्यमातून क्रांतीची मशाल पेटवून, सर्वस्व राष्ट्रार्पण करत भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या सर्व महान क्रांतिकारकांची कृतज्ञतापूर्वक आठवण काढून त्यांना त्रिवार वंदन करू या!

# जुनी पेन्शन योजना लागू न केल्यास २९ ऑगस्टपासून बेमुदत संपाचा इशारा

## नगर पालिका संवर्ग अधिकारी संघटनेकडून निवेदन सादर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ ऑगस्ट**

महाराष्ट्र राज्य शासनाचे अधिकारी, कर्मचारी यांच्या राज्यस्तरीय विविध संघटनामार्फत जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी दि २९ ऑगस्टपासून बेमुदत संपाचा इशारा देण्यात आला आहे. या संपात नगर पालिका संवर्ग अधिकारी संघटनाही सहभागी होणार असून यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतेच प्रशासनाला निवेदन सादर केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत नगर पालिका, नगर पंचायतीमधील सन २००५ नंतरच्या अधिकारी आणि कर्मचारी यांना अद्याप राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. तसेच जुनी पेन्शन योजना बंद करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य संवर्गातील जवळपास ३ हजार अधिकारी आणि स्थानिक आस्थापनेवरील ६० हजार कर्मचारी वर्ग यांच्यात कमालीचा असंतोष पसरला आहे. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी संघटना व सदस्य आग्रही आहेत. तसेच संघटनेमार्फत राज्य शासन, नगरविकास विभाग व नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना वेळोवेळी निवेदने सादर करणयत आली आहेत. परंतु अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मुलभूत समस्या व मागण्याबाबत शासनाकडून दुर्लक्ष होत आहे.

त्यामुळे दि १४ ऑगस्ट रोजी संघटनेची विशेष सभा घेण्यात आली. त्यामध्ये शासनाने दि २८ ऑगस्ट पर्यंत जुनी पेन्शन योजना तसेच इतर प्रलंबीत मागण्या मान्य न केल्यास अथवा ठोस निर्णय न घेतल्यास महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्यावतीने राज्यव्यापी बेमुदत संप पुकारण्यात येणार आहे. निवेदवार जिल्हाध्यक्ष बाळू बांगर, उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे, संदीप घुगे, सनोबर तसलीम, नाईक, पुतळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण नोंदणी शिबीर

## आ. मुटकुळे यांचे नेतृत्वात शिबीराचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ ऑगस्ट**

शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजने संदर्भात २१ ऑगस्ट रोजी शिबिर घेण्यात आले. या शिबीराला मोठ्या संख्येने महिलांनी नोंदणीसाठी गर्दी केली होती. यावेळी सर्व महिलांचे कागदपत्रे गोळा करून त्यांची रितसर नोंदणी करण्यात आल्यामुळे महिलांनी समाधान व्यक्त केले. आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी हिंगोली विधानसभा मतदार संघात भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजनेमध्ये नोंदणी करण्यासाठी गावपातळीपासून ते शहरातील विविध प्रभागांमध्ये नोंदणी शिबीराचे आयोजन करण्याचे आदेश दिले. त्यानंतर शहरातील विविध प्रभागांमध्ये भाजपचे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शहराध्यक्ष कैलाशचंद काबरा, गोल्डी सोनी यांच्या नेतृत्वाखाली शहरात ठिकठिकाणी शिबिर आयोजित केले जात आहे. या निमित्त २१ ऑगस्टला प्रभाग क्रमांक ९ मध्ये आशिष शर्मा यांच्या नेतृत्वात शिबिर घेण्यात आले. सकाळपासूनच महिलांची नोंदणीसाठी गर्दी होती. यावेळी शिबिराकरीता नंदा इंगळे, विक्की गोरे, शुभेंद्र कुलकर्णी, अभय जोशी, स्वप्नील सोनपावले, तेजस रत्नपारखी, दशरथ भुसांडे, महेश कानडे, राजेश लामदाडे, सचिन गोरे, सागर अग्रवाल, चिंटू शर्मा, सौरभ जैस्वाल, किशोर गुंडेवार यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

या योजनेमध्ये कोणतीही महिला वंचित राहू नये या उद्देशाने हिंगोली शहरातील प्रत्येक प्रभागात शिबिर घेण्याचे नियोजन आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी केले आहे. प्रत्येक शिबिरामध्ये शेकडो महिलांची नाव नोंदणी केली जात आहे.

# सामाजिक संस्था, नागरिकांनी वृक्षारोपनाची जबाबदारी घेतल्यास रोपांचे वाटप- मुख्याधिकारी मुंढे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ ऑगस्ट**

हिंगोली नगर पालिकेच्यावतीने यावर्षी १५०० रोपांचे वृक्षारोपन करण्यात येणार आहे. सामाजिक संस्था तसेच वृक्षप्रेमी नागरिकांनी संवर्धनाची जबाबदारी घेतल्यास विविध प्रकारची रोपे वापट करणार असल्याची माहीती मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी दिली.

नगर पालिकेच्यावतीने बुधवार दि २१ ऑगस्ट रोजी पोलिस अधीक्षक कार्यालयासमोरील डिव्हाडरमध्ये वृक्षारोपनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेहस्ते वृक्षारोपन करण्यात आले. याप्रसंगी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे, पोलिस निरीक्षक विकास पाटील, नगर अभियंता रत्नाकर अडसिरे, अधीक्षक देवीसिंह ठाकूर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मुख्याधिकारी यांनी सांगितले की, नगर पालिकेच्यावतीने शहरात विविध ठिकाणी १५०० झाडांचे वृक्षारोपन करण्याची जबाबदारी घेण्यात आली आहे. या मोहीमेची सुरूवात आजपासून करण्यात आली असून या मोहीमेत सामाजिक संस्था आणि वृक्षप्रेमी नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.

या झाडांमुळे हिंगोली शहर स्वच्छ आणि सुंदर दिसण्यात मदत होणार आहे. साधारण ८ ते १२ फुट उंचीपर्यंत वाढणारी ही झाडे असून शहरातील विविध भागात वृक्षारोपनाचा कार्यक्रम भविष्यात हाती घेण्यात येणार आहे.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात बुधवारी उबाठा शिवसेनेची बैठक घेण्यात आली. यावेळी आ. भास्कर जाधव यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी खा नागेश पाटील आष्टीकर, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख, विनायक भिसे, अयोध्या पौळ, परमेश्वर मांडगे, माजी आ. संतोष टारफे, अजित मगर, उध्दवराव गायकवाड आदी. छाया- विजय गुंडेकर**

# बदलापूर येथील घटनेचा व्यापारी महासंघाकडून निषेध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ ऑगस्ट**

बदलापूर येथे दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्यंत घृणास्पद घटनेचा निषेध जिल्हा व्यापारी महासंघाचेवतीने करण्यात आला असून आरोपींना कठोर शिक्षा करण्यात यावी आणि यानंतर अशा प्रकारच्या घटना घडून नयेत यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात अशी मागणी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांचेमार्फत मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांना निवेदनाद्वारे पाठविण्यात आली आहे.

बदलापूर येथील नामांकित शाळेत दोन चिमुरड्यांवर लैंगिक अत्याचारा झाल्याने या घृणास्पद घटनेचा तसेच राज्यातील अकोला, सिल्लोड, माजलगाव, लातूर व ईतर ठिकाणी झालेल्या घटनांचा हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाचेवतीने तीव्र निषेध करीत असल्याचे निवेदनात नमूद आहे. समाजाला लाजवेल अशी ही घटना असून या करता जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी तसेच या घटनेची कुठे हि पूनरावृत्ती होणार नाही या करता कठोर नियम ावली तयार करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थाना विशेष खबरदारीच्या सुचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर जिल्हा व्यापारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष अनिल नैनवानी, अध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, दिलीप चव्हाण, गजेन्द्र बियाणी, सुमीत चौधरी, जुबेर मामु यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये रक्षाबंधन



हिंगोली- स्मृतीशेष अॅड. ग्यानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थेचे राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन येथे २० ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणानिमित्त शाळेत राखी बांधनाच्या कार्यक्रम घेण्यात आला.याप्रसंगी शाळेतील मुलींनी मुलांना राखी बांधली आणि बहीण भावाचे अतुट नाते कायम राहावी अशी शपथ घेतली. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक डोल्हारे, पर्यवेक्षक बल्लाळ उपस्थित होते. तसेच कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक कान्हेड, पठाडे, श्रीमती टेकाळे, श्रीमती पाईकराव, श्रीमती कान्हेड, श्रीमती जोजार, श्रीमती ठोके, श्रीमती नायक, इम्रान शेख, नरवाडे ताई आदींनी सहकार्य केले.

### औंढ्यात मतदार नोंदणीसाठी जनजागृती रॅली



औंढा नागनाथ- मतदार नोंदणीसाठी जन जागृती रॅलीचे आयोजन जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या निर्देशानुसार तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाचेवतीने करण्यात आले होते. या रॅलीत विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहरातील प्रमुख मार्गावरून रॅली काढण्यात आली होती. तहसीलदार हरिष गाडे, नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकृष्ण दराडे, नितीन कुलकर्णी, समन्वयक विनोद साळवे, उमाकांत मुळे, आपरेटर घोडके यांनी परिश्रम घेतले.

### सहा ठिकाणी अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर धाडी

हिंगोली- जिल्ह्यात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांवर कार्यवाही सुरू असून पोलिसांनी अवैध दारू विक्री करणाऱ्या सहा ठिकाणी धाडी टाकल्या असून घटनास्थळावरून ७१ हजार ३८० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून संबंधितांवर दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# बारकोड असलेली मृत्यू प्रमाणपत्र मिळेनात

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २१ ऑगस्ट**

तालुक्यामध्ये शंभर ग्रामपंचायत असून विविध कामासाठी कुटुंबीयांना ग्रामपंचायत मधून मयत व्यक्तींच्या मृत्यू प्रमाणपत्राची विविध कामासाठी आवश्यकता असते परंतु गेल्या चार महिन्यांपासून बारकोड असलेली मृत्यू प्रमाणपत्रे तांत्रिक अडचणीमुळे मिळत नसल्यामुळे तालुक्यातील कित्येक कुटुंबीय त्रस्त झाली आहेत. ग्राम पंचायत कार्यालय पिंपळदरी येथे एक वर्षापासून मयत असलेली आदिवासी महिला बारकोडचे मयत प्रमाणपत्र अभावी तिच्या पतीस विविध प्रकारची कामे असूनही मिळत नाही तर आदिवासी समाजातील एक इसम चार महिन्या पूर्वी मयत झाला असून त्याच्या वारसाला सुद्धा बारकोड असलेले मयत प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे त्याच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. पेन्शन कार्यवाही दाखल करता येईना आणि भारतीय जीवन विमामधून त्याच्या जीवितवावर असलेली विमा पॉलिसी चे पैसे मिळना, अशी अवस्था झाल्यामुळे संबंधित कुटुंब उपासमारीला सामोरे जात आहे. याबाबत ग्रामविकास अधिकारी सुनील मुळे यांच्याशी संपर्क केला असता काही तांत्रिक अडचणीमुळे बारकोड असलेले प्रमाणपत्र मिळत नसल्याची कबुली त्यांनी दिली. याबाबत विशेष लक्ष घालून बारकोड असलेली मयत प्रमाणपत्र सर्व ग्रामपंचायत मधून त्वरित वितरित करण्यात यावी असे आदेश गटविकास अधिकारी जी यु कुलारे यांनी द्यावेत अशी मागणी होत आहे.



तरुण भारत

छोटे उस्ताद



**तुम्हाला माहिती आहे का?**

- रशिया आणि बेलारूस या दोन देशांवर ऑलिम्पिक्स २०२४ मध्ये खेळण्यावर बंदी आहे.
- २०२८ चे ऑलिम्पिक्स लॉस एंजिलिसमध्ये होणार आहेत.
- यंदाचे ऑलिम्पिक्स हे 'ग्रीनेस्ट' मानले जात असून, पर्यावरण सुरक्षेसाठी खेळाडूंनासुद्धा एसी नसलेली निवासव्यवस्था करण्यात आली आहे.

## अशी पाखरे येती...

**निशिकांत मायी / ९८८११५२४३९**

# पक्ष्यांचा 'कोतवाल'!



कावळे-ससाणे आदी मोठे हिंस्र पक्षी लहान-मोठ्या पक्ष्यांना आपले भक्ष्य करण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असतात. अशावेळी असा एक पक्षी जो पोलिसाचे कर्तव्य निभावून अशा हिंस्र पक्ष्यांच्या मागे लागतात व त्यांना पिटाळून लावत लहान-मोठ्या पक्ष्यांचे एक प्रकारे संरक्षणच करतात. म्हणूनच या पक्ष्याला 'कोतवाल' असे सार्थक नाव पडले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ३१ सें मी आकाराचा काळ्या रंगाचा सडपातळ आणि अतिशय चपळ असलेल्या कोतवाल पक्ष्याची लांब आणि दुभंगलेली शेपटी हे त्याचे खास वैशिष्ट्य! नर आणि मादी समसमानच दिसतात. संपूर्ण भारतात आढळून येणारा कोतवाल, अन्य देशांमध्येही आपले अस्तित्व टिकवून आहे. मोकळ्या मैदानी प्रदेशात राहणे अधिक पसंत करणारे कोतवाल साधारणपणे गुरांच्या कळपात शिरून विविध कीटक पकडून खातात. त्याचमुळे, मुळात कीटभक्षी असलेला कोतवाल क्वचितप्रसंगीच कीटक, परागकण आदी आपले खाद्य बनवतात. यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इतर पक्ष्यांनी आणलेले खाद्य हिसकावून खाण्यात ते तरबेज असतात. एप्रिल ते ऑगस्ट हा काळ कोतवालांचा वीणीचा हंगाम असून यांचे घरटे जमिनीपासून ५ ते १० मीटर उंच झाडांवर खोलगट, काटक्यांनी व कोळ्याच्या जाळ्यांनी बनविलेले असते. तीन ते पाच संख्येत अंडी देणारी मादी कोतवाल आणि नर कोतवाल दोघेही मिळून पिलांचं संगोपन करतात. संपूर्ण काळा असल्याने कोतवालाला 'कोळसा' असंही एक नाव आहे.

बुलबुलपेक्षा मोठा असल्याने नराच्या तुलनेत मादीचा रंग कमी तकतकीत असतो. साधारणतः चरणाऱ्या गुरांच्या पाठीवर विराजमान होऊन तो कीटक टिपतो. कोतवाल हा पक्षी अतिशय चपळ असतो. गोंगाट्या व भांडखोर असला तरी तो गरीब पक्ष्यांना त्रास देत नाही. हिंस्र पक्ष्यांपासून आपल्या बरोबर तर पक्ष्यांच्या घरट्यांचे किंवा पिलांचे रक्षण करताना त्याचे गुण प्रकर्षाने प्रकट होतात. कावळ्याचा पाठलाग करत, त्याला टोचा मारून हैराण करताना तो अनेकदा दिसतो. इतकेच नव्हे तर, गरुड व ससाण्यावरही हल्ला चढवायला तो मागेपुढे बघत नाही. त्यामुळे, लहान आणि सौम्य वृत्तीचे इतर पक्षी आपली घरटी तिथेच बांधतात, जिथे कोतवाल पक्ष्याचे घरटे असते. जेणेकरून तो कोतवाल हिंस्र पक्ष्यांपासून छोट्या पक्ष्यांचं रक्षण करतो. भक्ष्य शोधण्याचीही कोतवालाची एक खास अदा आहे. एखाद्या झाडाची अगदी वरची वाळकी फांदी किंवा लटकणाऱ्या तारांवर बसून तो भक्ष्यावरसारखी पाळत ठेवतो. हवेतील अथवा जमिनीवरचा एखादा किडा दिसला की, त्याला पकडून तो आपल्या जागेवर येऊन बसतो. आपल्या भक्ष्याचे तुकडे तोडून खाऊन टाकतो.

## सुभाषितवैभव

**मुलांनो!** तुमच्यासमोर अनेक अर्थ उलगडून दाखविताना आणि तुम्हाला दहा गोष्टी सांगताना मला त्याहून अधिक लाभ झाला आहे. अजूनही आपण माहिती पातळीवरच आहोत. ज्ञान हा अधिक सखोल, गहन आणि गुरुकृपेने लाभणारा विषय आहे. ज्ञान हे चिरंतन, मूलगामी आणि सर्वसमावेशक असते. ज्ञानाचे रक्षण कसे महत्वाचे असते, हे एका लहानशा उदाहरणाने नेमकं सांगण्यासाठी सुभाषितकार लिहितात,


***आर्यो वृक्षः प्रार्थना तस्य मूलम्***
***विद्या शाखा धर्मकर्माणि पत्रम् ।***
***तस्मान्मूलं यत्नतो रक्षणीयम्***
***छिन्ने मूले नैव शाखा न पत्रम्***

**सरलार्थ** : असं समजा की, एखादी सभ्य व्यक्ती म्हणजे जणू वृक्ष आणि प्रार्थना त्याचे मूळ आहे. त्याने प्राप्त केलेल्या विद्या म्हणजे जणू फांद्या आणि तो जी धर्मकर्मे करतो, जी कर्तव्ये पार पाडतो ती सर्व जणू त्या पुरुषवृक्षाची पाने असतात. असं असताना जर मूळाचे रक्षण करता आले नाही तर फांद्या तरी कशा वाढणार? फांद्याशिवाय पानांची निर्मिती कशी होणार? म्हणजे खरं तर मूळाचे रक्षण केले नाही तर वृक्षाचं अस्तित्वच धोक्यात येईल. तद्वतच प्रार्थना या तत्वाचे महत्त्व असल्याचं सुभाषितकार सांगतात. प्रार्थना या घटकाचे मूल्य जर कळलं तर त्या अनुषंगाने तीन अशा घटकांचा लाभ होतो, ज्यामुळे आपल्या ज्ञानाचा मार्ग प्रशस्त होतो. भगवान श्रीकृष्ण त्याविषयी गीतेत सांगतात की

***तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।***
***उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः॥***

सरलार्थ : भगवान श्रीकृष्ण म्हणतात, हे अर्जुना! तू जाण. ते ज्ञानी आणि तत्व जाणणारे लोक ज्ञानाचा उपदेश जरूर करतील. पण, त्याकरिता प्रणिपात म्हणजे संपूर्ण झुकून केलेला नमस्कार, प्रार्थनापूर्वक नम्रतेने शंकानिरसनासाठी विचारलेला प्रश्न आणि विनयपूर्वक केलेली सेवा हे तीन घटक फलदायी ठरतात. तेव्हाच ज्ञानी लोकांना ज्ञान द्यावेसे वाटते. हे प्रार्थनेचे महत्व आणि सर्व यशाचे गमक आहे. मुलांनो! प्रार्थना आपल्याला विनम्रता देते. आपल्यापेक्षा जे वयाने मोठे ते लौकिकदृष्टीने कदाचित पदव्या घेतलेले नसतील. पण, म्हणतात ना त्यांनी चार पावसाळे जास्त पाहिलेले असतात. त्या अर्थाने म्हणजे अनुभवाने तरी ते आपल्यापेक्षा मोठेच असतात. नमस्काराच्या निमित्ताने त्यांच्याजवळ जाता आलं, त्यांना मोकळेपणाने मनातील सांगता/विचारता आलं आणि त्यांची सेवा करावीशी वाटली तर तुम्हाला काही ना काही लाभ झाल्याशिवाय राहणार नाही, हे नक्की! सेवा म्हणजे कधीतरी पाय दाबणे नव्हे. त्यातील खोल अर्थ तुम्ही शोधा.


**- डॉ. हंसश्री मराठे**
९४२१२७७८०५




## वंडर किड्स
## लहानशी नृत्यांगना विधिशा

**संजय पेंडसे/९४२२४४३२९५**

बालमित्रांनो, जर आपल्याला कोणत्याही विषयात प्रावीण्य मिळवायचं असेल मग, तो अभ्यास असो किंवा कला ! परिश्रम करण्याला पर्याय नाही. आता बघा नं ! विधिशा हिला अगदी चार वर्षांची असल्यापासून नृत्याची प्रचंड आवड! अगदी टीव्हीवर गाणं लागलं की, तिचे पाय थरथर व्हायचे आणि हुबेहूब त्या ठेक्यावर तिचं नृत्य सुरू व्हायचं. पण, गुरु पाहिजे असतो ज्ञान द्यायला, असा गुरु तिला मिळाला आणि मग तिची 'नृत्य' कलेमध्ये प्रगती होत गेली. पण, यश मिळण्यासाठी ती फक्त नृत्य शिकली नाही तर अगदी हैदराबाद, मुंबई, रायपूर, भिलाई, नागभीड आणि छिंदवाडा अशा ठिकाणी जाऊन तिने आपली कला सादर केली. पाच वर्षांच्या कालावधीमध्ये ३० ते ४० पारितोषिके विविध स्पर्धांमधून मिळवली. वेस्टर्न डान्स याबरोबरच कत्थकच्याही परीक्षा तिने दिल्या आहेत. आज बारा वर्षांची



विधिशा आठव्या वर्गात शिकते आहे. नृत्यातील तिचे गुरू पाटील सर आणि कत्थकसाठी गुरू योगिनी यांच्या मार्गदर्शनात तिची दिवसेंदिवस प्रगती होते आहे. नृत्याबरोबरच तिला जिम्नॅस्टिक्सचीही आवड आहे, ड्रॉइंगची आवड आहे. मराठी आणि हिंदी या भाषा विषयांची आवड आहे. तिला आर्किटेक्ट व्हायचंय आणि याबरोबरच फिटनेससाठी जिम्नॅस्टिक्सचीही जोपासना ती करते आहे. अशा विविध विषयातील मार्गदर्शन घेऊन विधिशा सारिका कोयंदे हिने अभ्यासातही प्रगती कायम ठेवली आहे. आपल्या कलेतील प्रगतीसाठी भरपूर परिश्रम घेणाऱ्या विधिशाला आपण 'छोटे उस्ताद'कडून खूप शुभेच्छा देऊ आणि तिने या क्षेत्रात आणखी प्रगती करावी, अशी इच्छा व्यक्त करू!



## फळा

खंत कधी ना, होतो व्याकुळ
दिसें निरंतर काळा कुळकुळ
वर्गामधला 'फलक' मुरारी
भोवती त्याच्या भरते गोकुळ
गिरवून त्याच्या भाळावरती
अजाण लेकुरे आकार घेती
अशाच गुणी मुलांचा होतो
'फळा' निरंतर सखा सारथी
घेणे न कदापि, देणेच माहीत
जीवन 'फळ्या'चे नित्य प्रवाहित
दातृत्वाची निर्मल प्रचीती
येते मुलांच्या हसऱ्या ग्वाहीत
रंग तया जरी मिळे तमाचा
प्रकाश पेरितो सर्वोत्तमाचा
कित्ता गिरवी 'फळा' निरंतर
ऋषी मुनींचा नि गौतमाचा
निरक्षरा जो साक्षर करतो
फलकासह तो वर्गच स्मरतो
प्रौढ जरी मी वया परत्वे
शाळेभोवती जीव घुटमळतो

**- भानुदास धोत्रे/७९७२६२५०८६**

# अहेराच्या आठवणींतून...

**रश्मी वाघमारे/९९७०१७५२८०**

सतत पावसाची रिपरिप, त्यामुळे त्या पावसाचे अप्रूप थोडंसं कमी झालेलं, गच्च भरलेलं आभाळ त्यामुळे दाटून आलेली एक मरगळ, काहीच करावंसं वाटत नव्हतं. दुपारची वेळ, त्यामुळे थोडी तरतरी यावी म्हणून एक कप फर्स्टक्लास चहा करावा आणि व्हरांड्यात खुर्ची टाकून निरुद्देश बसावे, अशा माझ्या लाडक्या उदात्त हेतूने मी स्वयंपाक घरात आले.

भांडे आवरूया मग, चहा करू! म्हणून मी भांड्यांच्या टोपल्याजवळ गेले. नेमका एक पेला उचलला आणि तो पुसून त्यावरचे नाव पाहू लागले. बारीक अक्षरात दिसले 'विनोद गंगाधर दत्तात्रय' इतक्या सुंदर आणि बारीक अक्षरात कोरून लिहिलं होतं. मन आठवणींच्या गावात गेलं...पार कितीतरी दशकं मागे! त्याबरोबरच आठवले ते ताट, वाटी, तांब्या सारं काही माझ्या मावशीने दिलेलं! माझ्या लग्नाच्या वेळी! अगदी बारीक आणि सुबक अक्षरात कोरून कर्रकर्र आवाज करीत, लिहितानाचा तो विशिष्ट आवाज माझ्या कानात घुमू लागला. सहज आठवलं की, त्या काळी म्हणजे सुमारे चार दशकांपूर्वी आपल्याला परवडेल असं काहीतरी लहानसं आणि स्वस्त भांडं जरी दिलं तरी कोणीही नाक मुरडीत नसे. कारण, कमीअधिक प्रमाणात साऱ्याच मध्यमवर्गियांची स्थिती जेमतेम असायची. अनेक प्रकारचे वजनाला व? किमतीला अत्यंत हलके पण, नक्षीदार वाडगे बहुसंख्येने आंदणात हमखास दिसायचे. क्वचित प्रसंगी नावावर नक्षी किंवा फुलंपानं काढून कधीकधी वेळ मारून न्यायचे. त्यानंतर जरा बऱ्या म्हणजे क्रमवारीने वरच्या स्थितीतील जग किंवा ताट, वाटी, तांब्याभांडे असे वर्गीकरण असायचे.

त्याकाळी, मिल्क कुकर नावाचा एक प्रकार अगदी अकराबारा रुपयांमध्ये मिळत असे. मला आठवलं, माझ्या एका परिचिताकडे ९-१० मिल्क कुकर मिळाले होते. तसेच अगदी स्वस्त आणि मस्त म्हणजे मिरची कटर अगदी सात-आठ रुपयात मिळायचे.

अगदी लहानसं भांडे मिळालं तरी त्याचं किती कौतुक असायचं. भांड्यांवर नाव लिहिलं की, जणू ती आठवण कायमस्वरुपी असायची. एखाद्या लहानमोठ्या कार्यक्रमात सहज एकमेकींकडच्या ताटवाट्या-पेले दुसरीकडे हक्काने नेणे अगदी सहज मान्य असे. तेव्हा आपल्याकडचे कोणते ताट आहे? हे गृहिणींना अगदी अचूक पाठ असे. एकेक भांडं म्हणजे त्याचा इतिहास घरच्या बाईला पूर्ण ठाऊक असे. 'हे ताट किनई, अमक्याकडच्या लग्नात मिळालं होतं बाई!','परतीचा अहेर म्हणून अगदीच हलकं आहे बाई!' किंवा 'हे जड शकुंतला भांडं ना, माझ्या मावशीने दिलंय मंगळागौरीला,' असं माहेरचं कौतुक ही असे. तर मंडळी, आता बरंच काही बदललं आहे. हल्लीची नवीन पिढी सर्व क्षेत्रात धडाडीने पुढे आहे. लेकी-सुना आता खूप सक्षमपणे घरदार व बाहेर सर्व काही सांभाळतात. त्यामुळे, सुटसुटीत आणि सोप्या पद्धतीने सर्व कामांचा फडशा पाडण्याकडे त्यांचा कल असतो. काचेचे, सिरॅमिक किंवा ओव्हनमध्ये वापरण्याजोगे सामान घरात असते. त्यामुळे भांड्यांवरचे नाव, त्यातली गंमत, त्यांचा इतिहास कालबाह्य वाटू शकतो. पण, जी मंडळी वरिष्ठ आहे त्यांना नक्कीच क्षणभर तरी आपल्या मायेच्या माणसांची सय येण्यासाठीची ही सोय नक्कीच आवडत असेल. होय ना? ते भांडं देणारी व्यक्ती, तो समारंभ, त्यांच्याशी निगडित साऱ्या कडूगोड आठवणी! अशाच छोट्यामोठ्या गोष्टींमध्ये जीवनाचे मर्मबंध सामावले आहे. नाही का?

# जागतिक अस्थमात भारताची स्थिती गंभीर

भारतातील एकूण जागतिक अस्थमाच्या प्रादुर्भावामध्ये भारताचा वाटा १३ टक्के आहे आणि मृत्यू दर मात्र तिप्पट आहे. याचाच स्पष्ट अर्थ असा की भारतात अस्थमाचे निदान आणि उपचारांमध्ये लक्षणीय अंतर आहे आणि हे अंतर कमी करणे हे भारतापुढे सर्वांत मोठे आव्हान आहे. दम्यामुळे लोकांना अतिशय त्रास होतो. त्यांच्या जीवनमानावर खूप परिणाम होतो आणि देशातील संसाधनही नष्ट होतात. म्हणून, निदान व उपचार यातील अंतर भरून काढण्यासाठी आपणच आपले मार्ग आणि साधने शोधली पाहिजेत.

रुग्ण स्तरावर जागरूकता नसल्यामुळे अस्थमाचे कमी निदान आणि त्याचे खराब व्यवस्थापन होते. अस्थमाशी संबंधित कलंक स्वाभिमानास, आत्मसन्मानास धक्का लावणारा ठरू शकतो, ज्यामुळे व्यक्ती लक्षणे लपवण्यास आणि डॉक्टरांकडे विलंब करण्यास प्रवृत्त होतात. सिद्ध परिणामकारकता असूनही भारतात गैरसमज कायम आहेत. 'स्टिरॉइड्स' आणि 'इनहेलर्स' कडे नकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जाते. स्टिरॉइड्स व इनहेलर्समुळे व्यसन लागण्याची चिंता निर्माण होऊन गंभीर प्रकरणांमध्येही याचा मर्यादित वापर केला जातो. सांस्कृतिक अडथळे, विशेषतः स्त्रियांसाठी, इनहेलर स्वीकारण्यात अडथळा आणतात. यामुळे अनेकदा त्यांच्यावर उपचार करणे कठीण होऊन बसते. अनेक भारतीय दम्याचे रुग्ण इनहेलर ऐवजी, तोंडावाटे औषधे जसे टॅबलेट, कॅप्सुल आणि सिरप घेणे पसंत करतात तोंडावाटे अर्थात मौखिक औषध वापरकर्त्यांवर झालेल्या अध्ययनानुसार लक्षात आले आहे की ५० टक्के वापरकर्त्यांना आणिबाणी उद्भवल्यावर तातडीने डॉक्टरांकडे धाव घ्यावी लागली होती तर ३२ टक्के जणांना इस्पितळात दाखल व्हावे लागले होते. हे खराब नियंत्रण आणि लक्षणीय आरोग्यसेवेचे ओझे दर्शविते. अस्थमा रुग्णांकडून इनहेलरचा चुकीचा वापर हे देखील अस्थमा नियंत्रित न राहण्याचे महत्त्वाचे कारण ठरले आहे. अस्थमाच्या रुग्णांचे इनहेलर तंत्र दोषपूर्ण असल्याचे अनेक अध्ययनातून स्पष्ट झाले आहे. भारतात, इनहेलर्सचे पालन ही एक समस्या आहे, अभ्यासात ७५.३ टक्के पालन न केल्याची नोंद आहे. याचे श्रेय विविध घटकांना दिले जाऊ शकते, ज्यामध्ये नियंत्रक औषधांचा वापर समाविष्ट आहे, उदाहरणार्थ केवळ लक्षणांदरम्यान आयसीएस, नियंत्रक औषधांच्या नियमित वापराबाबत जागरूकतेचा अभाव, एसएबीए (शॉर्ट-ॲक्टिंग बीटागोनिस्ट) सारख्या रिलीव्हर औषधांवर जास्त अवलंबित्व, ज्यामुळे दम्यावर पुरेसे नियंत्रण करता येत नाही आणि अशा परिस्थितीत दम्याचा अटॅक आल्यास रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागते.



डॉ. राजेश स्वर्णकार

या मुद्यांव्यतिरिक्त शहरी-ग्रामीण आरोग्य सेवा असमानता आणि कमी आर्थिक बजेटमुळे विशेषतः ग्रामीण क्षेत्रात आरोग्य सेवा संसाधने उपलब्ध नसणे यासारखी इतरही कारणे आहेत.

भारतातील अन्य कारक (घटक) जसे की वाढते वायू प्रदूषण, धूरयुक्त चुलीमुळे घरातील प्रदूषण, अगरबत्ती जाळणे, कुपोषण, औद्योगिकीकरण, तंबाखू धूम्रपानाचे मोठे प्रमाण यामुळे दम्याचा धोका वाढतो. इनहेलर्सशी संबंधित कलंक आणि मिथक दूर करणे महत्वाचे आहे, जे 'स्टिरॉइड्स' आणि 'इनहेलर' बद्दलच्या मिथकांना दूर करणारे व्यापक, सर्वसमावेशक शैक्षणिक उपक्रमांद्वारे साध्य केले जाऊ शकते. अचूक माहितीचा प्रचार करणे, खुल्या संवादाला प्रोत्साहन देणे आणि आश्वासक आणि समजूतदार वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. या उपायांद्वारे, आम्ही सामाजिक दृष्टिकोनात बदल घडवून आणू शकतो आणि समाजातील दम्याचे एकूण व्यवस्थापन सुधारू शकतो.

**- डॉ. राजेश स्वर्णकार**

- अध्यक्ष (२०२२-२४)
- साऊथ ईस्ट एशियन ॲकडमी ऑफ स्लीप मेडिसिन
- राष्ट्रीय कोषाध्यक्ष (२०२२-२३), इंडियन चेस्ट सोसायटी
- संचालक आणि मुख्य सल्लागार पल्मोनोलॉजिस्ट
- श्वसन, क्रिटिकल केअर, स्लीप मेडिसिन आणि इंटरव्हेंशनल पल्मोनोलॉजी विभाग
- गेटवेल हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, धंतोली नागपूर - ४४००१२

**मो : ९८२२२२५१३०**

# बंटीची बंडखोरी !

**(भाग १७)**

**प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२**



'बंटी... अरे, तुझ्या वर्गातल्या स्वप्नीलची आई भेटली होती मला, भाजीमार्केटमध्ये! तुला भेटायचंय म्हणत होती. फोन नंबरही दिलाय तिनं मला! करू का तिला फोन?' आईनं भाजी चिरता चिरता विचारलं. 'स्वप्नीलची आई? अं...हो... अगं, या टेस्टमधे त्याला खूप कमी मार्क्स मिळालेत. क्लास टीचर रागावले त्याला...तू बोल त्यांच्याशी,' बंटी प्लेट्स् पुसता पुसता म्हणाला.

बंटीनं, रिकाम्या वेळात आईला घरकामात मदत करण्याचं भलतंच मनावर घेतलं होतं. घासलेली भांडी, पुसून जागच्या जागी लावायची. जेवणं झाल्यावर, सारं उचलून ओट्यावर नेऊन ठेवायचं, टेबल पुसायचं. अशी आणखी कितीतरी कामं त्यानं आपल्याकडे घेतली होती. त्यामुळे, आई जाम खुश होती त्याच्यावर! संध्याकाळी फुटबॉल खेळून बंटी घरी आला तर स्वप्नीलची आई बंटीला भेटायलाच आली होती.

'बंटी, हल्ली अभ्यास जास्त असतो का रे शाळेत? स्वप्नील, सारखा काहीतरी लिहिताना दिसतो. तासन्तास लॅपटॉपवर असतो. एवढं करूनही, टेस्टमधे खूपच खाली घसरलाय. काठावरसुद्धा पास झाला नाहीये. क्लास टीचरनी भेटायला बोलावलं होतं आम्हा दोघांना!' 'अं? नाही तसं नाही काकू... अभ्यास जास्त वगैरे नसतो तसा. नॉर्मलच असतो. इतकं तासन्तास, लॅपटॉपवर बसून करण्यासारखं तर काहीच नाहीये सध्या! काकू, तुम्हाला खात्री आहेका की, स्पप्नील नक्की अभ्यासच करतो म्हणून? तुम्ही एकदा, त्याच्यामागे त्याच्या वह्या तपासून बघा. म्हणजे काहीतरी सुगावा लागेल. मी ही शाळेत थोडी चाचपणी करतो आणि तुम्हाला सांगतो. चालेल?' बंटीनं विचारलं.

रात्री जेवणाच्या टेबलावर बंटीच्या आईनं विषय काढला. 'बंटी, काय रे स्वप्नीलची आई काय म्हणत होती?' 'अगं SS त्या म्हणत होत्या की, स्वप्नील हल्ली सारखाच लॅपटॉपवर बसून काहीतरी लिहीत असतो. इतका अभ्यासच असतो का? इतका अभ्यास करूनही, नापास झाला टेस्टमध्ये!' 'खरंच काळजीचं कारण आहे. पूर्वी अभ्यासात बरा होता नं तो? किती परसेंटेज असायचे?' बाबांनी विचारलं. 'हो बराच होता. पंच्याऐंशी वगैरे टक्के असायचे. एकदम काय झालं यावर्षी माहीत नाही, मी बोलेन उद्या त्याच्याशी,' बंटीनं आश्वासन दिलं.

बंटी स्वप्नीलच्या आईच्या संपर्कात होताच. 'बंटी SS मी स्वप्नीलच्या नोटबुक्स चेक केल्या. अभ्यासाचं काहीच सापडलं नाही. नुसत्या बिल्डिंग्ज काढल्या आहेत. त्यातील एक बिल्डिंग तर आमचीच आहे. 'सायंतारा' नावसुद्धा लिहीलंय त्यावर! कधी कधी विचित्रच वागतो. जेवत नाही म्हणतो आणि तीन लिटर दूध एका दमात पितो. कधी माझ्याकडे दालचिनीच्या कांड्या मागून घेतो आणि कचाकचा चावून खाऊन टाकतो. कधी कधी स्वतःचा गळा हातानं दाबून घेतो अगदी जीव गुदमरेपर्यंत! श्वास कोंडल्यावर, हळूहळू सोडतो, ' स्वप्नीलची आई सांगतच होती.

त्यांच्या बोलण्यावरून बंटीच्या लक्षात आलं की, स्वप्नील ऑनलाईन गेम्सच्या चक्रव्यूहात अडकलाय आणि वेगवेगळी चॅलेंजेस स्वीकारतो आहे.स्वप्नीलच्या मॉमडॅडनी त्याला मानसोपचारतज्ज्ञांकडे नेलं. परंतु तिथून त्यानं पळ काढला. 'मी वेडा नाही. मला वेड्यांच्या दवाखान्यात नेऊ नका. यापुढे कधी मला तिकडे नेण्याचा प्रयत्न केलात तर माझा जीव देईन,' धमकीच दिली त्याने! स्वप्नीलचे मॉमडॅड हतबल झाले.

'बंटी, तू तुझ्या मित्रांबरोबर स्वप्नीलला अशा उद्योगात अडकव की, त्याला ऑनलाईन गेम्सचा विसर पडेल, ' त्याच्या डॅडनं बंटीला विनंती केली.

'आईबाबा... मला काहीच मार्गच सुचत नाहीये. स्वप्नीलला यातून बाहेर काढायचा,' नेहमी प्रमाणे डायनिंग टेबलच्या चेअरवर बसल्यानंतर तिघांची चर्चा केली. दुसऱ्या दिवशी, बंटीला घेऊन आई स्वप्नीलकडे गेली. 'स्वप्नीलच्या आई, तुम्ही पूर्वी क्राफ्टच्या टीचर होता. आमच्या बंटीला क्राफ्टची खूप आवड आहे. रविवारी त्याला थोडा वेळ क्राफ्ट शिकवाल का?' बंटीच्या आईनं विचारलं.

'हो, त्यात काय शिकवेन की. जरूर पाठवा. बंटी, स्वप्नीलला भेट नं... तो त्याच्या रूममध्ये आहे,' स्वप्नीलची आई म्हणाली.

स्वप्नीलनं रूमचं दार आतून लावलं होतं. बंटीनं बराच वेळ खटखटवलं. शेवटी त्यानं दार उघडलं. दारात बंटी उभा असलेला पाहून, त्याला धक्काच बसला. बंटीनं त्याला बाजूला करून, रूममधे प्रवेश केला. 'स्वप्नील, यार, तुझं ट्रिग्नॉमेटरीचं पुस्तक देशील का थोडा वेळ? माझं हरवलंय,' त्यानं सागितलं.'माझ्याकडे नाहीये पुस्तक...' स्वप्नीलनं, बंटीला रूमच्या बाहेर ढकलत म्हटलं. 'असं कसं? मी तुझ्या पुस्तकांच्या रॅकमध्ये शोधतो. तुला डिस्टर्ब नाही करत. चालू दे तुझं, जे काय चाललंय ते! कॅरी ऑन!'

बंटीनं, स्वप्नीलला बाजूला सारून त्याच्या पुस्तकांच्या शेल्फकडे आपला मोर्चा वळवला. त्याला खरं तर, ट्रिग्नॉमेट्रीचं पुस्तक दिसलं होतं. पण उगाचच पुस्तकं खालीवर करत, तो ऐकत होता. एकीकडे नोटबुकमधे, बिल्डिंगची चित्रं काढत, लॅपटॉपवर हळू आवाजात काहीतरी, बोलत होता तो! त्याचं बंटीकडे लक्ष नव्हतं.

स्वप्नीलनं प्रथम एक बैठा बंगला रेखाटला. त्यानंतर, छोटी बिल्डिंग, थोडी मोठी आणि शेवटी तीस मजली बिल्डिंग काढली. त्यातल्या चौदाव्या मजल्यावरून, कोणीतरी उडी मारतंय, असं ही रेखाटलं. 'आय विल बी द विनर...आय विल बी द विनर,' तो फुलफोर्स मधे ओरडला. बंटी हळूच त्याच्या रूममधून बाहेर पडला.

'काकू... त्या गेम्समधे, स्वप्नीलला चॅलेंजेस दिली जात आहेत. त्यात तो अव्वल ठरतोय आणि विनर म्हणून खुश होतोय,' बंटीनं स्वप्नीलच्या आईला सांगितलं.

'स्वप्नील, उद्यापासून बंटी माझ्याकडे क्राफ्ट शिकायला येतोय. तू सुद्धा बसत जा त्याच्याबरोबर, ' आईनं सांगितलं. 'कशाला? काय अडलंय? मला माझा अभ्यास आहे,' स्वप्नील उद्दामपणे बोलला. दुसऱ्या दिवशी बंटी, शिरीष, यश, युग सारेच स्वप्नीलच्या आईकडे क्राफ्ट शिकायला आले. स्वप्नील रूममधून बाहेर आलाच नाही. क्राफ्ट करताना बंटी जोरात ओरडला,'हे SS आय ॲम द विनर!' अचानक स्वप्नील रूममधून बाहेर आला. 'नो...आय ॲम द विनर,' तो किंचाळला.

'हो... हो बंटी...स्वप्नीलच विनर आहे,' शिरीष ओरडला. 'तू विनर आहेस नं मग हे करून दाखव, ' बंटी म्हणाला. 'त्यात काय, आत्ताच करून दाखवतो.' आश्चर्य म्हणजे स्वप्नीलनं सहजरित्या करून दाखवलं. जल्लोष करीत बंटी ग्रुपनं, स्वप्नीलला प्ले ग्राउंडवर ओढत नेलं. त्याच्या हातात बॅट दिली. त्याला खुषाल रन्स काढू दिले.

'यू आर द विनर स्वप्नील... यू आर द विनर! हीप हीप हुर्रे!' सगळ्यांनी एकच जयघोष केला. स्वप्नीलच्या डोळ्यांत चमक आली. 'स्वप्नील SS सगळ्यांना घेऊन घरी ये. पाव भाजी केलीये, ' स्वप्नीलच्या आईनं हाक मारली. 'काकू SS माहितीये आज स्वप्नीलनं सेव्हन्टी फाईव्हरन्स काढल्या. तो विनर ठरला,' पावभाजी खाता खाता बंटी म्हणाला. स्वप्नीलनं सर्वांसोबत मनसोक्त पावभाजी खाल्ली. अचानक काहीतरी आठवून स्वप्नील त्याच्या रूममधे गेला. 'मॉम SS मॉम...माझ्या लॅपटॉपमध्ये एरर आलाय. मोबाईलमध्ये वायफाय नाही. फोन कर... लौकर...' तो ओरडला. आईनं फोन केला. 'बाळा, रस्त्यावर झाड पडल्यामुळे, वायफायच्या वायर्स तुटल्या आहेत. दोन-चार दिवस लागतील दुरुस्त व्हायला,' आईनं सांगितलं.

"ओह माय गॉड... आत्ता मी काय करू" बघता बघता स्वप्नील व्हॉयलंट झाला. रूममधल्या वस्तू बाहेर फेकू लागला. जोरजोरात ओरडू लागला.

बंटी ग्रुप आला. बंटीनं स्वप्नीलला जवळ घेतलं तर तो लहान बाळासारखा रडू लागला.

सगळ्या मित्रांनी स्वप्नीलला हळूहळू बोलतं करून, ऑनलाईन गेम्स, त्याच्या लेव्हल याबद्दल सगळी माहिती काढून घेतली. स्वप्नीलची आता शेवटची लेव्हल राहिली होती. चौदाव्या मजल्यावरून उडी मारायची ! बंटीनं, त्याच्या पंधराव्या मजल्यावरून एक खेळणं खाली टाकलं. त्या खेळण्याचे तुकडे झाले होते. स्वप्नील भानावर आला. आपल्या जिवाचं काय झालं असतं या विचारानं त्याचं अंग शहारलं. 'बंटी, आज मी शुद्धीवर आलो. शेवटची लेव्हल जिंकल्यावर मी विनर होणार नव्हतो तर, ती माझी आत्महत्या ठरणार होती. तुझ्यामुळे मी आज इथे आहे. आता माझं संपूर्ण दिवसाचं वेळापत्रक करून मी त्याप्रमाणे वागेन. खूप अभ्यास करेन. डॉक्टर होईन. मॉम डॅडना सुखी ठेवेन. माझ्यासारख्या वाया जाणाऱ्या मुलांना सुधारेन, थँक यू बंटी...'

## क्रॉसओवर युटिलिटी व्हेईकल एमजी विंडसर सियुव्ही

पुणे : जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने, आपल्या एका ताज्या व्हिडिओमध्ये, भारतातील पहिले इंटेलिजेंट क्रॉसओव्हर युटिलिटी व्हेईकल सियुव्ही, एमजी विंडसर - बहुप्रतीक्षित वाहनाच्या 'इन्फिनिटी ग्लास रूफ' बद्दल माहिती दिली आहे.

बैद्यनाथ
नागपूर
असली आयुर्वेद

पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?

सिड्पाईल्स टॅबलेट

मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज,दाह टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज, असहनीय वेदना इ. त्रास दूर करणयास मदत करते.




अभयामृत

बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.



वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co